मराठ्यांच्या आपसांतील लढाया

— लेखक —

गोविंद गणेश भागवत, धावडशीकर.
पेनशनर संस्कृत शिक्षक.

किंमत बारा आणे.

मराठ्यांच्या आपसांतील लढाया

— लेखक —
गोविंद गणेश भागवत, धावडशीकर.
पेनशनर संस्कृत शिक्षक.

किंमत बारा आणे.

प्रकाशक—गोविंद गणेश भागवत, पेनशनर
संस्कृत शिक्षक.
९१० सदाशिव पेठ पुणें नं. २

मुद्रक—शंकर बळवंत सहस्रबुद्धे, बी. ए.
बालोद्यान प्रेस, ६८९ सदाशिव पेठ, पुणें नं. २

प्रस्तावना

ह्या ग्रंथाचें नांव "मराठ्यांच्या आपसांतील लढाया" असें जरी देण्यांत आलें असलें तरी ह्या ग्रंथाचा उद्देश असा आहे कीं, सुशिक्षित लोकांनीं आजपर्यंत झालेल्या चुका दुरुस्त करून इतिहासासंबंधीं आजपर्यंत प्रसिद्धीस आलेला सर्व पुरावा एकत्रित करून पुढच्या पिढीकरितां व त्यांची सुधारणा करण्याकरितां शक्य ती उपाययोजना कशी करितां येईल यासबंधीं शेवटच्या प्रकरणांत जे उपाय सुचविले आहेत त्यासंबंधीं शांतचित्तानें त्यांनीं विचार करावा, हा हेतू आहे. इतर सर्व सुधारलेल्या देशांत अशा प्रकारें रयतेची स्थिति सुधारण्याकरितां सुशिक्षित लोक यथाशक्ति प्रयत्न करीत असतात. मुसलमानी आणि मराठी साम्राज्यामुळें ह्या देशांत राजा आणि शेतकरी याच्यामध्यें आयते बसून खाणारा असा जो एक वर्ग निर्माण झाला आहे त्यामुळें देशांत उत्पन्न होणारी खनिज द्रव्यें आणि देशांतील नद्यांचे पाण्याचा उपयोग प्रजेला जसा व्हावा तसा होत नाहीं तो करितां यावा, आणि आपल्या चुका सुधारून या पुढील पिढीचा उत्कर्ष कसा होईल तो साधावा अशा प्रकारचा मार्ग सुशिक्षित संस्थानिकांना दाखवून देतां येईल, व इंग्रज सरकारचें देखील सहकार्य संपादन करितां येईल अशी योजना तयार करण्याची लायकी पुष्कळ विद्वानामध्यें आहे. वास्तविक मराठी साम्राज्यांत शूर पुरुषांनीं शत्रूवर जितके जय मिळविले त्यापेक्षां त्यांच्या आपसांतील लढायाच जास्त आहेत. हें स्पष्ट करण्याकरितां मराठी साम्राज्याचा उदय होण्याचीं कारणें व नाश होण्याची कारणें दोन्हीहीं दाखवावी लागलीं. यांत लेखकाच्या ज्या चुका असतील त्या विद्वानांनीं दाखवाव्या अशी त्यांना नम्र प्रार्थना आहे. जो गृहस्थ आम्कोडाचें झाड लावितो त्या झाडाची फळें त्याच्या ह्यातींत जरी त्याला खावयास मिळाली नाहींत तरी पुढच्या पिढीला तीं फळें खावयास मिळतील याचाच त्या गृहस्थाला आनंद होतो, तशी हल्लींच्या विद्वानांची स्थिति आहे. पुढील पिढीकरितां येव्हांपासून आपण कांहीं उत्तम योजना आंखून दिल्या तर आज नाहीं तरी दहावीस वर्षांनीं प्रजेची स्थिति सुधारेल. मराठी साम्राज्याच्या नाशाचीं जीं कारणें दिलीं आहेत ते हिंदुस्थानच्या लोकांचे दोष जरी कोणी कबूल करीत नाहीं, तरी असल्या चुका पुन्हा कोणीही करूं नयेत इतका जरी ह्या ग्रंथाचा उपयोग झाला तरी लेखकाच्या कामाचें सार्थक झालें असें तो समजेल. हा ग्रंथ संपूर्ण सुशिक्षित लोकांनीं वाचावा अशी नम्र प्रार्थना आहे.

क्षेत्र त्रिंबकेश्वर येथें १९३९ सालीं परशुराम मंदिराचे एका समारंभाकरितां पुष्कळ लोक जमले होते. त्यावेळीं रा. दाबके या नांवाचे एक विद्वान

वक्ते यांनीं आपल्या भाषणांत अशी प्रौढी मिरविली कीं "कोंकणस्थ ब्राह्मण जेव्हां पेशवाईच्या वेळीं वैभवाच्या शिखरालें पोहोंचले होते त्यावेळीं कोंकणस्थ ब्राह्मणांमध्यें शेकडा ७५ लढवय्ये आणि शेकडा २० कारकून व शेकडा ५ भिक्षुक असत." ही गोष्ट सर्वथैव खोटी आहे. एकवीस वर्षांवरच्या कोंकणस्थ ब्राह्मणापैकीं पांच हजार ब्राम्हणांमध्यें एक लढवय्या असें प्रमाण होतें. प्रभू ज्ञातीमध्यें देखील लढवय्ये लोकांचे प्रमाण इतकेंच अल्प होतें.

रावबहादुर नारायण गोविंद चाफेकर यानीं जो ग्रंथ प्रसिद्ध केला आहे त्याचे नांव "पेशवाईच्या सावलींत" असें आहे. व रा. भावे यानीं जो ग्रंथ प्रसिद्ध केला आहे त्याचे नांव "पेशवे कालीन महाराष्ट्र" असें आहे. या दोन्ही ग्रंथांत ज्या खऱ्या हकीकती छापल्या आहेत त्यांतच भर घालणें करितां प्रस्तुत ग्रंथाचा विद्वान वाचकांना उपयोग करितां येईल. जर सुशिक्षित इंग्रज राज्यकर्त्यांच्या ज्ञानाचा उपयोग हिंदुस्थान देशाचे सुधारणेचे कामीं करून घेणें असेल तर इंग्रज राज्यकर्त्यांची अर्थशास्त्रांचीं तत्त्वें या देशांतील विद्वान लोकांनीं मान्य केलीं पाहिजेत व राज्यकर्त्यांशी सर्व बाबतींत सहकार्य केले तर पुष्कळ महत्त्वाचें कार्य होण्याजोगें आहे. हा ग्रंथ वाचून विद्वान वाचकांची खात्री होईल कीं:—

(१) पेशवेकालीं पैसा अत्यंत दुर्मिळ होता.

(२) ह्या देशांतून कच्चा माल युरोपकडे रवाना होऊं लागल्यामुळें त्याची किंमत दरसाल पांचशे कोटि रुपये हिंदुस्थानांत येऊं लागले.

(३) राज्यकर्त्यांनीं देशांत शांतता प्रस्थापित केल्यामुळें पडीत जमीन लागवडीत येऊ लागली व पुष्कळ उद्योगधंदा वाढू लागला.

(४) मुद्रण कला आणि वाफेची शक्ती यांचा उपयोग झाल्यामुळें रयतेमध्यें ज्ञानाचा प्रसार झपाट्यानें वाढू लागला.

(५) खरें रेशीम आणि इमिटेशन रेशीम यांमध्यें जितकें अंतर तितकेंच अंतर शौर्याविषयीं ज्या प्रसिद्ध जाती आहेत म्हणजे रजपूत, जाठ, मराठे, गुरखे, गिराशिया, पुरभय्ये लोक ह्या जाती आणि ब्राम्हण आणि प्रभू या जाती यांचेमध्यें अंतर होते हे या ग्रंथावरून दिसोन येईल. ब्राम्हण आणि प्रभू या दोन जातींचें शौर्य म्हणजे फक्त कृत्रिम शौर्य होय.

शेवटीं हा ग्रंथ लवकर लिहून दिल्याबद्दल रा. रा. कृष्णाजी गोपाळ मोकाशी भास्तर यांचे आभार मानणें जरूर आहे. व हा ग्रंथ छापण्याचे कामी रा. रा. सहस्रबुद्धे मालक, बालोद्यान छापखाना पुणें यानीं पूर्ण सहकार्य केलें त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

पुणें.
फेब्रुवारी १९४०

गोविंद गणेश भागवत,
घावडशीकर.

— —

मराठ्यांच्या आपसांतील लढाया

अनुक्रमणिका

मराठ्यांच्या आपसांतील लढाया

उपोद्घात

—०—

ह्या ग्रंथाचे नांव मराठ्यांच्या आपसांतील लढाया असें आहे, तथापि यामध्यें चर्चा करण्यांत येणारे विषय: —

(१) मराठयांचा उदय कशामुळें झाला, अस्त कशामुळें झाला व आपसांतील लढायांचें संक्षिप्त वर्णन. (२) इंग्रजांनीं ह्या हिंदुस्थान देशांत राज्यवृद्धि अन्यायानें केली नाहीं व श्रीब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांनीं " चुगल्या करण्यास आरंभ केला त्याचा परिणाम पुढें ९० वर्षांनी साम्राज्य नष्ट झालें. " असें जे इतिहासकार विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं विधान केलें आहे तें सर्वस्वीं चुकीचें आहे हें मी सिद्ध करून दाखविणार आहे, तसेंच राजवाडे यांनीं जें लिहिलें आहे कीं, बडोदें येथील गायकवाडानीं मराठी साम्राज्याच्या शंभर वर्षांच्या काळांत कोणतीही महत्त्वाची कामगिरी केली नसून, फक्त शागीर्दीइतकेंच काम केलें आहे. " गायकवाडांनीं खंडेराव दाभाडे यांची शागीर्दी करून दिल्लीच्या बादशहाचा गुजराथेंतील मालकी हक्क बुडवून टाकिला. पेशवे यांची शागीर्दी करून दाभाडयांचा मालकी हक्क बुडविला. " " आणि इंग्रजांची शागीर्दी करून पेशव्यांचा मालकी हक्क बुडविला. " हीं जीं राजवाडे यांची चुकीचीं विधानें आहेत तीं खोडून काढण्याकरितां मी स्वतंत्र प्रकरणें लिहून खोटीं असे सिद्ध करून दाखविणार आहे. छत्रपती शिवाजीमहाराजांनीं डोंगरी किल्ल्यांच्या आधारानें स्वराज्य संस्थापनेस सुरवात केली. हे डोंगरी किल्ले मावळ भागांत आहेत. येवढ्यावरूनच सुरवातीला शिवाजीमहाराजांजवळ मावळे लोकांचें सैन्य होतें असें जे आजपर्यंत इतिहासकार लिहित आले, तें बरोबर नाहीं. नाचणी, भात, वरी, सावें अशी पिकें काढणारे जे मावळे लोक आज आपणांस दिसतात त्यांचे पूर्वज लढवय्ये होते हें म्हणणें खरें नाहीं. मोडी लिपीमध्यें घाईघाईनें लिहितांना क आणि म हीं अक्षरें सारखीं लिहित असत. येसा निकंम अशी मोडी अक्षरें मूळच्या बखरींत लिहिलेलीं आहेत. त्याचेच प्रथम इतिहास लिहिणारांनीं येसाजी कंक असें बालबोधींत लिहिलें. नी आणि जी हीं अक्षरें मोडीमध्यें सारखीं दिसतात. यावरून येसाजी कंक हें खरें नांव नसून येसा निकंम हें खरें नांव होय. हल्लीं महाराष्ट्रांत कंक हें आडनांव मराठयांत आहे. परंतु हलक्या जातकुळीची जी लेकावळी कुटुंबें आहेत त्यांनीं आपली जातकुळी श्रेष्ठ आहे हें दाखविण्याकरितां छापील इतिहास प्रसिद्ध झाल्यानंतर आपण देखील उच्च जातीचे मराठे आहोत, असें दिसावें म्हणून कंक हें आडनांव मागाहून उसने घेतले आहे. वास्तविक शौर्याविषयीं

प्रसिद्ध अशीं जीं मराठा क्षत्रिय जातीचीं घराणीं, उदाहरणार्थ——भोंसले, घोरपडे, कदंम, गायकवाड, महाडीक, मोरे, फडतरे, संकपाळ, शेंडकर, चव्हाण, शिर्के, मोहिते, आंग्रे ह्या घराण्याप्रमाणेंच निकंम हें घराणें होय. व ह्याच घराण्यांच्या शिलेदारांनीं डोंगरी किल्ल्यावरच्या लढायांत मर्दुमकी गाजविली आहे. परंतु त्यावेळचा खात्रीलायक पुरावा उपलब्ध नाहीं. पुढें जसजसा मराठी राज्याचा विस्तार वाढूं लागला. ततसा डोंगरी किल्ल्यावरच्या लढाया कमी होऊन मराठ्यांच्या घोडदळांतही ह्याच घराण्यांतील लोकांनीं उत्तम कामगिरी बजाविली आहे. ब्राह्मण आणि प्रभू या जातीच्या लोकांनीं अंमलदारांचीं कामें मात्र चांगली केली. परंतु या दोन्ही जातींत लढवय्या पुरुषांचें प्रमाण फार लहान होते. २१ वर्षांवरच्या पांच हजार पुरुषामध्यें एक पुरुष मात्र लढवय्या इतकें अल्पप्रमाण ब्राह्मण आणि प्रभु या जातींत होतें. परंतु मराठे क्षत्रियांचीं अशीं उदाहरणें दाखवितां येतील कीं उंबरठयागणिक एक घोडेस्वार, फडतरे घराण्यापैकीं मराठयांच्या घोडदळांत सामील होत असे. रोमन साम्राज्यांत रोमन लोकांचें घोडदळ शौर्याच्या कामांत जितकें कुशल असे, त्याच तोडीचें मराठयांचें घोडदळ कुशल होतें. मराठा घोडेस्वार लढाईकरितां घराबाहेर पडला म्हणजे त्याच्या खोगिरावर जी पडशी असें त्या पडशीत एक माणसाच्या स्वयंपाकाकरितां तवा, पितळी, शिधा, मीठ, मिरची, घोड्याचा तोबरा, दाणा आणि दवासन इतकें सामान असे. वर्षांतून आठ महिने स्वारी शिकारी कामगिरी करीत असतांना, घोडेस्वाराचें घर घोड्याच्या पाठीवर असे. " जीन घर जीन तख्त " ही म्हण मराठा घोडेस्वाराला सार्थ लागू पडत असे. मराठयांचा सर्व रिसाला उघड्या माळावर बारा महिने असे. हल्लींप्रमाणें तबेले बांधिलेले नव्हते. उन्हाळा पावसाळा हिंवाळा तिन्ही ऋतुमध्यें घोडा ऊन, पाऊस, सहन करी इतका ताकदवान असे. प्रत्येक पावसाळ्याला मराठा घोडदळाला छावणी करून विश्रांति घ्यावीच लागे. अशा वेळी कित्येक लोक तीन महिने आपल्या घरीं जाऊन मुला माणसांत रहात असत. मराठयांच्या छावणींतील हत्ती देखील उघडयावर असत. हल्लीं ज्याप्रमाणें तोफा ओढण्याला घोडे किंवा बैल कायमचे असतात, तसे मराठ्यांच्या तोफा ओढण्याला पुरेसे बैल नेहमीं नसत. स्वारीवर निघाले म्हणजे गांवोगांवचे शेतकऱ्यांचे बैल वेठीला धरीत असत, आणि दहा मैलपर्यंत त्यांचेकडून तोफा ओढवून घेऊन नंतर ते बैल परत पाठवीत असत, आणि पुढील प्रवासाकरितां पुढील गावच्या शेतकऱ्यांचें बैल पकडीत असत. बंगलोरासारख्या कर्नाटकांतील शहराला जेव्हां पेशव्यांच्या सैन्यानें वेढा दिला तेव्हां नऊ मैलावरून पाणी आणावें लागत असें. अशा वेळीं पखालीचे बैल हे पाणी आणीत असत. आणि पखालीचे नोकर मुसलमान असत. तरी देखील असलें पखालींतील पाणी ब्राह्मणाला देखील स्वयंपाकाला घ्यावें लागत असे तरीपण ग्रामण्य किंवा वाळींत ह्या भानगडी कांहीं एक काढल्या जात नसत.

ह्याच ग्रंथांत असें सिद्ध करून दाखवावयाचें आहे कीं, ज्यांचें शील उत्तम त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास असतो. पैशाची टंचाई असून देखील मोठमोठी कामें आत्मविश्वासाचें जोरावर करून दाखविलीं जात असत, म्हणून कांहीं पुरुष जगाला वंद्य असत. त्यांचें चारित्र्य म्हणजे रामचंद्रासारखे एक पत्नी व्रत होतें. आणि म्हणून त्यांचीं नांवे प्रथम देणें वाजवी आहे. (१) वसईचा मोहरा चिमणाजी अप्पा (२) सदाशिवराव भाऊ, (३) माधवराव बल्लाळ पेशवे (४) परशुराम रामचंद्र पटवर्धन (५) नरसिंह खंडेराव विंचूरकर हीं नांवें आणि ह्यांच्याच सारखीं शेंकडों नांवें लेखकाला माहीत आहेत तीं यथाप्रसंगीं निरनिराळ्या प्रकरणांत दाखविली जातील.

इतिहासाला सत्यत्वाची जरूर विशेष असते. कपोल कल्पित कथा इतिहासांत घुसडल्यानें मोठी हानि होते. त्याची चारपांच उदाहरणें देणें अवश्य आहे. (१) दक्षिण जिंकण्याकरतां औरंगजेब मोठी फौज घेऊन चोवीस वर्षे दक्षिणेंत प्रयत्न करीत होता, त्याला संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनीं फार सतावून सोडले. ही गोष्ट जरी खरी आहे तरी ह्याच गोष्टीचा फायदा घेऊन नवीन बनावट कथा रचिली आहे ती खरी नाहीं. एकदा औरंगजेबाचा घोडा घमेल्यांतील पाणी पिईना तेव्हां औरंगजेबानें विचारले " तुला त्या पाण्यांत संताजी, धनाजी दिसतात काय ? " ही गोष्ट सपशेल खोटी आहे. औरंगजेब एक तेजस्वी राज्यकर्ता होता. औरंगजेब बादशहा हा कांहीं भित्री भागुबाई नव्हता. (२) पुणें येथें शनवारचा वाडा ज्या ठिकाणीं बांधिला आहे त्या ठिकाणीं काम सुरु होण्यापूर्वी एक ससा कुत्र्याच्या पाठीमागें लागला होता, आणि त्यामुळे कुत्रा भिऊन पळूं लागला. ही कथा देखील सपशेल खोटी आहे. (३) मालेगांव येथील जहागीरदार राजेबहादूर यांचा एक तेथें भुईकोट किल्ला आहे. राजेबहादूर हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण यांचें उपनांव दाणी. त्यांचा भुईकोट किल्ला ज्या ठिकाणीं बांधिला आहे त्या ठिकाणीं असाच एक ससा कुत्र्याच्या मागें लागला होता, ही कथा देखील खोटीच आहे. (४) छत्रपति शिवाजीनीं जेव्हां कल्याणचा किल्ला जिंकला त्यावेळीं मुसलमान किल्लेदाराची रूपवती स्नुषा शिवाजी महाराजापुढें आणून उभी केली, आणि महाराजांनीं तिला आपल्या जनानखान्यांत ठेवावी अशी विनंति करण्यांत आली होती. परंतु ही कथा देखील खोटी आहे. शिवाजी महाराजांनीं सांगितलें कीं, मी परस्त्रीना मातेसारखे मानतो सबब तिला परत पाठविले. " हें खरें नाहीं. जेव्हां जेव्हां मराठे वीर पुरुष मुसलमानांना जिंकीत तेव्हां त्यांच्या जनान्यांतील स्त्रियांची चांगल्या देखरेखेखाली खानगी करीत असत. त्यांची कधींहि बेअब्रू करीत नसत. (५) वसईच्या किल्ल्याला चिमाजी अप्पानें पांच महिने वेढा दिला होता. त्यावेळीं देखील पोर्तुगीज जातीची एक वेश्या गलबतांतून गोव्याकडे जात असतांना मराठा

शिपायांनीं पकडली, आणि तिला चिमाजी अप्पापुढें उभी केली, आणि चिमाजी अप्पाला विचारलें ही खूपसुरत स्त्री उपभोगाकरितां ठेवा परंतु चिमणाजी अप्पांनीं असा जबाब दिला कीं " मी परस्त्रीला मातेसमान मानतो, सबब तिला सुरक्षित जाऊं दिली. " ही कथा देखील खोटी आहे. मराठ्यांनीं वेढा दिल्यानंतर कोणतीही स्त्री वसईच्या किल्ल्यांतून गोव्याकडे जाण्याकरितां पोर्तुगीज लोकांनीं पाठविलेली नाहीं. आपले सर्व सामान सुरक्षित नेण्याबद्दल चिमाजी अप्पांनीं पोर्तुगीज लोकांना सवलत दिली होती, त्याप्रमाणें स्त्रियांचेही संरक्षण योग्य प्रकारेंच झालें. सबब ही चिमाजी अप्पा संबंधाची आख्यायिका खरी नाहीं.

सुशिक्षित चितपावन लोक हल्लीं अशा थापा मारितात कीं पेशवाईचे वेळीं शेकडा ९७ कोंकणस्थ ब्राह्मण निधड्या छातीचे शूर वज्रदेही लढवय्ये होते. व प्राचीन काळच्या स्पार्टन, किंवा स्काटिश हायलंडर्स, कोसॅक रशियन्स यांच्या सारखे शूर होते. परंतु ही चूक आहे. एकवीस वर्षांवरच्या पुरुषांपैकीं दर पाच हजार पुरुषांमध्यें एक लढवय्या सिपाई इतकें त्यांचे प्रमाण कमी होतें. प्रभू लोकांमध्यें देखील लढवय्या सिपाई लोकांचें प्रमाण इतकेंच कमी होतें. हल्लीं जीं प्रभु लोकांमध्यें उपनामें आढळतात म्हणजे प्रधान, पतकी, कारखानीस, सबनीस, शिकेनविस हीं वतनें शांततेच्या काळांत पैदा केलेली आहेत. लढवय्या लोकांचें प्रमाण त्यांचेमध्यें शेकडा पांच असेंच होत. सन १८०५ साला नंतर म्हणजे महाराष्ट्रांत शांतता स्थापन झाल्यानंतर हीं वतनें वंशपरंपरेनें पैदा झालेली आहेत.

मराठ्यांच्या आपसातील लढाया.

१ थोडक्यांत अशा लढायांची यादी देणें कांहीं फार कठीण नाहीं. परंतु या ग्रंथांतील इतर प्रकरणें वाचल्यानंतरच या ग्रंथाचा उद्देश कळून येईल. ती यादी पुढें दिल्याप्रमाणें आहे.

एक पक्ष	विरुद्ध पक्ष
१ शहाजी भोसले	१ लुकजी जाधव शिंदखेडकर
२ छत्रपती शिवाजी महाराज	२ मुधोळचे घोरपडे
३ छ. शिवाजी महाराज	३ जावलीचे मोरे
४ छ. शिवाजी महाराज	४ तंजावरकर व्यंकोजी
५ छ. संभाजी महाराज	५ कुट्रे येथील शिर्के
६ छ. संभाजी महाराज	६ चिटणीस घराणें
७ छ. संभाजी महाराज	७ छ. राजाराम महाराज
८ छत्रपती शाहू	८ राणी ताराबाई
९ संताजी घोरपडे	९ धनाजी जाधव
१० छ. शाहू	१० कोल्हापूरकर छ. संभाजी
११ बाळाजी विश्वनाथ	११ चंद्रसेन जाधव
१२ बाजीराव बल्लाळ	१२ त्रिंबकराव दाभाडे
१३ बाळाजी बाजीराव	१३ रघूजी भोसले
१४ बाळाजी बाजीराव	१४ बारामतीकर जोशी
१५ बाळाजी बाजीराव	१५ सासवडचे पुरंदरे
१६ बाळाजी बाजीराव	१६ दमाजी गाइकवाड
१७ बाळाजी बाजीराव	१७ तुळाजी आंग्रे
१८ संभाजी आंग्रे	१८ मानाजी आंग्रे
१९ पिलाजी गायकवाड	१९ कंठाजी कदम बांडे
२० बाळाजी विश्वनाथ	२० कृष्णराव खटावकर
२१ राघोबा दादा पेशवा	२१ पंत प्रतिनिधि
२२ राघोबा दादा	२२ मुतालिक
२३ राघोबा दादा	२३ गोविंद हरी पटवर्धन
२४ माधवराव पेशवे	२४ जानोजी नागपूरकर
२५ साबाजी भोसले	२५ मुधोजी भोसले
२६ माधवराव बल्लाळ	२६ राघोबा दादा
२७ बारभाई मंडळ	२७ राघोबा दादा
२८ राघोबा दादा	२८ हरी बाबाजी
२९ राघोबा दादा	२९ सर्व पटवर्धन सरदार

३० गोविंदराव गाइकवाड	३० सयाजीराव, फत्तेसिंग, मानाजीराव
३१ बारभाई मंडळ	३१ मोरोबादादा फडणीस, सखाराम भगवंत बोकील
३२ तुकोजी होळकर	३२ लखबादादा लाड (महादजी शिंदे यांचा सेनापती)
३३ भवानराव प्रतिनिधि	३३ भगवंतराव प्रतिनिधि
३४ सातारकर छत्रपती	३४ आनंदराव रास्ते, परशुरामभाऊ पटवर्धन
३५ परशुरामपंत प्रतिनिधि	३५ बापू गोखले
३६ कोल्हापूरकर छत्रपती	३६ परशुरामभाऊ पटवर्धन
३७ बापू गोखले	३७ विठोजी होळकर
३८ दौलतराव शिंदे	३८ यशवंतराव होळकर
३९ बाळोजी कुंजर	३९ सर्जेराव घाटगे
४० कोल्हापूरकर छत्रपती	४० रामचंद्र परशु० पटवर्धन
४१ कोल्हापूरकर छ.	४१ इचलकरंजीकर
४२ बापू गोखले	४२ रामचंद्र परशु० पटवर्धन
४३ दौलतराव शिंदे	४३ दत्तक आया
४४ रामचंद्रपंत पटवर्धन	४४ रत्नाकरपंत राजाज्ञा
४५ चतुरसिंग भोसले	४५ बाजीराव रघुनाथ
४६ गंगाधरशास्त्री पटवर्धन	४६ सिताराम रावजी
४७ आबा शेलूकर	४७ बाबाजी आपाजी
४८ आनंदराव गाइकवाड	४८ कान्होजी गाइकवाड
४९ मैनाबाई पवार-धारकर	४९ मुरारीराव पवार
५० फत्तेसिंग गाइकवाड	५० कडीचे मल्हारराव
५१ बाळोजी कुंजर	५१ यशवंतराव होळकर
५२ सिद्धेश्वरपंत बिनीवाले	५२ नारोपंत आपटे

मराठी साम्राज्य भरभराटीस येण्याची कारणें

॥ सिध्यन्ति कर्मसु महत्स्वपि यन्नि योज्याः ॥
॥ संभावना गुणमवेहि तमीश्वराणाम् ॥
॥ किप्रा भविष्य दरूणस्तम सां विभेत्ता ॥
॥ तंचेत्सहस्र किरणो धुरिना करिष्यत् ॥

या कालिदासाच्या उक्तीप्रमाणें अहमदनगर येथील निजामशाही नांवाच्या मुसलमानी राज्यांत मलिकंबर किंवा चांदबिबी अशी उदार स्वभावाची माणसें होती. त्यांनीं पाहिलें कीं, आपल्या सैन्यांत मराठा शिलेदारांची भरती करून त्यांच्यावर जबाबदारी टाकली तर त्यांच्या क्षात्रतेजाचा आपणास उपयोग करून घेतां येईल. त्यावेळीं अहमदनगरच्या राजाला मोठी संकट परंपरा अशी होती कीं, दिल्लीच्या मोगल बादशहांच्या मनांतून अहमदनगरचें राज्य जिंकून खालसा करावें. परंतु १६३७ सालापर्यंत त्या राज्याचें आयुष्य जें वाढलें तें मराठ्यांच्या सैन्यामुळेंच होय. छत्रपति शिवाजीमहाराजांच्या पूर्वीच जाधव, मोरे, घोरपडे, निंबाळकर इत्यादि मराठा क्षत्रियांची घराणीं शौर्याविषयीं प्रसिद्धीस आलीं होतीं. आणि त्यांनीं दक्षिणेकडील मुसलमान बादशहांच्या हाताखालीं इमानें इतबारें लष्करी चाकरी केली होती. शिवाजीचा बाप शहाजी हा मलिकंबरच्या तालमींत तयार झाला होता, यामुळें शहाजीमध्यें शौर्य आणि मुत्सद्दीपणा या दोन गुणांचा मिलाफ झालेला होता. अनुवंशिक संस्कारानें शहाजीचे तिन्ही मुलगे संभाजी, शिवाजी व व्यंकोजी ह्या तिघामध्येंही हेच दोन गुण बापाकडून मिळालेले होते. शिवाजीला कळूं लागल्यापासून त्याला असें वाटूं लागलें कीं मुसलमानांची चाकरी करून आपलें पोट भरावे, त्यापेक्षां ह्या शौर्याचा उपयोग स्वतंत्र राज्य स्थापनेंत आपण का करूं नये ? १६४६ सालाच्या सुमाराला मुसलमान बादशहा चैनींत आणि विलासांत आपला काळ घालवीत असत. आणि रयतेचा पैसा रयतेच्या उपयोगाकडे खर्च करावा हें तत्त्व तें विसरून गेले होतें. तस्मात् अशा संधीचा फायदा घेऊन आपण स्वराज्य स्थापन करावे म्हणजे देशाचा फायदा होईल. वास्तविक दिल्ली येथील मुसलमान बादशहा आणि दक्षिणेंतील मुसलमानी राजे यांच्यामध्यें कांहीं चांगले गुण होते, ते नमूद करणें न्यायाचे होईल. असे गुण मराठा क्षत्रियांनी मुसलमानांपासून शिकून घेतले; आणि त्याचा उपयोग त्यांना पुढें राज्य चालविण्याच्या कामीं फायदेशीर झाला. वास्तविक पाहिले तर, मुसलमान राज्यकर्ते हे मराठ्यांचे गुरूच म्हणावयास हरकत नाहीं. पुढें दिल्याप्रमाणें त्यांच्यामध्यें चांगले गुण होते. दिल्लीच्या बादशहापैकीं गुलाम घराण्यांतील नाजिरुद्दीन महंमद हा

बादशहा फकिराचे वृत्तीनें रहात असे, शत्रूचा पराभव करण्यांत तो अत्यंत हुशार होता. त्यानें फक्त एकच बायको केली होती व तिनेंच घरांत अन्न शिजविलें पाहिजे अशी नवऱ्याची ताकीद होती. ती ज्या वेळेस तक्रार करीत असे कीं, स्वयंपाक करतांना माझा हात भाजतो, एखादा नोकर ठेवा तेव्हां तिचा नवरा तिला म्हणे हा रयतेचा पैसा आहे ह्याचा उपयोग रयतेच्या सुखाकरतांच केला पाहिजे. जर बादशहानें ह्या पैशाचा उपयोग स्वतःच्या सुखाकडे केला तर, ईश्वराचें घरीं अन्याय केल्यासारखें होईल. दुसरें उदाहरण फिरोजशहा तघलख ह्या बादशहानें रयतेच्या सुखाकरितां यमुना नदीचा कालवा बांधला व दिल्लीपासून जे मार्ग नवीन केले त्यांच्या दोन्ही बाजूनें झाडे लावून प्रवाशाकरितां धर्मशाळा बांधिल्या आणि पाणपोई स्थापन केल्या. तिसरें उदाहरण अकबर बादशहानें आपल्या संस्थानांत हिंदु लोकांना सैन्यांत अधिकार दिले आणि रयतेला चांगला धर्म असावा म्हणून २५ वर्षेपर्यंत सर्व धर्मांच्या पंडितांची सभा भरवून धर्माचरणाबद्दल वाटाघाटी केल्या. औरंगजेब बादशहा याचें खाजगी आचरण अत्यंत पवित्र असे. गाणें-बजावणें करण्यांत ५० वर्षांच्या त्याच्या कारकीर्दींत त्यानें एक पैसा देखील खर्च केला नाहीं. तो आपल्या खाजगी वेळांत टोप्या शिवीत असे, आणि त्या विकून जे पैसे आले ते त्यानें आपल्या उत्तर क्रियेकरितां सांठवून ठेविले होते. अशा धर्म कृत्याकरितां रयतेचा पैसा खर्च करणें हें पाप होय असें तो मानीत असे. अरब लोक फार शूर आणि त्यांच्यामध्यें शिक्षणाचा प्रसार नाहीं ह्यामुळें आडदांड अशा स्थितीत होते ज्यांचा ते लोक पगार खातील आणि नोकरी करतील त्यांच्याशीं कधींही बेइमान होणार नाहींत, अशी त्यांची ख्याति. हिंदुस्थानांतील सर्व अरबांचा एक सारखा पोषाख, तो अशाकरता कीं, एक अरब दुसऱ्या अरबाला कधींही ठार मराणार नाहीं. उदाहरणार्थ, निजाम आणि नागपूरकर भोसले हे एकमेकांचे शत्रू होते. दोघांच्याही पदरीं अरब होते. परंतु हातघाईची लढाई होई तेव्हां विरुद्ध बाजूचे अरब एकमेकांना कधींही ठार मारणार नाहींत अशा शर्तीवर ते नोकरीस रहात असत. जर संस्थानिकांनीं त्यांना लष्करी खात्याचा युनिफार्म दिला तर, ते येण्याला तयार नव्हते, याकरितां तोफखान्यांत किंवा गार्दी पलटणींत ते नोकरी करण्याला तयार नव्हते. कारण पोशाखावरून एका अरबाला दुसरा अरब ओळखतां यावा, आणि एका अरबानें दुसऱ्या अरबावर घाव घालावयाचा नाहीं, असा नियम ते अद्यापि पाळतात. पेशव्यांच्या सैन्यांत समशेरबहाद्दर आणि त्याचा मुलगा अलीबहाद्दर हे मुसलमान असून आपल्या हिंदु धन्याच्या हितसंबंधाला जपण्याकरितां ते अत्यंत इमानानें वागत. राणाखान भिस्ती यानें महादजी शिंद्याची नौकरी अत्यंत इमानानें केली. शेवटच्या दोन पेशव्यांच्या कारकीर्दींत शामीरखान रोहिला ह्या मुसलमानी सरदारानें पेशव्यांची नौकरी अत्यंत इमानानें केली. असे मुसलमानामध्यें उत्तम गुण होते. त्याची उदाहरणें वर दिली आहेत तीं होत.

आतां मुसलमानामुळें जे दोष मराठ्यामध्यें शिरले ते दाखविणें जरूर आहे. मुसलमानी राज्यकर्त्यांनी जमीन महसूल शेतकऱ्यापासून जास्त घेण्याची पद्धत सुरू केली. त्या पद्धतिमुळें मराठे देखील तसाच जमीन महसूल जबरदस्त घेत असत त्यावेळीं पैसा अत्यंत महाग होता व जमीन महसूल जबरदस्त असल्यामुळें मराठा सरंजामदारांचें उत्पन्न वसूल होण्यास अत्यंत त्रास पडत असे. ह्यामुळें बरीच जमीन पडीत रहात असे. सबब मराठा शिलेदार असा विचार करी कीं, लष्करी नौकरीकरितां आपण जमीन पत्करावी. यदाकदाचित् रणांगणावर आपण पडलों तर, आपली बायकामुलें ही जमीन खाऊन पोट भरतील. लष्करी नौकरीकरितां जी जमीन इनाम देण्यांत येत त्या जमिनीबद्दल सरकारला कांहीं एक वसूल द्यावा लागत नसे. हल्लींप्रमाणें चौथाई, नजराणा, मामुलजुडी किंवा लोकलफंड हे कर इनाम जमिनीवर त्यावेळीं बसविण्यांत येत नसत. तस्मात् सैन्यभरती सुलभपणें होण्याचें कारण (१) पैशाची टंचाई (२) सैन्यांतील अंमलदार आपल्या कामांत फार हुशार असत. त्यांच्या हाताखाली इमानें इतबारे नोकरी करून मरून जाणे यांत शिलेदार लोक धन्यता मानीत. (३) मराठ्यांच्या घोडदळाची स्थिति सुटसुटीतपणाची होती, मोंगलाप्रमाणें बरोबर फारसा लवाजमा बाळगावयाचा नाहीं, (४) गनिमी काव्याच्या पद्धतीनें शत्रूला हैराण करून सोडण्याची कुशलता मराठ्यांत उत्पन्न झाली होती, (५) शेजारीपाजारी लुटीवर श्रीमंत होऊन मोहिमेवरून परत येत, आणि लफ्फेदार पागोटी घालीत हे पाहून आपणही असेंच शिलेदार बनावें अशी प्रत्येक तरूणाला १७ किंवा अठराव्या वर्षी ईर्षा उत्पन्न होई. (६) पुष्कळ दिवस लढाईचा अनुभव असलेले लोक रणांगणावर जाऊं लागले म्हणजे आपणही त्यांचें शिष्यत्व पत्करून त्यांच्याच सारखे शौर्य संपन्न व्हावें, अशी हौस प्रत्येक तरूण मराठ्यामध्यें उत्पन्न होत असे. त्यामुळें प्रत्येक उंबरठ्यागणिक एक घोडेस्वार मराठ्यांच्या घोडदळांत दाखल होण्यास मोठ्या हौसेने निघत असे. त्यावेळीं पांढरपेशा लोकांमध्यें एकत्र कुटुंब पद्धति सुरू होती.

एकत्र कुटुंब पद्धतींतील जो कर्ता पुरुष तो हरहुन्नरी होत असे. कुटुंबांतील सर्व माणसावर त्याचा वचक असे. आणि त्यांच्या शीलाला भ्रष्ट होण्यापासून प्रत्येक पुरुषाचा बचाव ह्या कर्त्या पुरुषाकडून होत असे. निरनिराळ्या स्वभावाची माणसें वागवून घेणें व कुटुंबांत सलोखा राखणें हीं अवघड कामें त्या कर्त्या पुरुषाकडून होत असत. रणांगणावर सेनापतीचें काम जितकें अवघड तितकेंच एकत्र कुटुंबांतील कर्त्या पुरुषाचें काम अवघड असे. ह्या कर्त्या पुरुषाचें शिक्षण जरी लिहिणें वाचणें व हिशेब करणें ह्या पलिकडे जात नसे तरी कोणत्याही संस्थानांत दिवाणाच्या कामावर नेमणूक करण्यास लायक असा हा कर्ता पुरुष असे. ह्या कर्त्या पुरुषांची मदत मराठा वीर पुरुषांला होत असल्या-

मुळें दोघांच्या मदतीनें मोठें कार्य होत असे. हे कुटुंबांतील कर्ते पुरुष ब्राह्मण जातीचे असल्यामुळें मराठ्यांच्या शौर्याचें, शक्तीचें आणि युक्तीचे संमेलन होऊन मराठा साम्राज्यरूपी मोठे कार्य घडून आलें. या तत्त्वावर पुढील श्लोक यथार्थ लागू पडतो.

॥ ब्राह्मण्यनुपमा दृष्टिः । क्षात्रम प्रतिमं बलम् ॥
॥ तौ यदा चरतः सार्धम् । तदा लोकः प्रसीदति ॥

पुढें दिलेली नांवें व त्यांचे पराक्रम मराठ्यांच्या कीर्तीत भर घालणारे होते.

१ दादोजी कोंडदेव मलठणकर	१ नारो महादेव इचलकरंजीकर
१ मोरा त्रिमल पिंगळे	१ शिवराम हरी झांशीकर
१ बाळाजी आवजी चिटणीस	१ भास्करराम पंडीत कोल्हटकर
१ बाजी प्रभु देशपांडे	१ कोन्हेरराव कोल्हटकर
१ रावजी अप्पाजी फणसे	१ महिपतराव दिनकर गुप्ते
१ बाबाजी अप्पाजी फणसे	१ तात्या जोग किबे
१ विठ्ठलराव देवाजी दिघे	१ विठ्ठल सुंदर
१ रामचंद्रपंत बाबा सुखठणकर	१ सखाराम भगवंत बोकील
१ नारो श्रीपत पागेदार	१ बाळाजी जनार्दन भानू
१ जिवबा दादा बक्षी	१ गोविंद हरी पटवर्धन
१ लखबा दादा लाड	१ रामचंद्रपंत पंतआमात्य
१ शंकराजी नारायण सचिव	१ रत्नाकरपंत राजाज्ञा
१ रेठरेकर पितापुत्र	१ मुद्गलशास्त्री पंडितराव
१ खंडेराव हरी भालेराव	१ रामशास्त्री प्रभुणे
१ बाळोबा तात्या पागनीस	१ सरदार रेशिमवाले
१ परशराम त्रिंबक प्रतिनिधि	१ गंगाधर यशवंत चंद्रचूड
१ धोंडोपंत गोखले	१ त्रिंबकराव मामा पेठे
१ नरहर गणेश गोखले	१ गोविंदपंत बुंदेले
१ हरीपंत फडके	१ अंबाजीपंत पुरंदरे

हीं इतकींच नांवें उदाहरणा दाखल दिलीं आहेत. परंतु ह्या संख्येपेक्षां तिप्पट चौपट नांवें अजूनही देतां येतील. त्या सर्वांचा इतिहास विद्वान् लोकांना माहीत आहेच. जोपर्यंत मराठा शिलेदार आणि त्याचा कारभारी यांचे सहकार्य होतें, तोंपर्यंत मराठ्यांना प्रत्येक ठिकाणीं यश येत गेलें. पुढें पुढें मराठ्यांनीं आपली लढण्याची पद्धत बदलली तेव्हां कवायती कंपू आणि तोफखाना ह्यावर जास्त भिस्त असल्यानें हे कारभारी लोक निस्तेज झाले. त्यामुळें पहिली घडाडी नाहींशी झाली, आणि मराठ्यांचा आत्मविश्वास बुडाला, त्यामुळें युरोपियन लोकांना मराठी साम्राज्य बुडविण्याला सोपें गेलें.

पैशाची टंचाई मराठा वीर पुरुषांना प्रथमपासून शेवटपर्यंत होती. यामुळें लुटीवर पोट भरून सरासरी जीव जगवावयाचा आणि कामगिरीवरून परत आल्यावर खंडणीच्या पैशांतून सावकाराच्या व्याजाचे कांहीं हप्ते पोंचत असत, यामुळें सावकाराला दम धरवत असे. अशी ही स्थिति वरकरणी जरी भरभराटीची होती तरी आंतून कीड लागून पोखरल्याप्रमाणें मराठ्यांची दुर्बळ अवस्था दिवसें दिवस वाढत चालली होती.

युरोपियन लोकांमध्यें ज्या सेनापतीनें लहान लहान हुद्याची कामें करून पुष्कळ लढाया जिंकल्या व पुष्कळ अनुभव मिळविला, अशानांच मुख्य सेनापती नेमीत असत. पेशव्याकडेही प्रथम प्रथम अशीच स्थिति होती. मल्हारराव होळकर किंवा जयाजी, दत्ताजी शिंदे हे प्रथम प्रथम सीनियर अंमलदाराच्या हाताखालीं युद्धकलेमध्यें तरबेज झाले, तेव्हांच ते मुख्य सेनापतीचे काम करू लागले. मिरज येथील गोविंद हरी पटवर्धन हे प्रथम इंद्रोजीराव कदम सापकर यांच्या तालमींत तयार झाले. इचलकरंजीचे सरदार जोशी व कुरुंदवाडचे पटवर्धन सरदार हे कापशीच्या घोरपडे सरदारांच्या तालमीत तयार झाले. पुरुषोत्तम कृष्ण मंगळवेढेकर हे आपले चुलते गोविंद हरी पटवर्धन ह्यांच्या तालमीत तयार झाले. गोपाळ गोविंद पटवर्धन हे पुरुषोत्तमराव दाजी ह्यांच्या तालमीत तयार झाले. परशराम रामचंद्र पटवर्धन हे गोपाळ गोविंद पटवर्धन यांच्या तालमींत तयार झाले. जीवबा दादा बक्षी हे राघोबा दादाच्या बरवे नांवाच्या सरदाराच्या तालमींत तयार झाले. दिल्ली येथील सरदार खंडेराव हरी भालेराव किंवा रावजी अप्पाजी फणसे हे प्रथम महादजी शिंद्याच्या तालमींत तयार झाले. परंतु पुढें १७९३ सालीं रावजी अप्पाजी हे गोविंदराव गायकवाडाकडे कायमचे नोकरीस आले. अशा प्रकारे सर्व तेजस्वी मराठे सरदारांच्या गुरुस्थानीं दुसरे जास्त लायक लोक होते, हें शोधून काढणें फारसे कठीण नाहीं. परंतु युरोपियन लोकांप्रमाणें लष्करी शिस्त मराठ्यांकडे नव्हती. यामुळें मराठे सरदारामध्यें मोहिमेवर गेले तरी, नेहमी आपसांत तंटे होत असत. यामुळें खाशापैकीं कोणी सेनापती नेमिला म्हणजे तो तंटे तोडण्यास उपयोगी पडे. कारण तो धन्याचा मुलगा किंवा भाऊ म्हणून त्याचा हुकूम हाताखालच्या सरदारास मान्य करणें भागच पडे. राघोबा दादा पेशवा १६ वर्षांच्या वयांत मुख्य सेनापती होऊन उत्तरेकडे स्वाऱ्या करूं लागला तो या नियमामुळेंच. वास्तविक राघोबा सेनापतीच्या कामाला मुळीच लायक नव्हता. त्याच्या हाताखालील सरदार मल्हारराव होळकर, जयाजी आणि दत्ताजी शिंदे हे कुशल असल्यामुळें धन्याचा बोज राखून पेशव्यांची मसलत बिघडूं देत नसत, हा त्यांच्या अंगीं चांगला गुण होता. १७५७ सालीं शिंदखेडच्या लढाईत विश्वासराव पेशवा मुख्य सेनापती होता त्यावेळीं त्याचें वय फक्त १६ वर्षांचेंच होतें. वास्तविक युद्धशास्त्राचा अनुभव विश्वासरावाला

कांहींएक नव्हता. परंतु धन्याचा मुलगा म्हणून हाताखालचे सरदार त्याला मान देत असत.

पेशव्यांच्या उदयकाळीं हल्लींप्रमाणें ब्राह्मणब्राह्मणेतर वाद मुळींच नव्हता. किंवा ज्याला ब्रह्मद्वेष किंवा सत्यशोधक समाज म्हणतात असल्या भानगडी त्यावेळीं मुळींच नव्हत्या. शाहू छत्रपति फार तेजस्वी पुरुष होता. आणि तो आपणा स्वतःला खरा क्षत्रीय समजत असे. १७४५ सालीं त्यावेळीं ब्रह्मेंद्रस्वामी मृत्यु पावले त्यावेळीं संन्याशाला पुरण्याचे वेळीं शंखानें त्याचे डोकें फोडावें लागते. स्वामींचा जो पट्टशिष्य असेल त्यानेंच हें कृत्य करावयाचे असते. त्यावेळीं शाहूनें स्वतः ब्रह्मेंद्रस्वामींच्या डोक्यावर शंख मारिला. कारण मी पट्टशिष्य अशी शाहूची समजूत होती. वास्तविक ब्राह्मण संन्याशाच्या प्रेताला मराठ्याला शिवूं द्यावयाचे नाहीं अशी त्यावेळीं ब्राह्मण समाजाची मनःस्थिति होती. परंतु त्यावेळीं कोणत्याही ब्राह्मणानें शाहूला हरकत केली नाहीं. ब्रह्मेंद्रस्वामींची दरसालची पुण्यतिथी किंवा तेराव्यापर्यंतची उत्तरक्रिया ही करण्याचे अधिकार जरी निरंतर वंश परंपरेनें ब्राह्मण शिष्य जगन्नाथ चिमणाजी भागवत यांच्याकडे चालविण्यास शाहूनेच मंजुरी दिली तरी, हे सर्व कृत्य शाहू छत्रपतीला नाखुष न करतांच समाप्त झाले.

खंडेराव दाभाडे हे मराठे सरदार होते. त्यांनीं प्रथम श्रावण मासची दक्षिणा आपल्या संस्थानांत सुरू केली. ही दक्षिणा फक्त ब्राह्मणानांच देण्यांत येत असे. हल्लींप्रमाणें वेदोक्ताचा वाद त्यावेळीं नव्हता किंवा क्षात्र जगद्गुरूंची पदवीहि कोणी निर्माण केली नव्हती. दाभाड्यांचें वर्चस्व कमी झाल्यावर ही दक्षणा पुढें पेशवाई बुडेपर्यंत पेशव्यांनीं चालविली, व १८४० सालानंतर गायकवाडांच्या खजिन्याची स्थिति सुधारल्यानंतर गायकवाडांनीही दक्षिणा सुरू केली. पुढें कांहीं वर्षांनीं बडोदे येथें खिचडी देण्याची चाल फक्त महाराष्ट्रीय भिक्षुक ब्राह्मणापुरतीच सुरू झाली. ही गुर्जर देशच्या ब्राह्मणांना मिळत नसे, यावरून ब्रह्मद्वेष हा शब्द देखील मराठी भाषेंत त्यावेळीं नव्हता. जे कर्तबगारीचे पुरुष कारभारी म्हणून नेमिले जात ते लांचलुचपतीच्या मोहाला बळी पडत नसत, आणि कितीही संकटें सोसावीं लागली तरी, आपल्या धन्याचें काम बिघडूं देत नसत. अशी जोंपर्यंत स्थिति होती तोंपर्यंतच मराठे वीर पुरुष आपल्या तेजानें चमकले. १८०८ सालीं यशवंतराव होळकराला वेड लागल्यानंतर त्याला कोंडून ठेवण्यांत आलें. त्या नंतर त्याची रक्षा तुळसाबाई हिनें मल्हारराव नांवाचा मुलगा दत्तक घेऊन कारभार चालविला होता. ही तुळसाबाई जरी दुर्वृत्त होती तरी अत्यंत हुशार होती. सरदार किबे यांचा मूळ पुरुष तात्या जोग ह्यासारखा हुशार कारभारी नेमून तिनें नऊ वर्षें संस्थानचा कारभार हांकला त्यावेळी होळकर सरकारचा मुलूख फार दूर ठिकाणीं पसरलेला होता, आणि

सर्व प्रांतांत अत्यंत अंदाधुंदी होती. संस्थानचा वसुल दरसाल दहा लक्ष सुद्धां नव्हता. तरी तात्या जोग यानें १८ वर्षेपर्यंत राज्यकारभार सुरळीत चालविला इतकेच नव्हे तर, १८१७ सालीं होळकरांच्या सैन्यांत इतकी अंदाधुंदी माजली असतां त्या कारभाऱ्यानें होळकर संस्थानचा उत्तम बोज राखिला. तात्या जोग १८२६ सालीं वारला. तात्यांची विशेष बहादुरी म्हणजे तुळसाबाईसारख्या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या बाईच्या हाताखालीं उत्तम काम केलें ही होय. बडोदें संस्थानांत १८०१ सालीं रावजी अप्पाजीसारखा प्रभु दिवाण होता. त्याच्या हुशारीमुळेंच तैनाती फौजेचा तह खंबायत येथें घडून आला. यामुळें बडोदें राज्य कायम टिकलें. महादजी शिंद्याच्या तालमींत तयार झालेला खंडेराव हरी भालेराव हा देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण होता. देशांत सर्वत्र अंदाधुंदी चालली असतांना शिंद्यांच्या वतीनें दिल्ली शहराचा बंदोबस्त खंडेरावानें फार उत्तम ठेविला होता. १७९७ सालीं तो मयत झाला. त्याची पवित्र इच्छा अशी होती कीं, शेवटीं चतुर्थाश्रम घेऊन नदीच्या डोहांत जिवंत समाधि घ्यावी. त्याप्रमाणें त्यानें आपली इच्छा पूर्ण केली. हिंदुस्थानच्या दुर्दैवानें उत्तम कार्यकर्ते पुरुष यांना आपण लवकर मरावे अशी इच्छा झाली. आज धार संस्थानचा वसूल अकरा लाख रुपये आहे परंतु तें धार संस्थान १८५८ साल अखेर संपूर्ण खालसा झालें होतें, त्याचा बचाव करण्यास एक ब्राह्मण मुत्सद्दी उपयोगी पडला. इंदूरचे सरदार रेशीमवाले हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. ज्यावेळीं १८५७ सालचें बंड उत्तरेत उत्पन्न झालें त्यावेळीं धार संस्थानचा पवार राजा कॉलरा होऊन मरण पावला. त्याचा मुलगा गादीवर बसला परंतु धार संस्थानचें सर्व सैन्य बेलगामी होऊन शिपायांच्या बंडांत सामील झाले. जुना राजा किंवा नवा राजा यांच्या परवानगीनें हें सैन्य बंडवाल्याला मिळाले नाहीं. शिपायांचें बंड मोडल्यानंतर व्हिक्टोरिया राणीचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला त्या जाहिरनाम्यानंतर लॉर्ड कॅनिंग गव्हर्नर जनरल यानें धार संस्थान संपूर्ण खालसा केल्याबद्दल जाहीरनामा प्रसिद्ध केला. परंतु पवार संस्थानिकांच्या वतीनें उत्तम प्रकारची कैफियत सरदार रेशिमवाले यांनी मराठींत तयार केली. त्यावेळीं इंग्रजी शाळा स्थापन झाल्या नव्हत्या, किंवा धार येथून मुंबईकडे जाण्याला आगगाड्या नव्हत्या. तरी देखील सरदार रेशीमवाले यांनीं उत्तम कैफियत तयार केली होती. तिचें भाषांतर इंग्रजींत करून गव्हर्नर जनरल कडे टपालांतून अर्ज पाठवून दिला. लॉर्ड कॅनिंग हा फार न्यायी अंमलदार होता त्यानें ती कैफियत वाचिली आणि जरी कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांच्या मंजुरीनें धार संस्थान खालसा झालें होतें, तरी गव्हर्नर जनरल यानें पूर्वीचा हुकूम रद्द करून धार संस्थान कायम राखण्याकरितां दुसरा जाहीरनामा प्रसिद्ध केला.

हिंदुस्थानांतील सतीची चाल बंद केल्याबद्दल लॉर्ड वुइल्यम बेंटिंक यांच्या कर्तबगारीची फार मोठी वाहवा झाली. तितक्याच योग्यतेचें काम बडोदें संस्था-

नांत विठ्ठलराव देवाजी दिघे ऊर्फ काठेवाड दिवाणजी यांनीं करून दाखविलें. त्यांची योग्यता बेंटिंकच्या इतकीच मानिली पाहिजे. काठेवाडांतील रजपूत जातीमध्यें मुलगी जन्माला आल्याबरोबर तिचें नरडें दाबून प्राण घ्यावयाचा अशा प्रकारे वाईट चाल होती. परंतु विठ्ठलराव दिघे यांनी असामान्य मनोधैर्य दाखवून ही चाल सक्तीनें बंद केली. आणि हा गुन्हा करणारांना तुरुंगवासाची शिक्षा देण्याला सुरुवात केली. ह्या विठ्ठलरावाचें वर्तन इतकें निष्पाप होतें कीं, आणि काठेवाडांतील लोकांवर त्याची इतकी जरब होती कीं ब्राह्मण लोक जशी गायत्रीची शपथ पूज्य मानतात तशी काठेवाडांतील लोक ह्या विठ्ठलरावाची नांवाची शपथ मोडण्याला धजत नसत. बडोदें संस्थानांत अरब लोकांच्या सैन्याचा फार त्रास झाला. आणि दिवाण रावजी अप्पाजी यास जेव्हां समजलें कीं, इंग्रजांची मदत आणल्याशिवाय ह्या अरबांचें बंड मोडणार नाहीं! आणि अशा प्रकारच्या तहाच्या वाटाघाटी करण्याकरतां रावजी अप्पाजी दिवाण पेटलाद तालुक्यांतून वरचेवर खंबायत येथें जातो; ही बातमी जरी गुप्त ठेवण्यांत आली होती तरी, अरब शिपायांना ती समजण्यास वेळ लागला नाहीं. कारण बडोदें येथील काहीं ग्राम कंटक लोक अशा बातम्या उजेडांत आणण्यांत फार हुशार असत. त्यांच्याकडून ती बातमी अरबांना समजली. अरब सैनिकांनीं जेव्हां असे पाहिलें कीं, इंग्रजी सैन्याची मदत घेऊन हा दिवाण, अरबांची डोकीं फोडण्याची मसलत करीत आहे, तेव्हां एके दिवशीं खंबायतेहून परत आल्यावर बडोदें शहराजवळ रावजी अप्पाजी पालखींत बसून येत असता, बंडखोर अरबांनीं त्याच्या पालखीचे सर्व भोई गोळ्या घालून ठार मारिले. आणि रावजीला कैद करण्याचा प्रयत्न केला. परंतु दुसरे शिपाई मदतीला आल्यामुळें त्यावेळी रावजी अप्पाजी कैद झाला नाहीं.

नागपूरच्या भोसल्यांचे पदरी महिपतराव दिनकर गुप्ते नांवाचा हुशार मुत्सद्दी होता. त्यानें फार इमानानें आपल्या धन्याची नौकरी बजाविली, वेळ पडेल तेव्हां तलवार घ्यावी, आणि वेळ पडेल तेव्हां लेखणी चालवावी अशा प्रकारें पंचेचाळीस वर्षांची ह्या महिपतरावाची कारकीर्द फार यशस्वी झाली. याला सव्यसाची म्हणावयास हरकत नाहीं. अशाप्रकारें नररत्नांची हकीकत देत बसलों तर आणखी शेंकडों दाखवितां येतील. परंतु मराठी साम्राज्याच्या पडत्याकाळीं दिवसेंदिवस गादीवर बसणारे संस्थानिक दुर्बळ बनत चालले आणि इंग्रजांच्या पंखाखालीं संस्थानिक गेल्यामुळें अशा पुरुषांची जरूर त्यांना राहिली नाहीं. गोविंदराव गायकवाड चोवीस वर्षें विपत्ति भोगीत असतांना शेवटीं शेवटीं रावजी अप्पाजी यांची त्यांना इतकी मदत झाली कीं, गोविंदरावांनीं आपली कारकीर्द संपेपर्यंत कृतज्ञतेनें त्यांना दिवाण नेमिले. "गोविंदरावांनीं आपल्या कातड्याचे जोडे तयार करून जरी रावजीच्या पायांत घातले तरी रावजीचे उपकार फिटणार नाहींत." अशाप्रकारची गोविंदरावांचीं स्वदस्तूरची पत्रें रावजीच्या

दत्तक वंशजापाशीं अद्यापिहि पहावयास मिळतील. परंतु मराठे सरदार युरोपियना· प्रमाणें वचनाचें पक्के नसत, ह्याचें उदाहरण गोविंदरावाचेंच दाखवितां येईल. १७९२।९३ सालीं दक्षिणेंतून बडोद्यास येत असतांना गोविंदराव व रावजी अप्पाजी सिनौर शहराजवळ नर्मदा नदी ओलांडून येत असतांना दोघेहिजण एकाच मचव्यांत बसले होते. त्यावेळी मचव्यांत बसून नर्मदेचें पात्र ओलांडण्याला एक घटका इतका वेळ लागत असे. उत्तर कांठीं उतरल्यानंतर गोविंदरावांनीं रावजी अप्पाजी यास सांगितलें कीं, जे वचन नर्मदा नदीच्या दक्षिण तीरावर दिलें, तें वचन उत्तर तीरावर आल्यावर आम्ही खरें करुं असें समजू नका. ज्या गोविंदरावानें अत्यंत विपत्ति भोगिली, आणि ज्यानें उत्तम मुत्सद्यांचा संग्रह केला त्या गोविंदरावाची ही स्थिति तर इंग्रजांनीं शांतता प्रस्थापित केल्यानंतर संस्थानिकांची सांपत्तिक स्थिति पुष्कळ सुधारली. अशा वेळीं वचनभंगाचीं अशी शेंकडों उदाहरणें घडली तर, त्यांत नवल कसलें ?

मराठयांच्या उदयाची कारणें काय होती ह्याचें उपसंहारात्मक टिपण केलें तर, ते पुढीप्रमाणें होईल.

(१) जोंपर्यंत घोडदळाची धडाडी होती आणि गनिमी काव्याची लढण्याची पद्धत होती तोंपर्यंत मराठा शिलेदारांत आत्मविश्वास जबरदस्त होता.

(२) पैशाची टंचाई असल्यामुळें जमीन महसूल भरतेवेळी शेतकऱ्यांचे डोळ्यांतून टिपे पडत, आणि अशा स्थितींत लष्करी नोकरी करितां वंशपरंपरेनें जमिनी मिळत त्या बायकामुलांचें पोषण करण्याला उपयोगी पडत, ह्यामुळें तरुण मराठा शिलेदार रणांगणावर मृत झाला तरी हरकत नाहीं, असें त्यास वाटे. पूर्वींच्या बखरींतून " रांडरोटी " हा शब्द वापरला आहे त्याचा अर्थ लढाईंत कामास आलेल्या शिलेदाराच्या विधवेला मरेपर्यंत अन्नाची वाण पडूं नये असा होतो.

(३) पांढरपेशे लोक हे एकत्र कुटुंबाचे कर्ते पुरुष असत ते कारभार करीत असले म्हणजे मराठा शिलेदाराला त्यांच्याशी सहकार्य करून आपण आपला बोज राखावा असे वाटे.

(४) पुढारी लोक लुटमार करण्याला हरकत घेत नसत ह्यामुळें आपणहि लुटमार करून श्रीमंत व्हावें असे प्रत्येक शिलेदारास वाटे.

(५) सनातन धर्मावर आस्तिक्यबुद्धि असल्यामुळें धारातीर्थी पतन पावल्यानें आपला आत्मा स्वर्गाला जाईल अशी प्रत्येक शिलेदाराची धर्मभावना असे.

(६) प्रत्येक उंबरठया गणिक एक घोडेस्वार मराठयांच्या घोडदळा· करितां निघत असे. अशावेळीं त्यांच्या भाऊबंदांतून किंवा आसेष्टांमधून जर

कोणी लढाईच्या भीतीनें घरीच बसून शेती करीत राहिला, तर त्याला समाजांत मान नसे. यामुळें शिलेदार होण्याची हौस उत्पन्न होई.

(७) कोणी तरी साधु पुरुष किंवा अवलिया किंवा एकादा महंत ह्याचा आपणास आशिर्वाद असला तर रणांगणावर आपल्याला खात्रीनें यश येईल, अशी प्रत्येक शिलेदाराची समजूत असे.

(८) ज्या शेतकऱ्याची गरिबी असे, त्यानें शाळुचा हुरडा खाऊन पूर्व वयांत जोरजोडी वगैरे तालीम करून शरीर कमवावें, व स्वाऱ्या शिकाऱ्यामध्यें श्रम साहस सहन करण्याजोगें शरीर असावें, म्हणून शील संपन्न व्हावेंच लागे. स्त्री संभोग फार मर्यादित असल्यामुळें अशाप्रकारें श्रमसाहस त्यांना सहन करणें सोपें पडे. वीर्य हा शरिरांतील राजा, त्याचा खर्च जितका कमी होईल तितकी शरीर प्रकृति उत्तम राहील. असे प्रत्येक शिलेदार जपत असे.

(९) सकाळीं प्रातर्विधी झाल्यानंतर घोड्याच्या रिकिबींत पाय ठेवला, आणि पायजमा घालून वर काचा आवळला म्हणजे सकाळीं अकरा वाजेपर्यंत ज्या ठिकाणीं स्वयंपाक पाणी करून घोड्याला खाणेंपिणें घालावयाचे, त्या ठिकाणीं पोंहोंचेपर्यंत, लघुशंकेकरितां देखील खाली उतरावयाचे नाहीं ही शरीराची अवस्था मर्यादित स्त्री संभोगामुळें प्राप्त होते.

(१०) चोवीस तासांत एकदांच स्वयंपाक करून जेवण करावयाचें. ह्याखेरीज इतर वेळेला भूक देखील लागावयाची नाहीं, अशी शरीराची सुस्थिति असे. फक्त तंबाखू खाण्याकरितां किंवा गुडाखू ओढण्याकरितां वेळ गमाविला जाई तेवढाच. अशी सुस्थिति असे.

(११) घोड्याची चाकरी स्वतः करावी लागे, व घोड्याचें खाणेंपिणें होत आहे तोंपर्यंत घोड्यावरचा गाशा पसरून गुडघ्यांत पाय दुमटून तीन हात गाशावरच जितकी झोंप घ्यावयास मिळे तितकी विश्रांति पुरी होई. ही शरिराची स्थिति, मर्यादित स्त्री संभोगामुळें येत असे. शील संरक्षणामुळें आत्मविश्वास फार मोठा असे.

(१२) कर्त्या पुरुषांचे आंगी धन्याविषयीं स्वामीनिष्ठा फार होती हें कारण अभिवृद्धीचे बाबतींत अतिशय मोठें होतें. सन १७६३ सालीं राक्षस-भुवनाचे लढाई नंतर रावोबादादा उत्तरेत स्वारीवर गेला असतांना पुणें येथें माधवराव बल्लाळ पेशवा आपल्याच जबाबदारीवर सर्व कामें मोठ्या हुशारीनें उरकीत होता. त्याचवेळीं कोल्हापूरचे छत्रपति संभाजीराजे मृत्यु पावले आणि त्यांना औरस पुत्र नसलेमुळें पेशव्यांचे मनांत कोल्हापूर सारखें लहानसें संस्थान दत्तक पुत्राकडे न चालवितां खालसा करून पेशव्यांचे मुलुखात सामील करावें व कोल्हापूर येथील राजकुटुंबांतील माणसांना नेमणुका ठरवून द्याव्यात. ही गोष्ट कोल्हापूर येथील संभाजी महाराजांची मानी राणी जिजाबाई इला मुळींच

आवडलें नाहीं. ती राणी स्वतः पुणें येथें येऊन भर दरबारांत माधवराव बल्लाळ पेशव्यासमोर उभी राहून तिनें असा पेशव्यांना प्रश्न केला कीं, " जर तुम्ही दत्तकाला परवानगी न देतां कोल्हापूर संस्थान खालसा करणार असाल तर तसें स्पष्ट सांगा म्हणजे मी आपल्या राजवाड्याला कोल्हापूरच्या लोकांकडून आग लावून देववीन व तो अंगारा कपाळी लावून काशीक्षेत्री जाऊन भिक्षा मागून पोट भरीन. पुन्हां कोल्हापुरास परत जाणार नाहीं. " हा प्रश्न ऐकून त्या तेजस्वी पेशव्याचें अंतःकरण दयेनें पाझरलें. आणि त्यानें स्पष्ट सांगितलें कीं " कोल्हापूर संस्थान आम्ही खालसा करणार नाहीं. तुम्हाला वाटेल तो मुलगा दत्तक घ्या. तुम्हाला सर्व प्रकारें मदत करण्याकरितां त्या भागाच्या प्रांत अंमलदारांना मी आताच हुकूम रवाना करितो. जसे साताराचे छत्रपती हे पेशव्यांचे धनी आहेत, तसेंच कोल्हापूरचे छत्रपती देखील पेशव्यांचे धनीच आहेत. सातारकर आणि कोल्हापूरकर छत्रपती ह्या दोघां धन्यांमध्यें आम्ही मुळीच भेदभाव पहात नाहीं. "

(१३) बाळाजी बाजीराव पेशवा ब्राह्मण होता तरी शाहू छत्रपतीचे जोडे उचलित असे. शाहू छत्रपतीच्या कृपेमुळें पेशवे मोठ्या योग्यतेस चढले. सबब ही स्वामिनिष्ठा किंवा कृतज्ञता कर्त्या पुरुषांमध्यें सदैव जागृत असे. महादजी शिंदे यांचा बाप राणोजी शिंदा बाजीराव बल्लाळ पेशव्यांच्या कृपेमुळें उदयास आला ही जाणीव शिंदे सरदारांमध्यें सदैव जागृत असे. १७६० सालीं जनकोजी शिंदा यानें सदाशिवराव भाऊ पेशव्यास असा जबाब दिला कीं " जेथें धन्यांचा जोडा पडेल तेथें माझें मुंडकें खात्रीनें पडेल. " याची सत्यता पानिपतच्या रणभूमीवर दिसोन आली. महादजी शिंदा यानें १७९३ सालापर्यंत सवाई माधवराव पेशवे यांचे जोडे उचलले होते याचा दाखला सापडला आहे. सन १७७६ सालापासोन पुरंदर किल्ल्यावर सवाई माधवराव पेशवा यांचे संगोपन करण्याची जबाबदारी नाना फडणीसाचे हुकमानें पुरुषोत्तम कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर याचेवर होती. त्याचें टोपण नांव दाजी असें होतें. ह्या दाजीनीं तळहातावरच्या फोडाप्रमाणें सवाई माधवराव पेशव्याचें संगोपन करण्यांत दक्षता बाळगिली होती. डोळ्यांत तेल घालून पहारा करण्याचें काम त्यानीं केलेलें होतें. दाजीचें उतार वय झाल्यानंतर त्यानीं आपले स्नेही सोबती यांचेजवळ आपली शेवटची इच्छा काय आहे हें बोलून दाखविलें होतें. " माझी इच्छा अशी आहे कीं हें बाळक (सवाई माधवराव) मोठें झालें व स्वतः लढाईवर जाऊं लागलें म्हणजे त्या धन्याच्या दृष्टीसमोर रणांगणावर माझे शरीराची खांडोळी झाली म्हणजे मी कृतकृत्य झालों असें समजेन. " याचे नांव खरी स्वामिनिष्ठा.

(१४) कुलदेवतेवर केवढी जाज्वल्य निष्ठा असे याची दोन उदाहरणें दिलीं तर या ठिकाणीं वावगें होणार नाहीं. (अ) माधवराव बल्लाळ पेशवे यांची

कुलदेवता गजानन यावर अत्यंत निष्ठा होती. सन १७७२ साली थेऊर येथें हा पुण्यश्लोक पेशवा क्षयाचे आजारानें वारला. त्यावेळीं त्यानीं राजवैद्याजवळ आपली अशी शेवटची इच्छा बोलून दाखविली कीं " मी कांहीं आतां या दुखण्यांतून वाचत नाहीं हें निश्चित. मला शेवटचे क्षणापर्यंत गजाननाचें स्मरण रहावें म्हणोन वात होऊं नये अशी मात्रा मला द्या. म्हणजे शेवटच्या क्षणापर्यंत मला गणपती स्मरणाचा वियोग होऊं नये अशी तजवीज करा. " कफ, वात आणि पित्त यांना त्रिदोष अशी संज्ञा आहे. व प्रत्येकाला अंतकाळीं हा त्रिदोष झाल्याखेरीज मरण येत नाहीं असें शास्त्र सांगतें. (ब) इसवी सन १८०० सालीं मे महिन्यापर्यंत जेव्हां रामचंद्र परशुराम पटवर्धन यानीं कोल्हापूर शहराला वेढा दिला होता, त्यावेळीं छत्रपतीचा इमानी ब्राह्मण सेनापती रत्नाकरपंत राजाज्ञा यानें पन्हाळा किल्ल्यावर जाऊन छत्रपती पुढें उभे राहून अशी प्रतिज्ञा केली होती कीं " जोंपर्यंत हा रत्नाकरपंत जिवंत आहे तोंपर्यंत पटवर्धनांचें पाऊल कोल्हापूर शहराचे वेशीचें आत पडूं देणार नाहीं ही खात्री बाळगावी. " पुढें ही प्रतिज्ञा त्यानें खरी करून दाखविली. वैशाख शुद्ध षष्ठीचे दिवशीं पटवर्धनानीं वेढा उठवून पळ काढिला. नंतर दोन तीन दिवसानीं रत्नाकरपंतांचा कुळस्वामी जो देव जोतीबा ह्याचे डोंगरावर लोटांगणें घालीत रत्नाकरपंत वर चढून गेले. उन्हाळ्याचे दिवस. पंचगंगा नदीचें पात्र ओलांडल्यावर लोटांगणें घालणेस सुरुवात केली. डोंगरावर चढण्यास ओबड धोबड पाऊल वाट, कांटे कुटे खडे यांनीं वाट भरलेली. परंतु कुळस्वामीवर एवढी भक्ती कीं कितीही संकटें सोसावीं लागलीं तरी केलेला नवस फेडल्याखेरीज रहावयाचें नाहीं अशी शरीराची धडधाकट स्थिती होती.

(१५) त्या वेळचे मराठा जातीचे शिलेदार जरी अक्षरशत्रू होते तरी त्यांना दैवी संपत्तीचीं तीन उत्तम तत्त्वें वंशपरंपरेनेंच माहीत होतीः—

॥ अक्षरस्यापि शत्रवः निसर्गादेव पण्डिताः ॥
॥ ब्राह्मणानां तु पांडित्यं शास्त्रैरेवो पगम्यते ॥

त्यांचीं तीन तत्त्वें येणेंप्रमाणें होतींः—(१) ज्याचें मीठ भक्षण केलें त्याचे कार्याकरितां रणांगणावर मरण आलें म्हणजे जन्माचें सार्थक झालें. (२) ज्या सावकाराचें कर्ज न फेडतां बुडविलें असेल त्या सावकाराचे नरकांत किडा होऊन आपणास खितपत पडावें लागेल. व (३) अनेक श्रम साहसाचे प्रसंगातून जगून वाचून परत आपले मुला माणसांची गाठ भेट जर पुन्हा पडावयाची असेल तर आपलें निष्पाप आचरण शीलाचे बाबतीत असलें पाहिजे. म्हणजे आपण कासोट्याचे बळकट असलो तरच हें शक्य होईल. "

आतां पुढील प्रकरणांत मराठी साम्राज्याच्या नाशाचीं कारणें दिलीं आहेत, तीं देखील इतकीच महत्त्वाची आहेत असें दिसोन येईल.

मराठी राज्याच्या नाशाचीं कारणें.

The Robbers have founded the Maratha Empire and it was strengthened by Robbers.

महादेव गोविंद रानडे.

१८१९ सालीं मिस्टर मन्रो या नांवाच्या युरोपियन गृहस्थानें गव्हर्नर जनरलकडे एक रिपोर्ट केला. त्यांत हिंदुस्थानच्या संस्थानिकांच्या स्थिति संबंधानें एक हकीकत लिहिलेली आहे ती अशी:— " जर एखादा संस्थानिक दुर्वृत्त असला, तर त्याच्या हाताखालील शूर सरदार लोक किंवा शूर प्रजाजन बंड करून त्याला गादीवरून काढून टाकीत किंवा मारून टाकीत, अशी हिंदुस्थानांत स्थिति होती, परंतु अलीकडे इंग्रजांचे जबरदस्त सैन्य अशा संस्थानिकांच्या रक्षणाकरितां असल्यामुळें त्या संस्थानिकाविरुद्ध कोणाही शूर पुरुषाला बंड करतां येत नाहीं, अशी हिंदुस्थानांत दुरवस्था प्राप्त झाली आहे." हें मिस्टर मन्रोचें लिहिणें सर्वथैव चुकीचें आहे. हें मी आतां दाखविणार आहे. मिस्टर मन्रो यानें वर्णन केल्याप्रमाणें अशी संस्थानें हाताच्या बोटावर मोजण्याइतकी सुद्धां नव्हती. मिस्टर मन्रो याला १८१९ सालापूर्वींचा बरोबर इतिहास माहित नव्हता, यामुळें त्यानें असें विधान केलें आहे. नाशाची खरी कारणें काय आहेत हें पुढें दिल्याप्रमाणें:—

(१) " फुकट खावयास मिळावें हें भाग्याचें लक्षण " अशी ब्राह्मणांची चुकीची समजूत आहे. हा दोष केवळ ब्राह्मणांतच नाहीं तर मराठा व मुसलमान ह्यांतही होता.

(२) मिरासदारी हक्क म्हणजे सरंजाम हे वंशपरंपरेनेंच चालले पाहिजेत. मग अंगीं लायकी असो किंवा नसो. पुष्कळ वेळा कर्तबगार लोकांच्या पोटी लायक मुलगे निपजतातच असा कांहीं नियम नाहीं. यामुळें ह्या नालायक लोकांनीं धन्याचें काम बिघडविलें इतकेंच नव्हे तर, निरंतर कलागती सुरू ठेवून मराठी साम्राज्याची बळकटी मुळींच नाहींशी केली.

(३) परावलंबन–बंदुका आणि तोफा यांचा जास्त प्रचार सुरू झाल्यामुळें सोडा आणि गंधक या दोन पदार्थांबद्दल मराठ्यांना युरोपियन व्यापाऱ्यावर जास्त अवलंबून रहावें लागले. हे दोन पदार्थ आपल्याच देशांत तयार होतील अशी व्यवस्था मराठ्यांनीं मुळींच केली नाहीं. लोखंडी तोफा ओतण्याचे कारखाने मराठ्यांनीं सुरू केले होते, परंतु ते फारच अल्प प्रमाणावर होते. परावलंबनाचें ढळढळीत उदाहरण म्हणजे प्रसिद्ध गोलंदाज इब्राहिमखान गारदी ह्याचें होय. हा इब्राहिमखान फ्रेंच सरदार लाली याच्या तालमींत हुशार गोलंदाज म्हणून तयार झाला. त्याला जास्त पगार देऊन निजामअलीनें आपले चाकरीस ठेविलें.

त्याच्याही पेक्षां जास्त पगार देऊन सदाशिवराव भाऊ पेशव्यानें त्याला आपल्या चाकरीस ठेविलें. ह्याच इब्राहिमखान गारद्याच्या तोफखान्याच्या जोरावर १७६० सालीं उद्गीरची लढाई सदाशिवराव भाऊनें जिंकली व ह्याच इब्राहिमखानाच्या तोफखान्याच्या जोरावर पानिपतच्या मोठ्या लढाईंत गिलचे शत्रूंना मी जिंकीन अशी सदाशिवराव भाऊला घमेंड होती. सबब हाताखालच्या अनुभविक सरदारांची मसलत न ऐकता सदाशिवराव भाऊनें आपलाच हेका चालविला, आणि पानिपतावर शूर मराठ्यांची कत्तल होऊं दिली.

(४) मराठ्यांच्याकडे पैशासंबंधीं नेहमींच ठणठणाट अथवा नकार घंटा असे. जरी त्यांनीं लढाया जिंकल्या आणि तहनाम्यांत खंडणीचा आंकडा मोठा असला, तरी प्रत्यक्ष रक्कम तितकी त्यांच्या पदरांत पडत नसे. मोहिमेला खर्च झाला, त्या मानाने खर्च भरून येण्याला खंडणीची रक्कम रुपयांत आठ आणे देखील नसे. इतिहासकार सरदेसाई लिहितात. कीं " मराठ्यांच्या मोहिमा म्हणजे सर्व आंतबस्यांचे रोजगार असत ! " इतिहासकार राजवाडे लिहितात " मराठा शिलेदाराची दिनचर्या, म्हणजे वर्षांतून नऊ महिने वणावणा हिंडावे हाडांची काडें करावी, भुकेची वेळ भागविण्याकरितां पुरते शिजलेले अन्न मिळालें तरी वाहवा, अर्ध कच्चें मिळालें तरी वहावा." अशी दुःखास्पद स्थिति होती. लूटमार, जाळपोळ करून कोणीकडून तरी प्राण वांचवावयाचे. मोहिमेवरून जगून वाचून परत आले म्हणजे सावकारांचे व्याजाचा हप्ता देतील अशी सावकाराला आशा असे. म्हणून नेहमीं कामगिरीवर निघावें लागे.

(५) हल्लींचा उत्तम कायदे पंडीत होण्याला जशीं कायद्याची तत्त्वें (Legal maxims) ह्यांचें ज्ञान अवश्य असावें लागते, त्याप्रमाणेंच मराठ्यांच्या वेळीं पुढील तत्त्वें जो शिकला असेल तोच आपला बोज राखून अब्रूनें दिवस काढीत असे. तीं तत्त्वें येणेंप्रमाणें:—फंद फितूर, लांचलुचपत, दगाफटका, खेळखंडोबा, लांडीलबाडी, लूटमार, जाळपोळ, अशा प्रकारे हुशारी दाखविणारा जो पुरुष असे तोच खरा मुत्सद्दी.

(६) जसजसें मराठ्यांच्या तरवारीला यश मिळत गेलें तसतसें लूटमार करून आपण श्रीमंत व्हावें ही दुर्बुद्धि त्यांना झाली. त्याचा परिणाम (Nature's Revenge) पानिपतच्या रणांगणावर मराठ्यांना भोगावा लागला.

॥ देखोनी उदया तुझ्या द्विज कुळें गाती अती हर्षुनी ॥
॥ शार्दूलादिक सर्व हिंस्र दडती गिर्यंतरी जाउनी ॥
॥ देशी ताप परी जसा वरिवरी येसी नभीं भास्करा ॥
॥ अत्युच्चीं पदि थोरही बिघडतो हा बोल आहे खरा ॥

हा अर्थांतरन्यास मराठ्यांच्या बाबतींत तंतोतंत लागू पडतो. १७७२ साली, माधवराव बल्लाळ पेशव्यासारखा कर्तव्यनिष्ठ पुरुष जोपर्यंत मराठ्यांचा पुढारि

होता तोंपर्यंत सर्व वीर पुरुष आणि मुत्सद्दी यांना पेशव्यांचा दरारा वाटत असे. परंतु माधवरावाच्या नंतरचे तीन पुरुष दुर्बळ होते. यामुळें त्यांनीं नवीन संकटें उत्पन्न केली. शिवाजी छत्रपतींच्या वेळेपासून प्रभू लोकांच्या शौर्याचा आणि मुत्सद्दीपणाचा फायदा मराठ्यांनीं घेतला. परंतु नारायणराव पेशव्यासारख्या नालायक पुरुषानें प्रभू लोकांचे पुढारी पकडून आणिले, आणि त्यांना अटकेंत ठेवून उपास घातले. व प्रभू जातीत विधवांच्या पुनर्विवाहांची रूढी आहे असा लेख त्यानें जबरदस्तीनें लिहून घेतला. यामुळें प्रभू जात कायमची नाराज झाली, याचा परिणाम मराठ्यांना भोगावा लागला.

(७) मराठ्यांच्या आपसांतील लढाया:---मराठ्यांनीं शत्रूवर जय मिळविले त्यापेक्षां त्यांनीं आपापसांत लढून एकमेकांची शक्ति कमी केली, अशा लढायाच जास्त आहेत. रा. सरदेसाई लिहितात, शाहू छत्रपतीच्या कारकीर्दीला सुरुवात झाल्यानंतर मराठे सरदार, मानकरी व अष्टप्रधान यांचा धंदा असा होता कीं, शाहू साताऱ्याकडे असला म्हणजे मराठे सरदार कोल्हापुराकडे लुटालूट करीत असत. व ताराबाईचें राज्य मोडण्याकरितां शाहू कोल्हापूर प्रांतीं गेला असतांना मराठे सरदार सातारा प्रांतीं लुटालूट करीत असत. गुजराथेंत पिलाजीराव गायकवाड आणि कंठाजी कदम बांडे यांची लढाई होऊन पिलाजीचा पराभव झाला. आणि पिलाजीला मातर येथें पळून जावें लागलें. बाजीराव पेशवा आणि त्रिंबकराव दाभाडे यांची लढाई प्रसिद्धच आहे. राघोबा दादा पेशव्याला भास्करराव नांवाचा एक औरस पुत्र झाला होता, तो एक वर्षाचा असतांना त्याच्या नांवानें साताऱ्या छत्रपतीकडून प्रतिनिधिपदाची सनद राघोबानें घेतली होती, त्यामुळें पंत प्रतिनिधि आणि मुतालिक हे दोघेही सरदार नाखूष होऊन पेशव्यांच्या मुलुखांत लुटालूट करीत होते. दमाजीराव गायकवाडाचा पेशव्यांच्या सैन्यानें सातारा शहरानजिक १७५०।५१ सालांत पराभव केला होता. इंग्रजांच्या मदतीनें मराठ्यांच्या आरमारावरचा सरदार तुळाजीराव आंग्रे याचा पराभव पेशव्यानें केला. राघोबा दादा पेशवा आणि माधवराव बल्लाळ पेशवा ह्या चुलत्या पुतण्यांच्या लढाया १७६२ सालापासून सुरू झाल्या. घोडनदीच्या लढाईंत पटवर्धन सरदारांचे राघोबा दादाशीं लढतांना २५० स्वार रणांगणावर मारले गेले. १७६३ सालीं गोविंद हरी पटवर्धन याजकडून मिरज येथील भुईकोट किल्ला लढून घेण्याकरितां राघोबा दादा पेशव्यानें पांच आठवडे पर्यंत मिरजेस वेढा दिला होता. नागपूरकर जानोजी भोसले याला गोपाळ गोविंद पटवर्धन, मालोजी घोरपडे आणि निजामअल्ली यांनीं मदत केल्यामुळें १७६२ सालीं पुणें शहराची जाळपोळ केली. १७६८ सालीं चुलत्या पुतण्यांची लढाई धोडप येथें झाली, त्यांत राघोबा दादाचा पराभव झाला आणि राघोबादादा कैद झाला. आणि त्याचेबरोबर दमाजी गायकवाड आणि त्यांचा मुलगा गोविंदराव हे बाप लेक माधवरावांनीं कैद

केले. त्यानंतर जानोजी भोसल्यावर माधवराव बल्लाळ पेशव्यांनीं स्वारी करून त्याचा पराभव केला. सवाई माधवराव पेशवा याला गादीवर कायम करण्याकरितां बारभाईच्या सरदारांनीं राघोबादादाशीं आठ वर्षें लढाई चालू ठेविली होती, त्यांत पुष्कळ प्राणहानि झाली. नागपूरकर भोसल्यांचे दोघे मुलगे मुधोजी आणि साबाजी हे सावत्र भाऊ होते. आणि त्यांच्यामध्यें सहा वर्षें लढाया चालून पुष्कळ प्राणहानि झाली. शेवटी वऱ्हाडांत लढाई होऊन मुधोजीनें पिस्तुलाच्या गोळीनें साबाजीस ठार मारिलें, तेव्हां लढाई समाप्त झाली. १७९३ सालीं महादजी शिंद्याचा सरदार लखबादादा लाड या नांवाचा शूर सरदार, सारस्वत शेणवी जातीचा होता, त्याच्या हाताखालीं शिंद्यांचे कवायती कंपू होते. त्यांच्या मद्दतीनें रजपुतान्यांत लाखेरी येथें तुकोजी होळकराचा इतका क्रूरपणाचा पराभव झाला कीं, शेवटचा शिपाई मरेपर्यंत शिंद्यांच्या फौजेनें हत्यार चालविलें होतें.

वास्तविक शिंदे आणि होळकर हे दोघेहि एकाच खाविंदाच्या दौलतींतील सरदार असतांना, आणि नाना फडणवीस, सवाई माधवराव पेशवा, आणि महादजी ही कर्तबगारीचीं माणसें पुण्यास असतांना, तसेंच महेश्वरी अहल्याबाई हयात असतांना, लाखेरीच्या लढाईसारखी मराठ्यांना काळीमा आणणारी गोष्ट घडून यावी, हें मोठें लांछनास्पद आहे. शिंदे आणि होळकर यांच्यामध्यें मतभेद झाला असेल. किंवा खंडणीच्या वांटणीसंबंधीं दोघांचा तंटा उत्पन्न झाला असेल, तर पेशव्यांच्या दरबारांत ही फिर्याद दाखल करून निर्णय करवून घेणें कांहीं अशक्य नव्हतें त्याला लढाईचे कारण मुळींच नव्हतें. ह्या होळकराच्या पराभवामुळें अहल्याबाईला इतका संताप आला कीं, महादजी शिंद्यासंबंधानें पुढील उद्गार तिनें तीन वेळ बोलून दाखविलें. " मेला पुन्हां हिंदुस्थान पाहणार नाहीं, मेला पुन्हां हिंदुस्थान पाहणार नाहीं; मेला पुन्हां हिंदुस्थान पाहणार नाहीं. " ह्या अत्याचारानंतर अहिल्याबाईचें उतार वय झालें होतें तरी, ती स्वतः सैन्याबरोबर निघाली. नर्मदेच्या उत्तरेच्या प्रदेशाला मराठे लोक हिंदुस्थान असें म्हणत असत. पुढें ही भानगड पेशव्यांच्या दरबारी कळल्यावर हा तंटा फार विकोपास गेला नाहीं. अहिल्याबाईनें महादजी शिंद्याला जो शाप दिला त्याचा परिणाम महादजी शिंदे पुन्हा कधींहि उज्जयिनीला गेला नाहीं, आणि एक वर्षाच्या आंतच वानवडी मुक्कामीं मरण पावला. अहिल्याबाईनें ३० लाख रुपये कर्ज महादजी शिंदे याला पूर्वींच दिलें होतें. हें कर्ज कधींही फेडलें गेलें नाहींच. परंतु ह्याच्या पायी पुढें अनेक भानगडी झाल्या.

सवाई माधवराव पेशवा मेल्यानंतर मराठे सरदारांत जीं अनेक युद्धें झालीं त्यांत अतिशय प्राणहानि झाली. दौलतराव शिंदे याच्या दत्तकविधानानंतर महादजी शिंदे यांच्या विधवा आणि दत्तकपुत्र यांच्यामध्यें १७९७ सालापासून ४॥ वर्षें पर्यंत मोठीं युद्धें चाललेली होती. त्यांत जरी दौलतराव शिंद्यालाच सैन्याच्या

मोठेपणामुळें जय मिळत गेला तरी, दोन्ही बाजूच्या सैन्यानें रयतेची धूळधाण केली. लूटमार, जाळपोळ करून देखील दोन्ही सैन्यें आपलें पोट कसेंतरी भरीत असत. शेवटच्या बाजीराव पेशव्याला धनीपणा गाजविण्याची अक्कल नव्हती, यामुळें हा मोठा रक्तपात बंद करण्याला कांहीं साधन नव्हतें. पुढें इ. स. १८०० सालच्या मे महिन्यापासून यशवंतराव होळकर आणि दौलतराव शिंदे यांच्यामध्यें फार क्रूरपणाच्या लढाया एक वर्षपर्यंत चालू होत्या. त्यांत रक्ताचे पूर वहात होते. यशवंतराव होळकर यानें गोध्रा पंचमहालपासून आग्रा अलिगडपर्यंत ५०० मैल लांबीचा दौलतराव शिंद्याचा मुलूख, यामध्यें लूटमार जाळपोळ करून त्याला स्मशान बनविलें होतें, गोविंदराव गायकवाड आणि त्यांचे सावत्र बंधु यांच्यामध्यें चोवीस वर्षेंपर्यंत लढाया चालू होत्या. त्या १७९३ सालीं बंद झाल्या. पटवर्धन सरदार आणि कोल्हापूरकर छत्रपति यांच्यामधील लढाया १७७५ सालापासून पंचवीस वर्षें चालू होत्या. त्यांचे पर्यवसान पदणकुडीच्या लढाईत १७९९ सालीं परशरामभाऊ पटवर्धन मारला गेल्यामुळें समाप्त झालें. १८०० सालीं कोल्हापूरच्या छत्रपतीशीं लढून कोल्हापूर शहर घेण्याकरितां पाऊण लाख सैन्य जमवून रामचंद्र परशराम पटवर्धन व धोंडोपंत गोखले, अप्पा गोखले, बापू गोखले, व अप्पा देसाई निपाणकर यांनीं आपली सैन्यें एकत्र करून चार महिने वेढा दिला होता. पटवर्धनांना मदत करण्याला दौलतराव शिंदे यांनीं आपलीं पांच कवायती पलटणें देखील दिलीं होतीं. हा वेढा चार महिने चालून पटवर्धनाना एका पैशाचीही प्राप्ति झाली नाहीं. फंदफितूरी, पैसा, आणि दारुगोळा यांची टंचाई आणि इतर अनेक कारणांनीं पटवर्धनांना अपयश मिळालें, आणि त्यांनीं वेढा उठवून पळ काढिला.

जात कुळी हलकी किंवा मोठी यासंबंधाचे वाद त्यावेळीं फार जोराचे असत व त्यामुळें कधीं कधीं रक्तपातापर्यंत पाळी आलेली आहे, यामुळें आपसांतील कलहामुळें मराठी साम्राज्याचा नाश होण्याला एक कारण झालें हें पुढील उदाहरणांवरून दिसोन येईल.

शाहू छत्रपतींच्या वेळी जरी बाळाजी विश्वनाथ भट याला पेशवे पद मिळालें, तरी बाकीचे देशस्थ ब्राह्मण कोणत्याही कोंकणस्थाचे पंगतीस जेवावयास बसत नसत. पुढें पुढें पेशव्यांची भरभराट झाली तसतसा हा भेद नाहींसा झाला.

(२) धार संस्थानचे मालक मळोजी पवार यांनीं आपली मुलगी पिलाजीराव गाइकवाडांचे मुलास देऊं नये असा जातकुळीचा प्रश्न खंडेराव दाभाडे यांनीं उपस्थित केला. परंतु ती मुलगी ठरल्याप्रमाणें गाइकवाड घराण्यांत दिली गेली. या बद्दलची तपशीलवार हकीकत श्रीब्रह्मेंद्रस्वामींचे प्रकरणांत पहावयास मिळेल.

(३) महादजी शिंदे यांचा बाप राणोजी हा मराठा जातीचा व आई

रजपूत यामुळें इतर मराठे सरदार महादजी यास विदूर किंवा अनौरस पुत्र म्हणोन संबोधित असत. महादजीनें आपले पराक्रमाचे जोरावर सरंजामाचा लौकिक वाढविला, यामुळें हा जात कुळीचा प्रश्न आपोआप नाहींसा झाला.

(४) कागलचे घाडगे सखाराम सर्जेराव यांनीं आपली मुलगी बायजाबाई हिला दौलतराव शिंदे यांस १७९६ च्या डिसेंबर महिन्यांत देण्याचे जरी नक्की ठरविले होते तरी मुलीचा चुलता विश्वासराव घाडगे यास हा शरीर संबंध आवडला नाहीं. विश्वासरावाने सहा महिनेपर्यंत ती मुलगी कोठेतरी कोल्हापूरचे राज्यांत दडवून ठेविली होती तिचा पत्ता बापाला देखील लागू दिला नाहीं. पुढे सहा महिन्यानीं ते लग्न झालें.

(५) गोविंदराव गाइकवाडास धरमपूरच्या रजपूत राजानें मुलगी दिली होती. तिच्या पासोन झालेला मुलगा कान्होजीराव याला देखील इतर मराठे सरदार अनौरस पुत्र मानीत असत. कान्होजीराव म्हणत असे कीं मीच ज्येष्ठ पुत्र. त्यानें आपले बापाचे हयातीतच बंडाळी सुरू केली होती. त्याचे बंडाळीमुळें बडोदें संस्थानाला फार विपत्ति सोसावी लागली. पुढें १८०५ सालीं इंग्रजांनीं कान्होजीरावाला गलबतात घालून मद्रासेकडे पोंहोचविले. त्यामुळें हें संकट टळलें.

(६) शिदोजीराव आपा देसाई निंबाळकर हा निपाणकर जहागीरदार याचे पूर्वज लिंगाईत होते. परंतु पुढें पुष्कळ पैसे भरून मराठा जातीच्या मुलीशी लग्नें केली. व निंबाळकर हें आडनांव पाठीमागून लावूं लागले. हा आपा देसाई फार शूर होता. परंतु फार दुर्वृत्त होता. ह्याचेसंबंधीं ऐतिहासिक कागदोपत्रांत “ मायमावशीची देखील ओळख नाहीं. ” असें वर्णन आढळते. ह्याला लग्नाच्या २१ बायका होत्या परंतु एकही औरस पुत्र नव्हता. पुढें सन १८११ सालचे सुमारास कोल्हापूरकर छत्रपती शिवाजी महाराज यांचे मुलीशी लग्न लावण्याची मागणी यानें केली. निपाणकराची जातकुळी हलकी सबब कोल्हापूरकर छत्रपती मुलगी देईनात. सबब यानें सैन्य जमवून कोल्हापूरकरांचा अनेक वेळा पराभव केला. व रयतेची पायमल्ली केली. पुढें कोल्हापूरकर छत्रपतींनीं इंग्रजाशी दोस्ती केल्यामुळें ह्या लढाया बंद झाल्या. तरी अखेर त्या देसायानें त्या छत्रपतीच्या मुलीशी लग्न केलेच.

(७) धार संस्थानचा मालक आनंदराव पवार हा लहान बालक असतांना त्याची विधवा आई मैनाबाई त्याचे पालन करीत होती, व संस्थानची व्यवस्था पहात होती. त्या बाळकाला ताब्यांत घेऊन मारून टाकावें व आपण संस्थान बळकावावें म्हणोन मुरारीराव नांवाच्या दासी पुत्रानें किल्ल्याला वेढा दिला. आणि धार शहरांत ज्या राजवाड्यांत मैनाबाई रहात होती त्या वाड्याला

आग लावून दिली; आणि मुलुखात जाळपोळ सुरू केली. परंतु मैनाबाईचे शिपाई इमानानें लढलें आणि मुरारीरावाचा पराभव झाला.

(८) सातारा येथील शेवटचे छत्रपती शहाजी ऊर्फ आपासाहेब महाराज यांना मूलबाळ कांहीं नव्हतें. त्यांनीं बाळगलेला आवडता धर्मपुत्र बाळासाहेब भोसले राजाज्ञा म्हणोन होता. त्याच पुत्राला मी दत्तक घेणार म्हणोन छत्रपतींचा आग्रह होता. राजाज्ञाची जातकुळी हलकी म्हणोन इतर अष्टप्रधान मानकरी वगैरे सर्व मराठे सरदारांना हें दत्तविधान होऊं नये असें वाटत होते. त्यापैकीं परशरामराव पंत प्रतिनिधी यांनीं धीटपणानें छत्रपतीस स्पष्ट बजाविलें होतें कीं " जर राजाज्ञाला आपासाहेब यांनीं मांडीवर घेतलेलें माझ्या दृष्टीस पडले, तर मी गादीला देखील मुजरा करणार नाहीं, आणि त्या पोराला तलवारीनें छाटून टाकीन. " ह्याच पंतप्रतिनिधींचा हात लढाईंत तुटला होता सबब थोटे पंत या नांवानें इतिहासांत हे प्रसिद्ध आहेत.

असो—यांप्रमाणें जातकुळीवरून भांडणें विकोपाला गेली आहेत व आपसांत यादवी होऊन रक्तपात झालेले आहेत. व मराठ्यांची शक्ति कमी होऊन इंग्रजांना राज्य जिंकण्यास सोपे झालें.

सवाई माधवराव पेशवा मेल्यानंतर गढेमंडळ प्रांताच्या मालकीबद्दल नागपूरचे भोसले आणि दौलतराव शिंदे यांच्यामध्यें तंटा सुरू झाला. त्यावेळीं दौलतराव शिंद्याचा मुक्काम वानवडी येथें होता. सबब हें तीव्र स्वरूपाचें भांडण पुण्यानजिक चालून युद्धावर प्रकरण येणार असा रंग दिसूं लागला. परंतु त्यावेळेला नाना फडणवीस हयात होता, आणि इतर कांहीं पोक्त गृहस्थ यांनीं मध्यें पडून तडजोड केली, सबब लढाईचा प्रसंग आला नाहीं. अशा रीतीने एकाच खावंदाच्या हाताखालचे सरदार एकमेकाशी लढण्याला तयार झाले होते. आणि यामुळे रयतेची पायमल्ली पराकाष्ठेला पोंचली होती.

पुण्यास सवाई माधवराव पेशव्याच्या मृत्यू नंतर जी अंदाधुंदी माजली तिचा फायदा घेऊन साताऱ्च्या छत्रपतींनी स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. त्यांना कोल्हापूरच्या छत्रपतींनी मदत करण्याचे कबूल केलें. परंतु त्या दोघांचेंही सैन्यबळ कमी असल्यामुळें पेशव्यांच्या वतीने पंत प्रतिनिधि, आनंदराव रास्ते आणि परशराम भाऊ पटवर्धन यांनीं लढाई देऊन हें बंड मोडून टाकिलें.

पंत प्रतिनिधींच्या संस्थानचे मालकी हक्काची वांटणी करण्याकरितां भवानराव आणि भगवंतराव हे एकमेकांशीं लढत होते, आणि सर्व रयतेची पायमल्ली करीत होते. होळकराच्या घराण्यांतील आपसांतील लढायांचा इतिहास पुढीलप्रमाणें आहे. मल्हारराव होळकर मरण पावल्यावर मल्हाररावचा नातू मालेराव याला पेशव्यांनीं सरंजामाचा मालक ठरविले, व सर्व कारभार अहिल्याबाई पाहूं लागली. पुढें लवकरच मालेराव मरण पावला तेव्हां अहिल्याबाई दुःखी कष्टी

होती, तिनें मालेरावाच्या बायकोच्या मांडीवर दत्तक देण्यासंबंधीं कांहींच सांगितलें नव्हतें. तुकोजीराव होळकराच्या मुलापैकीं वडील मुलगा काशीराव यास दत्तक देता येत नव्हतें, कारण वडील मुलगा दत्तक देऊं नये असें शास्त्र आहे. सबब तुकोजीराव होळकर यानें आपला नंबर दोनचा मुलगा मल्हारराव याचे हातून मालेरावची उत्तरक्रिया करविली, म्हणजे दसपिंड त्याचे हातून देवविले. त्यावेळीं मल्हारराव चार वर्षांचा होता. पुढें मल्हारराव वीस वर्षांचा झाल्यावर, मीच अहिल्याबाईचा भावी वारस असें प्रतिपादन करूं लागला, वास्तविक सशास्त्र दत्तकविधान झालें नव्हतें. आणि तशा प्रकारची इच्छा अहिल्याबाईनें कधीं दाखविली नव्हती. हा मल्हारराव अहिल्याबाईच्या हयातीतच बंड करूं लागला, आणि शेजारच्या संस्थानिकाला फार त्रास देऊं लागला. परंतु अहिल्याबाईचा बंदोबस्त चांगला होता, ह्यामुळें तुकोजीराव होळकर १७९७ सालीं मृत्यु पावले, तेथपर्यंत पुढें कांहीं तंटा बखेडा झाला नाहीं. हा मल्हारराव बापासारखा शूर होता, तो बापासारखी सरदारकी चालवील, असें नाना फडणवीसाचें मत होतें. परंतु दौलतराव शिंद्याकडे सैन्याचा जोर जास्त, सबब त्याचें वजन शेवटच्या बाजीराव पेशव्यावर पडलें, आणि तुकोजीरावाचा वडील मुलगा काशीराव याचा हक्क श्रेष्ठ ठरविण्यांत आला. तुकोजीराव वारल्यावर दीड महिन्याचे आंत दौलतराव शिंद्यानें अगदीं नामर्दपणानें मल्हाररावाला गर्दी करून ठार मारिलें. त्यावेळीं जरी विठोजी आणि यशवंतराव हे पुण्याहून पळून गेले, तरी त्यांनीं पुष्कळ वर्षें बंडाळी चालविली होती, त्यामुळें रयतेची धुळधाण होत होती. दौलतराव शिंदा त्यावेळीं पैशाच्या अडचणींत होता. आणि महादजी शिंद्याला पूर्वीं अहिल्याबाईनें जें तीस लाख रुपये कर्ज दिलें होतें तें कर्ज माफ करण्याचें काशीरावानें कबूल केल्यामुळें दौलतराव शिंद्यानें होळकरांच्या सरंजामाला काशीरावाचा हक्क दुराग्रहानें कबूल करविला. काशीराव होळकर संस्थान संभाळण्याला नालायक आहे अशा समजुतीवर, सर्व होळकराच्या मुलुखावर दौलतराव शिंद्यानें आपले अंमलदार नेमिले, आणि काशीरावाला फक्त पेन्शन देऊन होळकराचा सर्व मुलूख घशाखालीं घालावयाचा त्याचा दुष्ट हेतु होता. परंतु अहिल्याबाईची पुण्याई मोठी यामुळें यशवंतरावासारखा शूर पुरुष दौलतराव शिंद्याशीं लढण्याला उभा राहिल्यामुळें, दौलतरावाचा दुष्ट हेतु सफल झाला नाहीं. तुकोजी होळकर ज्या धनगर जातीपैकीं होते, त्या जातींत हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दासीपुत्राला देखील औरस पुत्राबरोबर हिस्सा मिळतो. विठोजी आणि यशवंतराव हे शूर होते त्यांनीं पेशव्यांच्या रयतेला अतिशय छळलें, त्यामुळें रयत दीन झाली. पुढें सांगोल्याजवळ बापू गोखले सेनापतीकडून विठोजी होळकराला कैद करून पुण्यास आणिलें आणि त्याला बाजीरावानें अतिशय क्रूरपणानें ठार मारविलें. त्याचा भाऊ यशवंतराव शूर होता त्यानें ह्या कृत्याबद्दल शिंदे आणि पेशवे यांच्यावर

चांगला सूड उगवला. आणि त्याचा परिणाम मराठी साम्राज्य नष्ट होण्यात झाला. यशवंतराव होळकराची इच्छा आपण सरंजामाचे मालक व्हावे अशी नव्हती. " मल्हाररावचा अज्ञान मुलगा खंडेराव याचा सरंजामावर हक्क ठेऊन खंडेरावाचा मुतालीक ह्या नात्यानें सर्व कारभार पाहीन. " असें यशवंतराव होळकराचें म्हणणें होतें. परंतु यशवंतरावासारख्याच्या हुशारीचा आणि शौर्याचा उपयोग करून घेण्याची, मुख्य धनी जो बाजीराव पेशवा ह्याच्यांत अकल नव्हती.

पुण्यास दादा गद्रे सावकार यानें सुंदर मुरलीधराचें मंदिर बांधिलें. त्या मंदिराच्या बाजूला पूर्वी वस्ती नव्हती. त्या मंदिराच्या आसपास लढवय्ये लोकांच्या छावण्या असत. नाना फडणविसानें बॉइड नांवाचा इंग्रज अंमलदार कवायती पलटणी तयार करण्याकरितां नेमिला होता. त्या पलटणींतील शिपायांचें आणि अरब शिपायांचें भांडण कांहीं कारणावरून झालें. दोन्ही बाजूच्या शिपायांनीं बंदुकांचे तोंडे पेटविले आणि गोळीबार सुरू झाला. त्यामुळें सुखासुखी १००।१५० शिपायी मारले गेले. तेव्हांपासून सुंदर मुरलीधराला खुन्या मुरलीधर हें नांव पडलें.

बेळगांवपासून शहापूर एक मैल लांब आहे. शहापूर हें सांगलीकर चिंतामण पांडुरंग पटवर्धन यांचें ठाणें होतें. तेथील कमाविसदार नारोपंत आपटे हा होता. ह्या नारोपंत आपट्यानें एके दिवशीं सहज पोरखेळ केला तरी त्यांत ५०।६० खून पडले. बेळगांवच्या किल्ल्याचा किल्लेदार सिद्धेश्वरपंत बिनिवाले हा पेशव्यांचा नोकर म्हणून आपलें काम फार इमानानें करीत असे. बेळगांवचा किल्ला त्यावेळीं पेशव्यांचा होता. एके दिवशीं काळोख्या रात्री नारोपंत आपटे यानें ५०।६० लोक हत्यारबंद घेऊन सांगलीकर संस्थानिकांच्या वतीनें १८०० साली तोच बेळगांवचा भुईकोट किल्ला दगलबाजीनें घेण्याचा प्रयत्न केला. परंतु बेळगांवच्या किल्लेदारानें त्याला दाद दिली नाहीं. आणि अंधारांत गोळीबार होऊन ५०।६० शिपाई मारले गेले. नारोपंत आपटे यानें खंदकांत उडी टाकून चिखल तुडवून काळोखांत पळ काढला त्यामुळें तो बचावला.

याप्रमाणें आपसांत लढाया केल्यामुळें शूर लोक फुकट मारले गेले. याचा परिणाम असा झाला कीं, इंग्रजांना हिंदुस्थानचें राज्य जिंकण्याला फार सोपें गेलें.

(८) शूर पुरुषांच्या पोटीं पुढें पुढें नालायक पुत्र जन्माला येऊं लागले, किंवा जे दत्तक पुत्र घेतले ते नालायक होते असें ठरलें. ह्याचाही परिणाम स्वराज्य नष्ट होण्यांत झाला. पंत प्रतिनिधीच्या संस्थानापैकीं ज्यांचा हात लढाईत तुटला होता ते परशुरामराव व त्यांची रक्षा ताई तेलीण ह्या दोघांच्यामुळें अतिशय भानगडी व मारामाऱ्या झाल्या. आणि रयतेची धुळधाण झाली. हे थोटेपंत या नांवानें प्रसिद्ध होते. यांचें वय १८ वर्षांचें झालें तेव्हां त्यांच्या दुर्दैवानें त्यांना असा एक ज्योतिषी भेटला. त्यानें त्यांची जन्मपत्रिका पाहून सांगितलें कीं, तुम्ही

ज्या दिवशीं जन्माला आला त्या दिवशीं तुमचे बाप वारले. त्या अर्थी तुम्हाला ज्या दिवशीं औरस पुत्र होईल त्या दिवशीं तुम्ही खास मरणार. ह्यामुळें त्यांनीं असें डोक्यांत वेड घेतलें कीं, आपल्या धर्म पत्नीची सर्व जन्मांत कधींही गांठ पडू द्यावयाची नाहीं. त्यांची दोन लग्ने झालीं होतीं; आणि जरी पेशव्यांच्या सेनापतीनें त्यांचा पराभव करून त्यांना कैद केलें होतें आणि लढाईत हात तुटला होता तरी त्यांनीं कधींही धर्मपत्नीची गांठ घेतली नाहीं. यामुळें रयतेची धुळधाण झाली. पेशव्यांनीं त्यांना नजर कैदेंत ठेवून दिलें होतें. त्यांच्या संस्थानापैकीं पांच लक्षांचा मुलूख खालसा करून त्यांना कैदेंतून सोडून दिले. वयाला ३५ वर्षे झाल्यानंतर त्यांनीं आपली वर्तणूक पुष्कळ सुधारली व प्रजेचें प्रेम संपादिलें. पुढें त्यांच्या संस्थानची स्थिति बरीच सुधारली. हे दुर्दैवी पंत १८४८ सालापर्यंत हयात होते.

महादजी शिंदे १७९४ साली फेब्रुवारी महिन्यांत पुण्याजवळ वानवडी येथें मृत्यू पावले. त्यानंतर दोन महिन्याच्या आंत दौलतराव शिंदे यांचे दत्तकविधान झालें. महादजी शिंद्यांच्या मृत्यूच्या वेळीं शिंद्यांच्या ऐश्वर्याचा नकाशा जर आपणासमोर ठेविला, तर असें दिसून येईल का, त्यावेळीं शिंद्यांचें ऐश्वर्य कळसास पोचलें होंतें. लष्करी दृष्टीनें जी मार्‍याचीं म्हणजे महत्त्वाची ठिकाणें तीं सर्व शिंद्यांच्याच ताब्यांत होती. भडोच, असीरगड, बऱ्हाणपूर, द्वारका, अजमीर, उज्जैयिनी तसेंच दिल्ली, आग्रा, अलिगड आणि सतलज नदीच्या कांठापर्यंत म्हणजे कोटपुतळी, महिंद्रगड एथपर्यंत शिंद्यांच्या राज्याचा विस्तार झाला होता. दिल्लीचा बादशहा शिंद्यांचें पेन्शन खात होता. दिल्लींतील सर्व चौक्या पहारे शिंद्यांच्या अंमलदारांच्या ताब्यांत होते. जे युरोपियन अंमलदार शिंद्यांच्या फौजेला कवायत शिकविण्यास ठेविले होते, ते असें म्हणत कीं, आम्ही फक्त दत्तकपुत्र दौलतराव शिंदे याचाच हुकूम मान्य करूं. लष्करांतील इतर अंमलदारांचा हुकूम आम्ही मान्य करणार नाहीं. त्यावेळीं शिंद्यांची फौज आणि तोफखाना ही दोन्ही उत्तम प्रकारची होती. फौजेला कवायत शिकविणारा अम्मलदार फ्रेंच असल्यामुळें इंग्रजांना असें वाटत होते कीं, होता होईल तो शिंद्यांशी लढण्याचा प्रसंग येऊं नये. कारण त्यावेळीं युरोपांत नेपोलियन बोनापार्टचा धुमाकूळ सुरू झाला होता. हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें दत्तक पुत्राला औरस पुत्राचे सर्व हक्क प्राप्त होतात, त्याअर्थी आपल्या बापाचें एवढें ऐश्वर्य मालकी हक्कानें आपणाला प्राप्त झालें, तें ऐश्वर्य नजरेखालीं घालण्याकरितां दौलतराव एकदां देखील उत्तरेकडे गेला नाहीं. पुणें येथें बाजीराव पेशवा आणि सर्जेराव घाडगा ह्यांच्या सैतानी लीलांना भर देण्याकरितां पांच वर्षेपर्यंत हा वानवडीसच बसून राहिला. महादजी शिंद्यांच्या कर्तबगारीचा एक सहस्रांश देखील ह्या त्याच्या दत्तक पुत्रांत नव्हता. पुढें यशवंतराव होळकरानें लूटमार, जाळपोळ करून सर्व शिंद्यांच्या मुलुखाची राख-

रांगोळी करून स्मशान बनविलें होतें. त्यानंतर हा गृहस्थ १८०१ सालीं एप्रिल महिन्यांत आपली राजधानी उज्जयिनी येथें पोंचला. दौलतराव शिंदे यांच्या सारखीच दुसरी मंडळी त्याच वेळेला अशाच सैतानी लीला दक्षिणेंत चालवीत होती. त्यांचा नाम निर्देश केल्याखेरीज ह्या प्रकरणावर चांगला प्रकाश पडणार नाहीं. बाळोजी कुंजर, फत्तेसिंग माने, सर्जेराव घाडगे, त्रिंबकजी डेंगळे ही सर्व मंडळी म्हणजे एका माळेचे मणी होत.

सरदारांचीं संस्थानें जशी वंशपरंपरा चालावयाची तशींच संस्थानांचे कारभारी किंवा दिवाण हे देखील वंशपरंपरेनेंच चालले पाहिजेत, असा मोठा झगडा त्यावेळीं चालत असे. छत्रपतींचे दिवाण कारभारी पेशवे हे देखील वंशपरंपरेचेच असावयाचे. पेशव्यांचे कारभारी पुरंदरे असत. परंतु कारभार करण्याला पुरंदऱ्यांच्या घराण्यांत लायक इसम नसल्यामुळें पुरंदऱ्यांचा लेकावळा बाळोजी कुंजर हा शेवटच्या बाजीरावाचा कारभारी होता. बडोदें राज्यांत सिताराम रावजी फणसे प्रभू जातीचा गृहस्थ, हा देखील वंशपरंपरेनें दिवाण ह्या नात्यानें हक्क सांगत होता. अशा रीतीनें नालायक लोकांनीं पेशवाई बुडविण्याच्या कामीं कशी मदत केली तें खुलासेवार वर्णन करण्याकरितां गंगाधरशास्त्री पटवर्धन यांच्या खुनाच्या प्रकरणासंबंधीं जी नवीन वातमी उजेडांत आली आहे तिचे वर्णन करणें योग्य होईल.

१८०२ सालीं जून महिन्यांत खंबायत येथें तह करून बडोदें येथील गादीवर महाराज आनंदराव यांनीं इंग्रजांची तैनाती फौज स्विकारिली, व तिच्या खर्चा करितां चिखली तालुका इंग्रजांना तोडून दिला. हा खंबायतचा तह घडवून आणण्याकरितां हुषार दिवाण रावजी अप्पाजी फणसे यानें चांगली कामगिरी केली. त्याचवेळीं इंग्रजांनीं रावजी अप्पाजीबरोबर एक असा गुप्त तह केला कीं, बडोदें राज्यांतील दिवाणगिरी रावजी अप्पाजीचें घराण्यांतच वंशपरंपरेनें चालावयाची. रावजी अप्पाजीचे कर्तबगारीबद्दल इंग्रजांनीं आपले हद्दींतील भाटे नांवाचा साठ हजार रुपये वसुलाचा गांव ओलपाड तालुक्यांत आहे तो रावजी अप्पाजीला वंशपरंपरेनें इनाम करून दिला. ह्या रावजी अप्पाजीचा दत्तक पुत्र सिताराम रावजी हा देखील बडोदें येथील दिवाणाचे जागेवर आपला हक्क सांगूं लागला. परंतु त्याच्या अंगीं कर्तबगारी मुळींच नव्हती. गादीवरचे गायकवाड आनंदराव ह्यांच्या अंगीं कर्तबगारी नव्हती तरी आनंदरावाचा धाकटा भाऊ फत्तेसिंग याचे आणि सिताराम रावजी याचें पटेना. ब्रिटिश रेसिडेंटाशी देखील सिताराम याचें पटेना. त्याचा चुलता बाबाजी अपाजी हा हुषार सेनापती होता. त्याच्याशी सिताराम याचें पटेना. सबब कान्होजीराव गायकवाड, व कडीं येथील मल्हारराव गायकवाड यांच्याशीं संगनमत करून सिताराम यानें बडोदें दरबारला फार त्रास दिला. १८१० सालचे सुमारास बाबाजी अप्पाजी

मरण पावल्यावर बडोदें येथील भानगडी मिटेनात. सबब ब्रिटिश रेसिडेंट यांचे हाताखालील डेप्युटि कलेक्टर गंगाधरशास्त्री पटवर्धन यांना दिवाण नेमण्यांत आले बाहेरील इसमास दिवाणगिरी दिली सबब मारेकऱ्याकडून त्या दिवाणाचा खून केल्याखेरीज आपणाला दिवाणगिरी मिळणार नाहीं असें सिताराम रावजी यास वाटूं लागले. १८१३।१४ सालीं हिशेबाची रुजूवात करण्याकरितां जेव्हां गंगाधरशास्त्री पुण्यास गेला, तेव्हां सिताराम रावजी यानें आपला गुमास्ता बंधूजी याचे मार्फत गंगाधरशास्त्रयांचा खून मारेकऱ्याकडून करविण्याचा प्रयत्न केला गंगाधरशास्त्री यांचा मुक्काम जोंपर्यंत पुण्यास होता तोंपर्यंत तो ब्रिटिश रेसिडेंटाच्या आश्रयानें रहात होता, यामुळें त्याचा खून करण्याला मारेकऱ्यांना सवड सांपडली नाहीं. गंगाधरशास्त्री पंढरपुरास गेल्यावर मारेकऱ्यांना खून करण्यास सवड मिळाली. गंगाधरशास्त्री फार सावधगिरीनें रहात असे. शेवटच्या दिवशीं तो मंदिरांत जो दर्शनाला गेला तो त्रिंबकजी डेंगळे याच्या सांगण्यावरून गेला. त्रिंबकजी डेंगळ्याचा अपराध ह्या खुनाच्या कामांत जर असेल तर तो रुपयांत एक आणा इतका थोडा आहे. रुपयांत पंधरा आणे अपराध सिताराम रावजी फणसे याच्या पदरीं येतो. त्यावेळीं हल्लींप्रमाणें पोलीस खात्यांत हुशार लोक नव्हते. आणि पेशव्यांच्या राज्यांत खून झाल्यामुळें इंग्रजांना खरा गुन्हेगार शोधून काढणें कठीण होतें. पुष्कळांचा संशय सिताराम रावजी संबंधीं होता. आणि खून झाल्यानंतर दीड महिन्यांनीं नवसारी मुक्कामीं बडोदें राज्यांत सिताराम रावजी यास ह्याच खुनाबद्दल कैद करण्यांत आलें. त्यानंतर सिताराम रावजी याचा कोणताही इतिहास समजण्यांत येत नाहीं.

मराठयांच्या नाशाला लूटमार, जाळपोळ, कत्तल हे प्रकार अव्वलपासून अखेरपर्यंत मर्यादेबाहेर गेलेले होते. एखाद्या पारध्याला हरिणाची शिकार करणें असेल तेव्हां हरीण फार चपळ असल्यामुळें पळतां पळतां बाण मारणें कठीण असतें. सबब हरिणाला मारण्याला पारधी चार प्रकारचे उपाय योजित असतो. आपला जीव वांचविण्याकरितां पळून जाण्याचे जे हरिणाचे मार्ग असतात त्यापैकीं एका मार्गावर जाळें पसरून ठेवितो. दुसऱ्या मार्गावर जंगलांतील वणवा पेटवून देतो. तिसऱ्या मार्गावर शिकारी कुत्रे हरिणाला अडविण्याकरितां पाठवितो. व चौथ्या मार्गावर दाट झाडींत स्वतः लपून गोळीच्या टप्यांत हरीण आला कीं त्यास शिकार करणें सोयीचे पडतें. मराठा वीर पुरुषांची तीच, पारध्याप्रमाणें स्थिति होती. दिल्लीच्या बादशहानें चौथाईच्या सनदा दिल्या त्या जोरावर लहान संस्थानिकांकडून खंडण्या वसूल करण्याकरितां ज्यावेळीं ते स्वारीवर निघत, त्यावेळीं त्यांचा पहिला उपाय म्हणजे संस्थानिकांनीं ज्या भुईकोट किल्ल्यांत खजिना आणि जवाहीर ठेविलें असेल त्याला वेढा देणें, दुसरा उपाय म्हणजे त्या संस्थानिकाची रयत लुटून पैसा आणि धान्य आणण्याकरितां पेंढाऱ्यांना पाठविणें.

तिसरा उपाय म्हणजे त्या संस्थानिकाचें सैन्यांत फंद फितुरी करण्याकरितां गुप्त हेर रवाना करणें. आणि चौथा उपाय म्हणजे घोडदळाचे जोरावर खडा सामना देण्याला तयार असणें. रयतेची लूटमार चालली म्हणजे त्या संस्थानिकाचे खजिन्यांत जमीन महसूल कोठून येणार ? व पेशव्यांना खंडण्या कोठुन देणार ? अशा प्रकारे लूटमार जाळपोळ यानें शत्रू बेजार झाला म्हणजे त्याची स्थिति हरिणाप्रमाणें होत असे. ह्या हरिणाच्या स्थितीचें कालिदासानें यथार्थ वर्णन केलें आहे.

" सत्वानामपि लक्ष्यते विकृतिमत् । चित्तंभय क्रोधयोः ॥ अशा प्रकारे संस्थानिक किंकर्तव्यतामूढ होत असे. लूटमार जाळपोळ या उपायांनीं दरसाल नवीं संकटें उत्पन्न होत आणि हीं सर्व संकटें निस्तारण्यापूर्वी मराठी साम्राज्याची इतिश्री झाली, आणि हा देश जिंकण्याला इंग्रजांचा मार्ग सोपा झाला. धावडशी येथील ब्रह्मेंद्र स्वामींचे संस्थानातील एक लाख रुपये किंमतीचें सोनें नाणें १७६६ साली राघोबादादा पेशव्यांनीं जबरदस्तीनें लुटून नेलें.

लूटमार, जाळपोळ करण्यांत पाप आणि पुण्य ह्याचा विचार मराठे शूर पुरुष मुळींच करीत नसत. राजस्थान आणि पंजाब ह्यामध्यें १७५२ सालामध्यें मराठ्यांनी ज्या मोहिमा केल्या त्यामध्यें मराठ्यांनीं सर्व देवस्थानांचे दागिने आणि इतर मिळकत लुटून फस्त केली. गौड सारस्वत ब्राह्मणांनीं शतचंडी नवचंडी अशा सारखी होम हवनें करून, बाळाजी बाजीराव पेशवा, राघोबा दादा, मल्हारराव होळकर, जयाजी शिंदे, दत्ताजी शिंदे, आणि रामचंद्रपंत बाबा सुखटणकर ह्यांच्या नांवाचा उच्चार करून ह्यांच्या नांवानें आहुती अग्निमध्यें टाकिल्या. व यांचा निःपात व्हावा म्हणून अग्नीची प्रार्थना केली. कुरुंदवाडकर पटवर्धन यांच्या हाताखालच्या पेंढारी लुटारू लोकांनीं कोल्हापूर येथील प्रत्यक्ष शंकराचार्यांच्या मठांत लुटालूट करून अत्याचार केले, सबब शंकराचार्यांनीं उपास काढिले, आणि पेशव्यांच्या दरबारी फिर्यादी पाठवून दाद मागितली. तरी न्याय मिळाला नाहीं. तेव्हां शेवटीं आपली जीभ हासडून घेऊन प्राण दिला. निरा नरसिंगपूर येथील दैवत मोठें जागृत आहे, म्हणून प्रसिद्धि होती. त्या देवस्थानाचे दागिने देखील देवाला शिवून मराठा शिलेदारांनीं लुबाडून नेलें. १७७५ सालच्या एप्रिल महिन्यांत राघोबादादाचा पराभव होऊन तो खंबायत येथें पळून गेला असतांना हरीपंत फडके आपल्या सैन्यासह त्याचा पाठलाग करीत होते. तेव्हां हरीपंतांच्या सैन्याला खर्चाची अडचण पडली म्हणून काठेवाडांत द्वारका मठाच्या शंकराचार्यांचा एक इनाम गांव होता त्या गांवांतील शंकराचार्यांची मिळकत देखील लुटली. हैदरअल्लीवर जेव्हां पेशव्यांचें सैन्य स्वारी करून जात होते, तेव्हां कर्नाटकांत रामानुज पंथाचें एक मंदीर होतें. तें देखील पेशव्यांच्या सैन्यानें लुटलें, इतकेंच नव्हे तर, त्या मंदिरांतील देवाचा रथ देखील त्यांनीं जाळून टाकिला. त्या

लोकांची भाषा देखील मराठयांना समजली नाहीं. आम्ही खंडणी देतो तुम्ही रथ जाळूं नका असें रामानुज पंथाचे लोक म्हणत होते; परंतु त्यांची भाषा समजून घेण्याकरितां दुभाषी लोक सुद्धां बरोबर नेले नव्हते; अशा स्थितींत दैवी संपत्तीनें श्रेष्ठ असे इंग्रज लोक हिंदुस्थान देशाचे मालक बनले तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. १८१७ सालीं नोव्हेंबर महिन्यांत जेव्हां शेवटच्या बाजीरावाचें इंग्रजांशीं युद्ध जुंपलें तेव्हां फंदफितुरीमुळें बाजीरावाचेच लोक किती निमकहराम होते, ह्याचाही पुरावा पाहणें जरूर आहे. मुख्य तोफखान्यावरच्या अंमलदारानें बाजीरावास सांगितलें कीं, इंग्रजांशी एक वर्ष लढाई चालू राहिली तरी, भरपूर दारू; गोळा शिल्लक आहे. परंतु प्रत्यक्ष खडकीची लढाई जेव्हां सुरू झाली, तेव्हां बापू गोखले सेनापती याला कळून चुकलें कीं, ही कृत्रिम दारू बनविलेली आहे, तिचा प्रकार असा—घोड्याची लीद उन्हामध्यें वाळवून तिची वस्त्रगाळ पूड करावयाची. तिला कोळशाचें पाणी लावून काळा रंग आणावयाचा, आणि बाजरी आणि नाचणी ही अर्धवट जाळून त्या लिदीमध्ये मिसळावयाची. अशा रितीनें तिला बंदुकीच्या दारूचें रूप आणावयाचें. खडकीच्या लढाईंत अशा कृत्रीम दारूनें जेव्हां पेशव्यांच्या शिलेदारांनीं आपल्या बंदुका ठांसल्या, त्यावेळीं एकही गोळी बाहेर उडेना, आणि ठांसलेली गोळी बाहेर काढतां येईना. यामुळें पेशव्यांचा पराभव झाला. लबाडीकरून पैसे मिळविणें यांत कांहीं पाप नाहीं अशा प्रकारे त्या वेळच्या भिक्षुकांची देखील मनःस्थिति झालेली होती. श्रावणमासच्या दक्षिणासमारंभांत जे भिक्षुक ब्राह्मण चांगला अभ्यास करून येत असत त्यांना जास्त दक्षिणा मिळत असे, परंतु जे शागीर्द पाणक्याप्रमाणें अक्षरशत्रू ब्राह्मण असत त्यांना देखील रमण्यामध्यें प्रत्येकी एक रुपाया दक्षिणा मिळत असे. बाजीरावास कोणी शास्त्र सांगितलें होते कीं, जितकी दक्षिणा ब्राह्मणास तितकीच दक्षिणा त्या ब्राह्मणाच्या शाळीग्रामापुढें ठेवावी, ह्यांत मोठें पुण्य आहे. ब्राह्मण लोक खांद्यावर पडशी टाकून आणि डोक्यावर इरलें घेऊन पुण्यास आले म्हणजे त्यांना असें समजे कीं, शाळीग्रामापुढें ठेविलेला रुपया आपणाला मिळणार. परंतु प्रत्येक ब्राह्मण आपले बरोबर शाळीग्राम कांहीं आणीत नसे. सबब या कामाकरितां पेशव्यांच्या उष्ट्र खात्यापैकीं जे नोकर लोक असत, ते उन्हाळ्यांत उंटांच्या लेंड्या वाळवून ठेवीत असत, आणि प्रत्येक लेंडीला एक पैसा अशा भावानें या गरजवंत ब्राह्मणांची गैरसोय दूर करीत असत. लेंडीची तबकडीत ठेवून पूजा केली, आणि तिच्यावर फुलें तुळशी घालून ती झांकली गेली म्हणजे ती बाजीराव पेशव्याला ओळखू येत नसे. त्या शाळीग्रामापुढे एक रुपया ठेवून बाजीराव साष्टांग नमस्कार घालीत असे. बाजीरावाला खरा शाळीग्राम आणि खोटा शाळीग्राम यामधील भेद कळणें कठीण जाई. ब्राह्मणांची मनःस्थिति किती केविलवाणी झाली होती हें यावरून दिसून येईल. त्या वेळचे ब्राह्मण खानेसुमारीप्रमाणें शेंकडा ८५ कुटुंबें भिक्षुकी करीत असत. शेंकडा

बारा कुटुंबें कुलकर्णीपण किंवा कारकूनपेशा वृत्तीची असत. परक्या राजाच्या राज्यांत वकीली करणें किंवा किल्लेदार, ठाणेदार, सबनीस, पत्की वगैरे हुद्दे धारण करणारे शेंकडा तीन असत. लढवय्या ब्राह्मणांचें प्रमाण अत्यंत अल्प असें. २१ वर्षांवरच्या पांच हजार ब्राह्मणांमध्यें एक ब्राह्मण लढवय्या, इतके अल्प प्रमाण असे. त्या काळीं रूढ झालेली एक म्हण अशी आहे कीं, ब्राह्मणाला श्रीमंत होण्याला तीन प्रकारचीं दानें मिळवावी लागत. एक महादान, दुसरे कुदान आणि तिसरें अवदान. एकाद्या श्रीमंतानें हत्ती दान दिला किंवा सुवर्णतुला, रौप्यतुला करविली किंवा भूमिदान दिलें तर, त्यास महादान म्हणत. एकाद्या मनुष्याच्या उत्तरक्रियेचें वेळीं जें शय्यादान वगैरे देत त्यास कुदान अशी संज्ञा असे. आणि एकाद्या सावकाराच्या पेढीवर नोकर असतांना ब्राह्मण कारकुनानें लबाडीचे हिशेब ठेवून ऐवजाचा जो डल्ला मारला असेल त्याला अवदान अशी संज्ञा होती. वास्तविक संस्कृत भाषेंत अवदान याचा अर्थ वाईट नाहीं. परंतु मराठी भाषेंत त्या शब्दाचा रूढ अर्थ अन्यायानें पैसा मिळविणें असा झाला आहे. आतां ब्राह्मणांच्या अवनतीसंबंधीं एकच मुद्दा राहिला आहे आणि तो मुद्दा म्हणजे सनातन धर्माचा दुर्बळपणा हा होय. परंतु ह्या मुद्यासंबंधानें एका स्वतंत्र प्रकरणांत विचार करण्यांत येईल.

मराठी साम्राज्याच्या नाशाच्या कारणापैकीं दोन महत्त्वाचे मुद्दे सांगून हें प्रकरण पुरें करण्यांत येईल. एक मुद्दा असा आहे कीं प्रत्येक वीर पुरुषाला लुटमार जाळपोळ करून श्रीमंत व्हावें ही दुष्ट इच्छा उत्पन्न झाली, व दुसरा मुद्दा असा आहे कीं " जसजसा अनुकूल काळ येत गेला तसतसें शीलभ्रष्ट होण्यांत कांहीं पाप नाहीं, असें शेंकडा ९० लोकांना वाटूं लागलें, हाच सनातन धर्माचा दुर्बळपणा. "

छत्रपती शिवाजीमहाराजांनीं सुरत शहर लुटलें. त्यावेळीं त्यांचेबरोबरचे लोकांनीं सोनें रुपें लुबाडण्यांत पेंढारी लोकांच्या दुप्पट क्रूरपणा केला, इतकेंच नव्हे तर रयतेचें सर्वस्व लुबाडून शेवटीं त्यांच्या घराला देखील आगी लावल्या. अशा प्रकारचें वर्णन सुरत येथील इंग्रज लोकांनीं जें लिहून ठेविलें आहे ते अक्षरक्षः खरें आहे. हल्लींचे सुशिक्षित लोक असें तत्त्व प्रतिपादन करतात कीं " शिवकालीन संतांची कामगिरी " मोठी बहुमोल होती, तें सर्वस्वी चुकीचें आहे. जर साधुसंतांचे उपदेशामुळें मराठे वीर पुरुष स्वराज्याची स्थापना करीत होते, तर हिंदु प्रजेला असा छळवाद सोसावा लागला नसता. ही लूटमार जाळपोळ सन १८०६ सालापर्यंत अशीच चालू होती.

अंगावर शहारे आणणारें शिलेदारांचें क्रूर कृत्य वर्णन करणें झाल्यास सन १७९८–९९ सालीं सातारा प्रांतात पाच्छापूर येथील लूटमार जाळपोळ ही होय. त्या गांवांत लूटमार सुरू झाली हें पाहून शेतकऱ्यांच्या बायकांनीं असा

विचार केला कीं बासनांत असलेलें भारी किंमतीचें लुगडें घाईघाईनें नेसावें, म्हणजे बाकी सर्व लुटलें गेलें तरी नेसलेलें लुगडें तरी राहील. परंतु शिलेदारांनीं तीं लुगडीं देखील फेडून घेतलीं. नंतर त्या स्त्रियांनीं नग्न स्थितीत आपलें मूल पोटाशीं धरून आत्महत्या करणेकरितां कृष्णानदींत उड्या टाकल्या. पावसाळ्यामुळें कृष्णानदी तुडुंब भरून वाहत होती. पुढे त्या सर्व स्त्रियांचीं प्रेतें वाहत वाहत कऱ्हाड येथील कृष्णानदीच्या वाळवंटांत काठाला येऊन चिखलांत अडकली. कऱ्हाड येथील पंतप्रतिनिधींच्या राणीनें तीं प्रेतें ब्राह्मण स्त्रियांची आहेत हें ओळखून दयाळूपणानें त्या प्रेतांना अग्निसंस्कार देवविला. लूटमार जाळपोळ इतकी भयंकर असे कीं ३ वर्षांचे बाळक जर भुकेनें व्याकुळ होऊन रडून आकांत करीत असलें तरी त्याला भात शिजवून घालण्याला मूठभर तांदूळ देखील शिल्लक ठेवीत नसत. हे सर्व पराक्रम मराठे शिलेदारांचेच होत.

धारवाडच्या किल्ल्याला १७९० सालीं आगष्ट महिन्यांत जेव्हां परशुराम भाऊ पटवर्धन यांनीं वेढा घातला, तेव्हां टिपूच्या किल्लेदारापासून किल्ला लढून घेण्याचें काम इंग्रज व पेशवे हे एकदिलानें लढत होते. वेढा सात महिने घातला होता. टिपूच्या किल्लेदारानें धारवाड शहरांतील सर्व धान्य जबरदस्तीनें गोळा केलें आणि लढणाऱ्या शिपायांना खाण्याकरितां सर्व धान्य उपयोगांत आणिलें, आणि रयतेनें खुशाल उपाशी मरावे असा बंदोबस्त केला. धारवाडांतील जी हिंदु कुटुंबें उपाशीं मरूं लागलीं त्यांनीं पाहिलें कीं पटवर्धन सरदार हे ज्याअर्थीं हिंदूच आहेत त्या अर्थीं आपण त्यांचे वेढ्यांतून बाहेर पडावें व दूर अंतरावर जाऊन कसें तरी पोट भरावें व प्राण वाचवावे असा विचार करून बायका मुलें व पुरुष यांनीं वेढा घालणाऱ्या परशुराम भाऊ पटवर्धनाला विनंती केली कीं आम्हास तुमच्या वेढ्यांतून दूर देशी प्राण वाचविण्याकरितां जाऊं द्यावें. परंतु ह्या सर्व हिंदू माणसांना परशुराम भाऊंच्या शिपायानीं कैद केले व त्यांचीं नाकें कापून पुन्हा धारवाडच्या कोटाच्या आंत पाठवून दिलें. अशा प्रकारचीं क्रूर पापें करण्याचीं सैतानाला देखील लाज वाटली असती.

ईश्वराचे हिंदुस्थानावर मोठें उपकार आहेत कीं दैवी संपत्तीनें श्रेष्ठ असे इंग्रज राज्यकर्ते लाभले आहेत.

शीलभ्रष्ट होण्यात पाप नाहीं असें अलीकडील विद्वान लोक देखील म्हणूं लागले आहेत. जगद्गुरू शंकराचार्य डॉक्टर कुर्तकोटी यांनीं देखील एके वेळीं आपले व्याख्यानांत असें स्पष्ट विधान केलें होतें कीं " हल्लीं सत्वगुणाची अभिवृद्धी फार झाल्यामुळें पूर्वींच्या वीरवृत्ती ब्राह्मणांप्रमाणें शौर्याचीं कामें होत नाहींत. तमोगुण प्रधान असा शूर पुरुष असावा लागतो. म्हणजे त्याचे हातूनच वाशिंग्टन वेलिंग्टन सारख्या शूरांची कामें त्याच्या चरित्रांत दिसोन येतात. " आपले मताचे पुष्टीकरणार्थ त्यांचा हेतु असा असावा कीं बाजीराव मस्तानीचें प्रकर्ण वसेंच

नेपोलियन बोनापार्ट, एल्फिन्स्टन, इत्यादिंची चरित्रें तमोगुण निदर्शक आहेत. परंतु कुर्तकोटी यांनीं मराठ्यांचे इतिहासाचा अभ्यास चांगला केला नाहीं असेंच म्हणावें लागतें. " अशक्तः सततं साधुः " या तत्वाप्रमाणें सत्वगुण हल्लींच्या पिढीमध्यें कुर्तकोटी यांना दिसतो. वास्तविक नैतिक अधःपात हल्लींच्या सुशिक्षित लोकांमध्येंच जास्त प्रमाणांत आहे. पूर्वींच्या काळीं कर्तबगारी पुरुषांनीं शील निष्कलंक ठेवावे असा पवित्र हेतु त्यांचे मनांत होता. शीलसंपन्नतेमुळेंच आत्म-विश्वास जास्त प्रमाणांत असतो. यामुळेंच अशा लोकांचे हातूनच पराक्रमाचीं कामें झाली. ॥ स्वयोषिति रतिः ॥ हेंच त्यांचें पवित्र ध्येय होतें. आंग्रे घराण्याचा इति-हास पाहिला तर एका पुरुषाला दोन कुटुंबापासोन औरस पुत्र एकंदर अकरा झाले होते. मुधोळ व गजेंद्रगड येथील घोरपडे यांचे घराण्यांत एका गृहस्थाला दोन कुटुंबापासोन मिळोन १६ औरस पुत्र झाल्याचें उदाहरण आहे. " सात कशीं आणि नव कशी असें वर्णन " इतिहासांत आहे.

ह्या प्रकरणाची तपशीलवार यादी दिल्याखेरीज हीं तत्वें उघड होणार नाहींत. इचलकरंजीकर घोरपडे घराण्यापैकीं वेंकटराव नारायण घोरपडे यांचे नातू निषिद्ध पदार्थ व मद्य सेवन करूं लागले सबब त्यांची आजी म्हणजे अनसूया-बाई घोरपडे, बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची कन्या, इचें उतारवय झालें होतें तरी नातवाचे पथकाचा बंदोबस्त ठेवणेंकरितां स्वतः छावणीबरोबर हिंडत असे. तिचा हेतु असा होता कीं मद्याचे दुर्व्यसनामुळें नातवाचे हातून कामगिरी चांगली झाली नाहीं तर सरंजाम जप्त केला जाईल अशी भीति होती. परंतु पूर्ववयात दुर्वृत्तपणा झाला तर तो क्षम्य आहे. याकरितां इचलकरंजीकरांचें उदाहरण अपवादा दाखलच समजावें लागेल. पोक्त वय झालें तरी शील भ्रष्ट होण्याची हौस असलेमुळें एकंदर जनतेला वाईट उदाहरण घालून दिल्याचें पाप कर्त्या-पुरुषांनीं केलें त्यामुळें नाशाची वेळ त्यांनींच जवळ आणिली.

घोडपच्या लढाईंत १७६८ साली पराभव पावून पुतण्या माधवराव बल्लाळ पेशवे यांचे कैदेंत, राघोबा दादा शनवारचे वाड्यांत असतांना देखील त्याच्या आठ रक्षा होत्या असा दाखला सांपडतो. बाळाजी बाजीराव पेशव्याचे वेळीं पेशवाईचा वैभव रवी अत्युच्च पदीं पोहोंचला असतांना बाळाजीनें आपल्या चैनीकरितां आपले हाताखालील अंमलदाराला लिहून, दोन खूपसुरत मुली वेश्यांचे कुळांतून खरेदी करून पुण्यास पाठविणेंबद्दल लिहिलेलें पत्र हल्लीं उजेडांत आलें आहे. सन १७७५ सालीं राघोबा दादा सुरत शहरांत इंग्रजांचा शिधा खात असतांना एका सुंदर नागर ब्राह्मण जातीचे मुलीवर त्यानें बलात्कार केला; त्यामुळें त्या मुलीच्या आईबापानीं विहिरींत उड्या टाकून आत्महत्या केली. ही गोष्ट इंग्रजांचा ठाणेदार यास समजल्याबरोबर राघोबा दादाचे वाड्यावर चौक्या पहारे ठेवून त्यास वाड्याबाहेर पडण्याची बंदी करण्यांत आली होती.

नाना फडणीसाला कटिशूळाची व्यथा फार होती त्याला खूष करण्याकरितां पुण्याचा घासीराम कोतवाल यानें मध्य-हिंदुस्थानांतून खूपसुरत दोन वेश्यांच्या मुली विकत आणून त्यास अर्पण केल्या होत्या. व त्यांच्या वशील्यानें घाशीराम कोतवाल अनन्वित कृत्ये करीत होता. एका सरदाराचे खानदानी घराण्यांत एक सकेशा विधवा होती तिला वश करण्याकरितां नानानें आपले एजंट नेमिले होते. या कामी नागव्या तरवारी घेऊन मारामारी करण्यापर्यंत पाळी आली होती. नागपूरचे रघूजी भोसले व तुकोजी होळकर यांचेजवळ लग्नाच्या बायका खेरीज रक्षा होत्या असा दाखला मिळूं शकतो.

१७८९ साली जे फत्तेसिंग गाइकवाड बडोदें येथें मृत्यु पावले त्यांच्या लग्नाच्या बायका ४ होत्या व रक्षांची संख्या १५६ होती असें पत्र राजवाडे यानीं उजेडांत आणिलें आहे. पुढें इतक्या सर्वांना अन्नवस्त्र देण्याची जबाबदारी गादीवरचे गोविंदराव गाइकवाड यांचेवर पडली. त्यांचे खजिन्यांत पैशाची फार टंचाई होती. सबब १७९४ साली गोविंदराव गाइकवाडानीं लग्नाच्या ४ जणी बायकांना मात्र पोटगीची नेमणूक करून दिली. आणि १५६ रक्षा होत्या त्यांना कांहीं एक न देतां हांकलून लावले.

सन १७७७ सालीं जे परशुरामराव पंतप्रतिनिधि जन्माला आले त्यांचे बाप त्याच दिवशीं वारले. कोणा एका ज्योतिषानें भविष्य केलें व परशुरामरावांना सांगितलें कीं तुम्हास ज्या दिवशीं औरस पुत्र होईल त्या दिवशीं तुम्ही मृत्यु पावाल. सबब त्यांचे डोक्यांत असें वेड आले कीं धर्मपत्नींची गांठच पडूं द्यावयाची नाहीं. त्यांना दोन बायका होत्या. परंतु ताई तेलीण नांवाची रक्षा होती. तिच्यासंबंधीं अनेक भानगडी बंडें, पाखंडें, किचाटें झालीं. पुढें वासोटा किल्ल्यावरील लढाई व बापू गोखले सेनापती यांचेबरोबर लढाई झाली त्यांत त्यांचा हात तुटला व ते थोटे झाले. ह्या गृहस्थांचे पूर्व वयांतील दुर्वृत्तपणाबद्दल सवाई माधवरावांचे हयातीतच पेशव्यांनीं यांना नजर कैदेंत ठेविलें होते. पुढें १८०१ सालीं यांची नजर कैदेंतून सुटका झाली. परंतु त्यावेळीं देखील पेशव्यांनीं दंडा दाखल यांचेकडून पाच लक्षांचा मुलूख जप्त करून घेतला होता. सन १८०९ सालापासून त्यांनीं आपली वर्तणूक पुष्कळ सुधारली. हे दुर्दैवी गृहस्थ १८४८ साली वारले. परंतु उतारवयांत यांची वर्तणूक फार सज्जनासारखी होती व दानशूर असा त्यांचा लौकिक फार चांगला झाला होता.

महादजी शिंदे वारल्यावर त्यांचे विधवा राण्यापैकी वडील राणीनें दौलतराव शिंदे यांना दत्तक घेतलें होते. इतर विधवा ऐन तारुण्यामध्यें होत्या. यापैकीं एका विधवेशीं दौलतराव शिंदे यांचा अश्लाघ्य संबंध होता. व श्रीमंत गृहस्थाचें शील भ्रष्ट झालेलें, इतिहासांत सुसंस्कृत भाषेंत छापलेलें, पटवर्धन दप्तरांतील कागदपत्रांत वाचावयास मिळेल. त्याचें वर्णन असें केलें आहे कीं—" दौलतराव

शिंदे यांनीं एका नाजुक जागीं बदकर्म केले होतें." अशी तक्रार इतर राण्यांनीं केली होती. यावरून साडेचार वर्षे शिंदे बाया व दौलतराव शिंदे यांचेमध्यें लढाया चालल्या होत्या व रयतेची पायमल्ली झाली होती. एकंदर प्रकरणाचा परिणाम मराठ्यांची लष्करी शक्ति कमी होत जाऊन हा देश जिंकण्याला इंग्रजांना सोपें गेलें. शौर्याविषयीं प्रसिद्ध अशा ज्या जाती हिंदुस्थानांत प्रसिद्ध होत्या म्हणजे रजपुत, जाठ, शीख, पुरभय्ये, मराठे, गिराशिया, गुरखे इत्यादि जातीप्रमाणें प्रभू किंवा ब्राह्मण ह्या दोन जाती शौर्याविषयीं मुळींच प्रसिद्ध नव्हत्या. ह्या दोन जातींमध्ये जें शौर्य होतें तें कृत्रिम शौर्य होतें. मराठी साम्राज्याची वाढलेली लाट ओसरल्यानंतर त्यांचे कृत्रिम शौर्य देखील नाहींसें झालें. ह्या दोन जातींमध्यें लढवय्ये लोकांचें प्रमाण फार अल्प होते. एकवीस वर्षावरच्या पांच हजार पुरुषांमध्यें एक प्रभू किंवा ब्राह्मण लढवय्या होता. इतकें अल्प प्रमाण होतें. गोविंद हरी पटवर्धन शौर्य आणि मुत्सद्दीपणा ह्या बाबतींत प्रसिद्ध होते. त्यांची सखाराम भगवंत बोकील ह्या सैतानी लीला करणाऱ्या प्रसिद्ध मुत्सद्दी पुरुषां-बरोबर तीव्र स्पर्धा कशी चालली होती हें पुढील उदाहरणावरून दिसोन येईल. सखाराम भगवंत बोकील हा इतका उलट्या काळजाचा होता कीं त्याच्या संबंधीं गोविंद हरी यानीं पुढील उद्‌गार एका खाजगी पत्रांत लिहिले आहेत. बोकील म्हणजे ॥ परित्राणाय दुष्टानाम् ॥ साधूनां निग्रहायच ॥ असा होता.

सनातन धर्माचा दुर्बळपणा

हें प्रकरण सुरू करण्यापूर्वीं सुशिक्षित वाचकापुढें एक प्रकारचें कटुसत्य ठेवावें लागत आहे. तें कोणास आवडणार नाहीं त्यास नाइलाज आहे. परंतु मराठी साम्राज्याच्या नाशाला जीं अनेक कारणें झालीं त्यापैकीं कपर्यांत नऊ आणे कारण सनातन धर्माचा दुर्बळपणा हें होय. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दत्तक पुत्र एकच घेता येतो, परंतु पेशवे पैशाच्या अडचणीत होते तेव्हां त्यांनीं मालेगांव येथील राजेबहादूर या ब्राह्मण सरदारांच्या सरंजामाला दोन दत्तक घेण्याची मंजुरी दिली आणि अशा रीतीनें रघुपतराव आणि त्र्यंबकराव ह्या दोघां दत्तकाकडून निरनिराळा नजराणा घेऊन त्यांचा सरंजाम दोघां दत्तकामध्यें वांटून देण्याला पेशव्यांनीं मंजूरी दिली. दमाजीराव गायकवाड यांच्या चौघा मुलापैकीं वडील पुत्र कोण याबद्दलचा तंटा २४ वर्षेपर्यंत चालू देण्याचे वास्तविक कांहीं कारण नव्हते. बापानें ज्याचें तोंड अगोदर पाहिले तो मुलगा वडील असे शास्त्रांत स्पष्ट आहे. परंतु शास्त्राज्ञेप्रमाणें अंमलबजावणी करण्याचें मनोधैर्य पेशव्यांच्या अंगांत नव्हते. अशीं शेंकडों उदाहरणें मी दाखविणार आहे.

हिंदूंना धर्माचा उपयोग काय आहे याचें उत्तर थोडक्यांत देणें कांहीं अवघड नाहीं. ईश्वर सर्वव्यापी आहे, सर्वसाक्षी आहे, ईश्वरावर आस्तिक्य बुद्धि ठेविली असतां मनुष्याचें अंगीं पापभीरुत्व येतें, मनुष्याचें शील निष्कलंक राहते, आणि केवढेंही भयंकर संकट प्राप्त झालें तरी, मनाचा समतोलपणा न ढळूं देता अंगीं असामान्य धैर्य आणतां येणें हा खरोखरी धर्माचा उपयोग होय. परंतु आजकाल मूर्तिपूजा आणि पुराणांतील लक्षावधि कथा यांचा फाफट पसारा हेंच धर्माचें स्वरूप मानण्यांत येत आहे. सुशिक्षित उपाध्याय वर्गानें मागासलेल्या लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आपली पोळी पिकविण्याकरितां पुराणांत घुसडण्याकरितां नवीन कथा कशा निर्माण करितां येतात हें सिद्ध करणें हल्लीं फार सोपें झालें आहे. ब्राह्मण वर्गानें आपल्या सामाजिक वर्चस्वाचा दुरुपयोग करून समाजाला चुकीचा मार्ग दाखविला, हें स्पष्ट उजेडांत आणण्याचें काम पुढारी म्हणविणारांचें आहे. अकबर बादशहानें पंचवीस वर्षेपर्यंत प्रयत्न करून निरनिराळ्या धर्मांच्या पंडितांची सभा भरविली. आणि धर्मांच्या बाबतींत एकवाक्यता करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो सुधारणेचा काल नव्हता, सबब या कामांत अकबर बादशहाला यश आलें नाहीं हें साहजीकच होतें.

हल्लींच्या काळच्या विद्वानांची गोष्ट तशी नाहीं. त्यांनीं जर मनांत आणिलें असतें तर, जें काम अकबर बादशहाला पंचवीस वर्षांत करितां आलें

नाहीं तें काम ह्या विद्वान पुढाऱ्यांना पंचवीस तासांत देखील करतां आलें असतें. उदाहरणार्थ, चिंतामण विनायक वैद्य, नामदार गोखले, बॅरिस्टर सावरकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, महादेव गोविंद रानडे, चिंतामण गंगाधर भानु, आणि नरसिंह चिंतामण केळकर हे सुशिक्षित पुढारी. व यांच्याच योग्यतेचे विद्वान आज देखील हयात आहेत. अशानीं जर मनांत आणिले तर सुशीक्षित उपाध्याय वर्गाचा हा स्वार्थ लंपटपणा नाहींसा होण्यास कांहीं फार वेळ लागणार नाहीं. पेशवाईचा उदय होण्यापूर्वीपासून देखील हा स्वार्थलंपटपणा सुरू होताच. परंतु हल्लीं देशांत शांतता पसरली आहे, शिक्षणकला सुरू झाली आहे, मुद्रण कलेच्या योगानें शेंकडों धर्मग्रंथ एकाच मनुष्याला वाचता येतात. हिंदुस्थानांतला कच्चा माल युरोपला गेल्यामुळे त्याची किंमत म्हणून दरसाल पांचशें कोटि रुपये हिंदुस्थानांत येतात, आगगाडीच्या योगानें दूरदूर असणारीं क्षेत्रें नजीक येऊं लागली, आणि पैसा फार सवंग झाला, त्या कारणानें निरनिराळ्या ठिकाणीं चालणाऱ्या पंडे लोकांच्या लबाड्या एके ठिकाणीं बसून वाचतां येऊं लागल्या. ह्याचा बंदोबस्त सुशिक्षित पुढारी लोकांनीं पूर्वीच करावयास पाहिजे होता तो न केल्यामुळें त्याचे वाईट परिणाम हिंदुस्थानला भोगावे लागत आहेत. असा हा स्वार्थ लंपटपणाचा बाजार शेंकडों पटीनें वाढत चालला आहे.

ह्या ग्रंथांत अशा प्रकारचीं उदाहरणे जरी पंचवीस तीसपेक्षां जास्त देतां येत नाहींत, तरी हजारों उदाहरणें देतां येतील असे धर्मग्रंथ छापून तयार आहेत. तीं उदाहरणें येणेंप्रमाणें. श्रीकृष्णानें अर्जुनाला भगवत् गीता सांगितली तिचीच पॅराफ्रेज वरून गणेशगीता बनविली. पंढरपूरचा जो विठोबा आहे तो वास्तविक बौद्धधर्मीय लोकांचा साधु पुरुष बोधिसत्व या नांवाचा होता तो कमरेवर हात ठेवून व्याख्यानें देत असे, त्याचा दगडाचा पुतळा केलेला आहे. त्यालाच द्वारकेच्या श्रीकृष्णाचा टोप चढवून पांडुरंग बनविला आहे. एखाद्या नटाला ज्याप्रमाणें बुधवारीं दुष्यंताचा टोप व शनिवारीं अर्जुनाचा टोप चढवावा, त्याचप्रमाणें हा पांडुरंग बनविला आहे. जो विद्वान हैड्रोस्टॅटिक्स जाणतो त्यानें मनांत आणिलें तर, पोरबंदर जातीच्या दगडाची दीड फूट लांब आणि एक फूट रुंद अशी दगड कोरून नौका तयार करून ती पाण्यावर तरंगते असें दाखवितां येईल. पुंडरिकाची नौका पाण्यावर तरंगते ह्या चमत्कारांत ईश्वरी साक्षात्कार कांहींच नाहीं. ॐकाराचा गणपती बनविला आहे आणि त्याची गणेश पुराणें लिहून, श्रीकृष्णानें लहानपणीं गोकुळांत असतांना जसे पोरखेळ केलें तसेच पोरखेळ गणेश पुराणांत गणपतीनें केलें अशा सर्व बनावट कथा १८०४ साला नंतर नवीन बनविल्या आहेत. थंडीच्या दिवसांत उजाडण्यापूर्वी तरुण गोपी आपली वस्त्रें वाळवंटांत ठेवून ज्याप्रमाणें यमुना नदींत स्नान करतात, त्या नग्न अवस्थेंत असतांना बाहेर येऊन पाहतात तो सर्वांची वस्त्रें श्रीकृष्णांनीं

झाडावर चढविलीं, त्यामुळें त्यांचा जो गोंधळ होतो तसाच गोंधळ आणि पोरचेष्टा गणपतींनी अष्टसिद्धींचीं वस्त्रें झाडावर लपवून ठेवण्याचें काम करून केली आहे. अशी धर्म विडंबना उपाध्याय वर्गानें आपली पोळी पिकावी म्हणून हीं बनावट केली आहेत. हरीद्वार क्षेत्रांत गंगानदीच्या पलिकडच्या कांठावर एक शंकराचे मंदिर आहे त्या ठिकाणीं स्फटिकाची पिंडी आहे व पुरुषांच्या इंद्रिया इतकें उंचीचे आणि सवा इंच जाडीचे शंकराचें लिंग आहे, त्या ठिकाणीं आंतील गाभाऱ्यांत जाऊन पुजाऱ्याला सवा रुपया फी देऊन, आपल्या पती· प्रमाणें त्या लिंगाशी कुलीन स्त्रिया क्रीडा करीत असतात. ह्या क्रियेला भोग असें नांव आहे. कोणाही पुरुष यात्रेकरूला त्या गाभाऱ्यांत जाण्याची परवानगी नाहीं. फक्त पुजारी आणि फी देणाऱ्या कुलीन स्त्रिया यानांच हे पुण्य संपादन करतां येतें. हिंदुस्थानांत सुशिक्षित लोकांना इतका दुर्बळपणा आला आहे कीं असल्या निंद्य गोष्टींचा निषेध करण्याचें मनोधैर्य त्यांच्यांत उरलें नाहीं. जगन्नाथपुरीच्या बाजूला कित्येक मंदिरांच्या बाहेरील शिखरावर अशा प्रकारची बीभत्स चित्रें फार पूर्वीपासून कोरिलेलीं आहेत. नग्नावस्थेंत पुरुष आणि स्त्री यांचें मैथुन प्रसंग त्या चित्रांत दाखविले आहेत. हल्लींचे सुशिक्षित लोक तीर्थयात्रा करण्यांत जो खर्च करतात त्या पैशानें अशा ठिकाणीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटची परवानगी घेऊन अशा चित्रांच्या जागीं सिमेंटचा गिलावा करून त्यावर उत्तम पक्के रंग देऊन, त्याच्यावर रामपंचायतन, शिवपंचायतन वगैरे देवतांची सुंदर चित्रें रंगविण्यांत जर हा पैसा खर्च केला तर तें काम अधिक पुण्यकारक होईल.

जैमिनी अश्वमेध नांवाच्या पुराणांत असें वर्णन केलें आहे कीं, अर्जुनाच्या यज्ञाचा घोडा निरनिराळ्या आणि चमत्कारिक देशांत गेला आणि तेथें तेथें तेथील राजाशीं लढण्याकरितां सैन्य घेऊन अर्जुन त्या घोड्याबरोबर जात असे. एका देशांत अशा प्रकारचीं चमत्कारिक झाडें अर्जुनानें पाहिलीं कीं, जशीं कवठें, बेलफळें किंवा सिताफळें हीं झाडांच्या फांद्यांना फळें लागतात तशीं माणसें फळासारखीं झाडावर उत्पन्न होतात असे देश त्यानें पाहिलें. त्या देशांत एवढ्या प्रचंड आकाराच्या राक्षसी अर्जुनानें पाहिल्या कीं प्रत्येकीचें स्तन शंभर योजनें लांब होतें. त्या राक्षसींनीं अर्जुनाच्या सैन्याशीं लढण्याकरितां कोणतीही पोलादाचीं हत्यारें न आणितां आपल्या स्तनांचाच उपयोग हत्यारासारखा करून अर्जुनाच्या सैन्यांतील हत्ती, घोडे, उंट आणि रथ यांचा चुराडा केला. गंगा नदीच्या पवित्रपणाबद्दल पुराणामध्यें जी कथा आहे ती सुद्धां निंद्य प्रकारानेंच लिहिली आहे. ब्रह्मदेवाला सरस्वति नांवाची अतिशय सुंदर मुलगी होती. ती अठरा वर्षांच्या भर तारुण्यांत असतांना तिच्या बापाला तिच्या उपभोगाची इच्छा झाली आणि त्यामुळें बापाचें वीर्य स्खलन पावलें आणि तेंच वीर्य पुढें गंगा नदीच्या प्रवाहाच्या रूपानें वाहूं लागलें. ब्रह्मदेव हा सृष्टि उत्पन्न करणारा त्याचें वीर्य पवित्र, यामुळें त्या वीर्या-

पासून जो नदीचा ओघ सुरू झाला त्याला पवित्रपणा आला. अशा प्रकारच्या कथा पुराण ग्रंथांत राहूं देणें ही सनातन धर्माची विडंबनाच होय.

श्रीयाळ राजा फार दानशूर होता. त्याची राणी चांगुणा ही दोघेहि पवित्र आचरणाची होती. एकदां शंकरांनीं वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन त्या राजाच्या सत्वाची परीक्षा पहाण्याकरितां अतिथीच्या रूपानें राजाकडे येऊन याचना केली. राजाचा एकुलता एक मुलगा चिलिया याला ठार मारून त्याच्या मांसाचें भोजन मला दे, अशी याचना केली. अतिथीची इच्छा जर पूर्ण केली नाहीं तर राजाचें सत्व घेऊन अतिथि विन्मुख परत जाईल ही राजाला भीति होती. आणि त्यामुळें त्या राजाला मोठें पाप घडेल. सबब राजानें आणि राणीनें आपल्या एकुलत्या एक मुलाला ठार मारून अतिथि करितां भोजन तयार केलें. पुढें शंकर प्रसन्न होऊन त्या मुलाला जिवंत केलें. भक्तांच्या उद्धाराकरितां ह्या भगवंताच्या लीला आहेत असें सांगण्यांत येतें, परंतु खरोखरी ह्या भिक्षुकांच्या पोट भरण्याच्या लीला होत. अशा प्रकारच्या हजारो कथा बनावट आहेत. ही सनातन धर्माची विटंबनाच होय.

जगामध्यें ज्या मोठमोठ्या नद्या आहेत त्या सर्व नद्यांना लहान लहान नद्या जेव्हां मिळतात तेव्हांच मोठी नदी तयार होते. व पावसाचें पाणी जास्त पडलेले समुद्राकडे पोचविण्याला ह्या नद्या उपयोगी पडतात. जेथें जेथें डोंगराळ प्रदेश आहे तेथें तेथें लहान नद्यांची संख्या मोठी असणारच. असें असतांना केवळ भिक्षुकांनीं स्वार्थ लंपटपणानें आपलीं पोटें भरावींत म्हणून नद्यांच्या अवतार कथा लिहून ठेवल्या. यमुना नदी ही सूर्याची कन्या. गाणगापूर येथील अमरजा नदी ही एका महंत ऋषीच्या वीर्य बिंदूपासून उत्पन्न झाली आहे अशी कथा आहे. कृष्णानदीचे वर्णन " विष्णु तनुः साक्षात् " असे वर्णन आहे. भागीरथी नदी विष्णूच्या पादांगुष्ठापासून उत्पन्न झाली. तापी नदी ही सूर्य कन्या. नर्मदा नदी ही चंद्राचा अवतार आहे. अहमदाबाद येथील साबरमती नदी ही गारूड्याच्या मंत्रामुळें उत्पन्न झाली म्हणून तिचे नांव साबरमंत्री असें संस्कृतांत आहे. ह्या सर्व नद्यांच्या अवतार कथा बनावट लिहिलेल्या आहेत. आर्य लोक जेव्हां उत्तरेकडून हिंदुस्थानांत कायमचे राहण्यास आले तेव्हां त्यांच्या धर्मग्रंथांत मूर्तिपूजा बिलकुल नव्हती. त्यांचे पूर्वीं अनार्य लोक आणि द्रविड लोक यांच्या धर्मांत मूर्तिपूजा होती. अनार्य लोकांची देवतांची नांवें जानाई, जोखाई, जोतीबा, खंडोबा, मरीआई, फोडजाई, वाघजाई वगैरे देवता होत्या. एका दगडाला शेंदूर फासून त्याची देवाप्रमाणें पूजा करावयाची आणि त्याच दगडाला " देवी " असें म्हणत असत. कोणताही रोग सुरू झाला म्हणजे देवीची अवकृपा झाली असें अनार्य लोक मानीत असत. त्यामुळें गोस्तन देवीला हल्लीं उत्तरेकडे माता म्हणतात, किंवा महामारी, मरीआई ही नांवें रोगांची सांथ सुरू झाली म्हणजे देतात. पंजाबांत एक निद्रित ज्वाला-

मुखी पर्वत कांग्रा जिल्ह्यांत एका डोंगराच्या माथ्यावर आहे. एखाद्या विहिरीप्रमाणें त्याचें भगदाड मात्र शिल्लक आहे. त्या भगदाडा शेजारी ज्वाला देवी नांवाचें मंदिर आहे त्या देवीची यात्रेकरू सध्यां पूजा करितात. जर तो ज्वालामुखी पर्वत अग्नि ओकूं लागला तर, देवीची अवकृपा झाली अशी अनार्य लोकांची समजूत असे. आर्य लोकांची संस्कृति शिल्पकलेमध्यें अनार्य लोकापेक्षां जास्त असल्यामुळें पूर्वीच्या शेंदूर फासलेल्या दगडाऐवजी उत्तम नाका डोळ्यांची तरूण स्त्री तयार करून ती दगडाची मूर्ति, आर्य लोक मंदिरांत स्थापूं लागलें, अशाच प्रकारें एक अनार्यांची कथा घेऊन तिला सुंदर संस्कृत पेहराव चढवून तिच्याबद्दल संस्कृत पुराणें लिहून यात्रेकऱ्याकडून पैसे उकळण्याचें काम उपाध्याय वर्ग कसा करीत असतो त्याचें एक उदाहरण कर्नाटकांत आहे.

शंकर आणि पार्वती ही अत्यंत दरिद्री होती. थंडीकरितां गरम कपडे विकत घेण्याला त्यांच्याजवळ एक तांब्याचा पैसा देखील नव्हता. त्यांची गोधडी अठ्ठयाहत्तर ठिगळें लाविलेली पार्वतीजवळ असतांना, शंकरांनीं आपल्या पत्नीची चेष्टा करण्याकरितां एका उंदराचें रूप धारण केलें, आणि त्या गोधडीला शेंकडो छिद्रें पाडिलीं. हें जेव्हां पार्वतीनें पाहिलें तेव्हां ती रडूं लागली व आपला पती रागावेल ह्याची पार्वतीला मोठी भीति वाटूं लागली. तेव्हां शंकरांनीं एका शिंप्याचें रूप धारण केलें, आणि त्या शिंप्याला पार्वतीनें विनंती केली कीं, माझा पती संध्याकाळीं घरीं येण्याच्या अगोदर ही गोधडी शिवून दे. माझ्याजवळ तांब्याचा पैसा देखील नाहीं. तुझ्या मजुरीबद्दल भिक्षेच्या धान्यापैकीं मी कांहीं धान्य तुला देईन. परंतु त्या शिंप्यानें सांगितलें कीं मी तुझी गोधडी शिवून देतो, परंतु त्याच्या वेतनाबद्दल तूं माझी कामवासना एक वेळा पुरी केली पाहिजेस. ते पार्वतीनें कबूल केलें. पुढें तो शिंपी पार्वतीचा उपभोग घेत असतांना मैथून प्रसंग पुरा होण्यापूर्वींच पार्वती त्या शिंप्याच्या बाहुपाशांमध्यें असतांनाच शंकरांनीं आपलें खरें रूप प्रकट केलें. त्यामुळें पार्वतीला फार लज्जा उत्पन्न झाली, आणि आपलें तोंड आतां पतीला कसें दाखवावें म्हणून तिच्या शरीरावरून तिचें मुंडकें उडून गेलें. हल्लीं ती दगडाची मूर्ति शेंदूर फासलेली नग्न स्थितीमध्यें उताणी निजलेली बिन-डोक्याची मूर्ति कर्नाटकांत मलप्रभा नदीच्या कांठीं लज्जागौरी मंदिर या नांवानें प्रसिद्ध आहे. आणि भाविक सनातनी भक्त त्या मंदिराच्या दर्शनार्थ अद्यापि जातात. अशा प्रकारच्या अनार्यांच्या कथांना संस्कृत पेहराव चढवून पुजारी लोकांना दक्षिणा मिळावी म्हणून नवीन कथा उत्पन्न करितात. ही धर्मविडंबनाच होय. ज्या पार्वतीला जगन्माता म्हणून मानण्यांत येते, तिच्यासबंधीं अशा प्रकारच्या निंद्य कथा संस्कृत पुराणांत लिहून ठेविल्या आहेत.

ऋग्वेदांतील ऋचांचा अडाणी लोकांना अर्थ समजत नाहीं, त्याचा फायदा सुशिक्षित उपाध्याय लोक कसे घेतात याचें उदाहरण पुढें दिलें आहे.

॥ विष्णुर्योनिं कल्पयतु, त्वष्टारूपाणि पिंशतु ॥

ही एक ऋग्वेदांतील ऋचा आहे. तिचा भलता अर्थ करून भाविक लोकांना कसें फसवितात ते पुराणांतील कथांवरून स्पष्ट दिसतें. शंकराची पहिली पत्नी दाक्षायणी हिनें अग्निकुंडांत उडी टाकून आत्महत्त्या केली. नंतर ती हिमालयाच्या पोटीं जन्म घेऊन पार्वती या नांवानें पुन्हां तिनें दुसऱ्या जन्मीं शंकराशीं लग्न लाविलें. दरम्यान पुष्कळ वर्षेपर्यंत शंकरानीं विधुर अवस्थेंत दिवस काढिले. शंकरांना जेव्हां इंद्रियनिग्रह शक्य होईना, तेव्हां ते ऋषींच्या आश्रमांत गेले. त्या ठिकाणीं तीनशें ऋषि अनुष्ठानाकरितां आपल्या घरापासून फार दूर गेले होते. घरीं त्यांच्या धर्मपत्न्या एकट्याच राहिल्या होत्या. शंकरांनीं प्रत्येक ऋषि पत्नीच्या नवऱ्याचें पृथक् पृथक् रूप धारण करून सर्व ऋषि पत्न्यांचें पातिव्रत्य भ्रष्ट केलें. शंकर हे अमोघ वीर्य असल्यामुळें सर्व ऋषि पत्न्या ताबडतोब गरोदर राहिल्या. सर्व ऋषि अनुष्ठानाहून परत आल्यानंतर त्यांनीं पाहिलें कीं आपण हजर नसतांना आपल्या धर्मपत्न्या गरोदर कशा राहिल्या. ऋषींनी ज्ञानचक्षूनें पाहिलें तेव्हां त्यांना समजलें कीं, हा पाजीपणा शंकरानें केला आहे. तेव्हां त्यांनीं शंकराला शाप दिला कीं अशा पाजी मनुष्याचें लिंग पतन होवो. शंकर हा जगताचा पिता त्याचें लिंग पतन झालें म्हणजे सर्वत्र हाहाकार होईल. सबब विष्णूला दया येऊन विष्णूंनीं योनीचें रूप धारण केलें. आणि त्या योनीच्या अंतर्भागांत शंकराच्या लिंगाचा समावेश केला. आज शंकराच्या मंदिरांत जें शिवलिंग म्हणून दिसते, ते शंकर आणि विष्णू ह्या दोघांच्या सहकार्याचें दृश्यफळ म्हणून दाखविण्यांत येते. हल्लीं ऋग्वेदाचा बरोबर अर्थ करणारे ग्रॅज्युएट हजारों आहेत. शंकर याला जर जगताचा पिता मानावयाचे, तर तो देखील पाप कर्में करतो असें आपण म्हणणें म्हणजे धर्म विडंबना होय. श्रीमत् भागवताच्या चतुर्थ स्कंधांत याच शंकरासंबंधीं कसें वर्णन केलें आहे त्याचा मासला पुढील श्लोकांत पहावयास सांपडेल.

॥ भवे शीलवतां श्रेष्ठे, दक्षो दुहितृ वत्सलः ॥ विद्वेषं मकरोत् तीव्रं ॥ इत्यादि या श्लोकावरून शीलवतांम् श्रेष्ठे असें ज्या देवतेचें वर्णन आहे तो देव व्यभिचार करील हें शक्य आहे काय ?

अगस्त्य रामायण म्हणून एक फार प्राचीन ग्रंथ आहे. त्यांत अयोध्येच्या रघुराजाविषयीं म्हणजे दशरथाच्या फार पूर्वीं होऊन गेलेल्या अशा रघुराजाच्या औदार्याविषयीं एक कथा आहे. रघुराजाच्या जनानखान्यांत सातशें राण्या होत्या. त्या सर्वांना मुलें झाली नव्हती. शंकरांनीं एका दरिद्री वृद्ध ब्राह्मणाचें स्वरूप धारण केलें आणि रघुराजाच्या राण्यापैकीं एका रूपयौवन संपन्न राणीला अशी विनंती केली कीं “ माझ्या दारिद्यामुळें माझें लग्न झालें नाहीं. आतां वृद्धापकाळ झाला आहे. तरी स्त्री संभोगाची इच्छा माझी कायम राहिली आहे. त्याकरितां त्या तरुण राणीला अशी विनंती केली कीं, मला दुसरें कोणतेही दान न देतां

स्त्री संभोग भिक्षा मला द्या; राजाला सातशें राण्या आहेत. त्या अर्थी एखादी राणी एखाद्या भिक्षुकाला दान दिली तरी राजाची कोणतीही गैरसोय होणार नाहीं. " त्यावर राणीनें जबाब दिला कीं, " कोणत्याही ब्राह्मणाला नाखुष करण्याची माझी इच्छा नाहीं. परंतु माझ्या पित्यानें कन्यादान करून मला रघुराजाला अर्पण केली आहे. त्या अर्थी रघुराजाची परवानगी घेऊन नंतर मी तुमची विनंती मान्य करीन. " असें म्हणून त्या राणीनें त्या वृद्ध ब्राह्मणाला पालखीत घालून मोठ्या सन्मानानें राजाकडे नेलें. राजानें राणीची विनंती मान्य करण्याकरितां सर्व राण्याना त्या वृद्ध ब्राह्मणापुढें उभ्या केल्या. आणि विचारिलें ह्या सातशें राण्यापैकीं तुम्हाला जी कोणती पसंत असेल ती मागा म्हणजे मी तिला तुमच्या उपभोगासाठीं पाठवून देतो. वृद्ध ब्राह्मणानें त्या सर्व सुंदर राण्यांना पाहून राजाजवळ सर्व " राण्यांना मला बक्षीस दे " अशी विनंती केली. नंतर राजानें पाहिलें कीं, इतक्या राण्यांना पोसण्याचें सामर्थ्य ह्या दरिद्री ब्राह्मणांत कोठून असणार ? सबब सर्व राण्यांचें दान करून त्यांचे खर्चाकरितां रघुराजानें आपलें सर्व राज्यही त्या ब्राह्मणाला बक्षिस देऊन त्याप्रमाणें त्याचे हातावर दान दिल्याचें उदक सोडिलें. ही कथा देखील धर्म विडंबनेचा एक नमुना आहे. ब्राह्म विवाहाप्रमाणें कोणत्याही पतीला आपली धर्मपत्नी दुसऱ्या पुरुषाला उपभोगाकरितां देण्याला अधिकारच नाहीं. धर्मपत्नीला " सहधर्मचारिणी " हें जें विशेषण लाविलें आहे तें यथायोग्य आहे. धर्मेच अर्थेच कामेच नाति चरामि, ही जी ब्राह्मविवाहामध्यें प्रतिज्ञा करावी लागते तिचा अर्थ पति-पत्नींनी सहकार्यानें सर्व संसारयात्रा सुखावह करावी. आणि पुत्रोत्पत्ति करून पितरांच्या ऋणांतून मुक्त व्हावें. जरी कन्यादान केलें असलें तरी त्या धर्मपत्नीच्या शरीराचा उपभोग एखाद्या वेश्येसारखा दुसऱ्याला करूं द्यावयाचा नाहीं. जरी ही कथा अगस्त्य रामायणांतील आहे तरी ती एक धर्म विडंबनाच होय.

अरबी भाषेंतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टींचे हिंदुस्थानांतल्या देशी भाषांतून भाषांतर झाल्यानंतर त्यापैकीं जादूचा घोडा ह्या गोष्टीचा आधार घेऊन, बनावट कथा दोन ठिकाणीं रचिलेली आहे. शनि महात्म्यांत विक्रमराजा जादूच्या घोड्यावर बसून हजारों मैल दूर अंतरावर परक्या देशांत जाऊन उतरतो अशी ती कथा आहे. दुसरी कथा म्हणजे पांडवांचा नंबर तीनचा भाऊ जो अर्जुन त्याचें एक नांव फाल्गुन असे आहे. फाल्गुन ह्या नांवाचा फायदा घेऊन त्याचें शंखीनी नांवाच्या राक्षसिनीबरोबर जाऊन लग्न होतें. त्या बेटावर अर्जुन एका जादूच्या घोड्यावर बसून आकाश मार्गानें गेला अशी कथा आहे. त्या राक्षसीबरोबर लग्न झाल्यानंतर त्याला एका दिवसांत एक हजार मुलें झाली. अशी आख्यानें हरीदास लोक कीर्तनांत लावितात. चिपळूणकरशास्त्री यांनीं अरबी भाषेंतील

गोष्टींचें भाषांतर केल्यानंतर ह्या कथा रचण्यांत आल्या आहेत. पाऊणशें वर्षांपूर्वी असल्या कथा कोणत्याहि पुराणांत नव्हत्या. ही सुद्धां धर्म विडंबनाच होय.

सत्य नारायणाची कथा साठ वर्षांपूर्वीं मुळींच अस्तित्वांत नव्हती. तिचेंच अनुकरण करून सत्यविनायक, वरद शंकर, सत्य दत्त, सत्य जगदंबा इत्यादि नवीन नवीन कथा उपाध्याय वर्गाचीं पोटें भरण्याकरितां शेंकड्यांनीं आणि हजारांनीं निर्माण केल्या जात आहेत. इ. स. १६६३ सालापूर्वीं मुंबई बेट पोर्तुगीजांच्या ताब्यांत होतें. त्यावेळीं शपथ वाहण्याला देखील हिंदूंचा देव मुंबई बेटांत नव्हता. एखादा कवठाएवढा दगड शेंदूर फासलेला असला तरी पोर्तुगीज लोक तो समुद्रांत फेकून देत असत. सहासात मैलाच्या टापूंत गोडे पाणी देखील बिलकुल मिळत नसे. बॉम्बे हें पोर्तुगीज नांव आहे त्याचा अर्थ उत्तम बंदर असा आहे. या बंदरांत जहाज येतांना खडकावर आपटल्याखेरीज धक्याला पोचते, त्यामुळें हे नांव देण्यांत आलें होतें. असें असून हल्लीं मुंबादेवी हें संस्कृत नांव महाअंबा यावरून बनावट कथा स्वयंभु देवीच्या बनविण्यांत आल्या. मुंबईत गोडें पाणी नळानें आणल्यानंतर हीं मंदिरें बनविण्यात आलीं. इंग्रज व्यापाऱ्यांचा हेतु नेहमींच असा कीं, गिऱ्हाइकाला खूश ठेऊन व्यापारांत जास्त नफा मिळवावा. याप्रमाणें कोणत्याही धर्माचे लोक व्यापार धंद्यानिमित्त मुंबईत आले आणि त्यांनीं आपापलीं मंदिरें बांधिलीं तरी इंग्रज राज्यकर्ते त्यांचीं मनें मुळींच दुखवीत नसत. त्यावरून आज मुंबई बेटांत जीं मंदिरें दिसतात म्हणजे भुलेश्वर, काळबादेवी, बाबूलनाथ, वाळकेश्वर, महालक्ष्मी इत्यादि जीं हिंदू मंदिरें दिसतात, आणि ज्या मंदिरासंबंधीं स्वयंभू आणि जाग्रत देवस्थानें असें मुंबापुरी महात्म्यांत वर्णिलें आहे तीं तीं देवस्थानें निरनिराळ्या ठिकाणाहून निरनिराळ्या कामगारांनीं मुंबईत बांधिली आहेत. बॉम्बे यावरूनच महांबा हे संस्कृत नांव बनविलें गेलें. व महाराष्ट्रीय लोक तिलाच मुंबई म्हणू लागले. वास्तविक अशीं पुराणें लबाड लोकांनीं व्यासाच्या नांवावर संस्कृतांत लिहिलीं आहेत. मुंबईच्या खेतवाडीमध्यें लक्ष्मी-व्यंकटेश्वर छापखाना वाफेच्या यंत्रानें चालणारा आहे. त्यामध्यें धर्मग्रंथ फार मोठ्या प्रमाणावर छापले जातात. जे शास्त्री पंडित चांगल्या अक्षरांत बालबोधींत कंपॉझिटर करितां धर्मग्रंथांची सुवाच्य नक्कल करितात, त्यांनीं आपल्या पदरचे संस्कृत श्लोक भविष्य पुराणांत लिहून घातले, ते असे आहेत कीं, ॥ कलीयुगामध्यें खेतवाडी नांवाच्या पेठेंत लक्ष्मी व्यंकटेश्वर नांवाचें मुद्रणयंत्र सुरू केलें जाईल." वास्तविक असे बनावट श्लोक लिहिण्याबद्दल छापखान्याच्या मालकाची त्यांना आज्ञा नव्हती. भविष्यपुराणाच्या श्लोकांत आज आपल्याला व्हिक्टोरिया राणी, पार्लमेंट, शिवाजी, ॲडम आणि ईव्ह, फेब्रुवारी इत्यादि शब्द पहावयास सांपडतात. कलियुगांत व्हिक्टोरिया राणी हिंदुस्थानावर राज्य करील हें भविष्य

दोन लक्ष वर्षांपूर्वी व्यासांनीं पुराणांत लिहून ठेविलें आहे, असें दाखविण्याचा ह्या धूर्त लोकांचा प्रयत्न आहे.

अनार्य लोकांच्या गचाळ गोष्टी आपल्या धर्मग्रंथांत घेऊन त्यांना संस्कृत पेहराव चढवून नारद पुराणांत लिहिलेल्यापैकीं एक गोष्ट अशी आहे कीं जगन्नाथपुरी येथील जो मुख्य देव आहे त्याला अतिसार दुखण्याची बाधा झाली आहे, सबब मंदिराचें दार बंद करून दर्शन बंद करतात. पुढें देव मृत झाला असें जाहीर करितात. नंतर देवाचा पुन्हा जन्म झाला पाहिजे याकरितां देवाचा पुजारी जो असेल त्याच्या शयन गृहांत त्याच्या उपभोगासाठीं देवदासींना पाठवितात. ह्या देवदासी म्हणजे खंडोबाच्या मुरळ्या किंवा मालवण प्रांतांतील भावीणी किंवा मद्रास इलाख्यांतील नृत्यांगना अशा प्रकारच्या असतात. यानंतर कांहीं महिन्यांनीं देव जन्माला आला असे जाहीर करतात. देवाची दगडाची मूर्ति पूर्वींचीच कायम असते. वार्षिक जत्रेच्या वेळीं कृष्ण, रुक्मिणी आणि सुभद्रा ह्या तिघांचे रथ मिरवणुकी करितां काढतात. या रथाची उंची नारद पुराणांत सांगितल्याप्रमाणें तसू किंवा इंच यांत एक केसभर सुद्धां कमी असतां कामा नये अशी व्यवस्था ठेवतात. पुढें कृष्ण रुक्मिणीला घेतल्याखेरीज एकटाच रथांत बसतो या करितां पुजारी लोक रुक्मिणीतर्फे मुखत्यार पत्र घेऊन वेताच्या छड्यांनीं कृष्णाला झोडपून काढतात. मिरवणुकींतील ह्या मंगल प्रसंगाचें वेळी ज्यांना आनंद होत असतो, असे भाविक यात्रेकरू लोक तेथें हजर असतात.

अशा प्रकारें गुजराथ देशांत जीं अनेक देवस्थानें आहेत, तेथील पुजारी लोक म्हणजे गोर, पंडे क्षेत्रोपाध्ये लोक हे नेहमीं यात्रेकरू लोकांना लुबाडून पैसे उकळण्याकरितां ज्या ज्या नव्या युक्त्या शोधून काढितात त्या उपाध्याय लोकांना शिकविण्याकरितां एक सिनेमा फिल्म कंपनी हिंदुस्थानांत काढावी लागेल. इंग्लंडांत सिनेमा फिल्मच्या योगानेंच सोनेरी टोळींतील लोक नवीन युक्त्या शिकण्याच्या कामांत पटाईत होतात. कांहीं पंड्ये लोक सावंतवाडी सारख्या ठिकाणाहून बुंदीच्या लाडवासारखे लाकडाचे लाडू बनवून त्यांना जर्मनींतून आणिलेले पक्के रंग देऊन हुबेहूब कृत्रिम लाडू बनवून ठेवितात. आणि जेव्हां एखादा श्रीमंत यजमान तीर्थ विधीकरितां पुष्कळ रुपये खर्च करितो, तेव्हां त्याच्या समक्ष मोठा हारा भरून असे कृत्रिम लाडू ठेवितात आणि जे ब्राह्मण भोजनास बसतात त्यांना पंड्ये लोकांकडून कानगोष्टीच्या रूपानें अशी सूचना दिलेली असते कीं, भोजन आटोपल्यावर हे कृत्रिम लाडू पानांत तसेंच राहूं द्यावेत; म्हणजे श्रीमंत यजमानाला वाटेल कीं, आपल्या उपाध्यानें भोजन खर्चाकरितां मोठी रक्कम खर्च केली आहे. क्षेत्रांतील ब्राह्मण भोजनें पत्रावळीवर होत असतात. आणि हा लाकडाचा लाडू पत्रावळीवर टाकिला तरी मुळींच

आवाज होत नाहीं. यामुळें ही लबाडी यजमानाचें लक्षांत येण्यास मुळींच साधन नाहीं. लेखकाला असल्या शेंकडों लबाड्या सांगतां येतील.

मराठी साम्राज्याच्या इतिहासांत हा भाग लिहिण्याचें कारण असें आहे कीं, १७८२ सालानंतर सालबाईचा तह झाला तेव्हांपासून पेशव्यांच्या खजिन्याची स्थिति सुधारली. आणि जो रयतेचा पैसा पेशव्यांच्या खजिन्यांत आला त्याचा विनियोग रयतेच्या सुखाकडे किंवा राज्याच्या आणि सैन्याच्या सुधारणेकडे न होतां त्याचा उपयोग नित्य दानें, पुत्रकामेष्टि यज्ञ, नारायण नागबळी, शतचंडी, नवचंडी, गोप्रदानें, इच्छाभोजनें, सुवर्णतुला, महादानें वगैरे बाबतींत होऊं लागला. आणि त्यामुळें पेशवाईच्या नाशाची घटिका जवळ जवळ येऊं लागली. ह्या प्रकरणांत विद्वान लोकांची यादी दिली आहे त्यांनीं आज जरी मनांत आणिलें तरी, अनर्थ पुष्कळ टाळतां येईल. सुजाण लोकांनीं अजाण लोकांला फसवून आपण पोट भरावें ही कला हिंदुस्थानांत फार जोरांत आहे. यामुळें इंग्रज राज्यकर्त्याला हिंदुस्थानची स्थिति सुधारण्याकरितां कांहींही करितां येणार नाहीं, अशी स्थिति प्राप्त झाली आहे.

हिंदुस्थानांत थिऑसफीचा प्रचार ॲनबेझंट बाईनीं केल्यापासून पुष्कळ सुशिक्षित लोक बेझंटबाइचे अंध भक्त झाले आहेत. त्यांचें म्हणणें असें कीं पुराणांतील कितीही वेडगळ गोष्टी असल्या तरी तुम्ही त्यांना नांवें ठेवूं नका त्या खोट्या नाहींत. त्यांचें रहस्य समजण्याला अजून शेंकडों वर्षे गेलीं पाहिजेत. त्या अलंकारिक भाषेंत लिहिल्यामुळें तुम्हाला गचाळ वाटतात. त्यांच्यावर आस्तिक्य बुद्धि ठेवा म्हणजे केव्हांतरी त्यांचा उलगडा होईल.

सुशिक्षित लोकच जर अशा रीतीनें शिंगे मोडून घेऊन पुन्हा वासरात शिरण्यास त्यांना आनंद होत आहे, तर हिंदुस्थान देशाची स्थिति सुधारण्याची ज्या सुशिक्षित संस्थानिकाची पवित्र इच्छा आहे, त्या संस्थानिकांना देखील कांहीं करितां येणार नाहीं अशी शोचनीय स्थिति उत्पन्न झाली आहे. पुढील अभंग नमुनेदार म्हणोन दिला आहे. हल्लीं जे ब्राह्मणेतर लोक प्रतिपादन करीत असतात कीं छत्रपती शिवाजी महाराजांना रामदास स्वामीकडून मुळीच उपदेश केला गेला नव्हता. परंतु तुकाराम साधूंच्या उपदेशामुळें स्वराज्य स्थापण्याची स्फूर्ती झाली. हा युक्तिवाद सत्यशोधक समाजवाल्यांना ज्या आधारानें सुचलेला आहे, तो हा अभंग नाहीं. अभंग बनावट किंवा प्रक्षिप्त आहे. मूळच्या असल गाथेत हा अभंग नाहीं. तुकारामाची गाथा प्रथम छापण्यात आली त्यावेळींच ब्राह्मण कारकुनानीं हा अभंग बनावट रचिला. व हस्त लिखित प्रतीमध्यें घुसडला गेल्यामुळें त्याला खऱ्या अभंगाचें स्वरूप आलें आहे. तो अभंग येणेंप्रमाणें:—

॥ तुम्हापासी आम्हा येऊनियां काय । वृथा शीण आहे चालण्याचा ॥
॥ मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे भार चिंध्या बिंदी ॥
॥ निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी हें प्रावर्ण आकाशाचें ॥
॥ तेथें काय करणें कोणाची ही आस । वाया होय नाश आयुष्याचा ॥
॥ राजगृहा यावें मनाचियें आसें । तेथें काय वसे समाधान ॥
॥ राजाचीये घरीं भाग्यवंता मान । इतरां सन्मान नाहीं तेथें ॥
॥ देखोनीया वस्त्राभूषणांचे जन । तात्काळ मरण येते आम्हां ॥
॥ ऐकोनी मानाल उदासता जरी । तरी आम्हां हरी उपेक्षीना ॥
॥ आतां हेंची तुम्हां सांगणें कौतुक । भिक्षे ऐसे सुख नाहीं नाहीं ॥
॥ तप व्रत योगें महाभले जन ॥ आशाबद्ध लीन वर्तताती ॥
॥ तुका ह्मणे ऐसे श्रीमंत मानाचें । पूर्वील देहाचे हरिभक्त ॥
॥ आतां एक योग साधावा हा नीट । भल्याचा तो वीट मानूं नये ॥
॥ जेणें योगें तुम्हां लागू पाहे दोष । ऐसा हा सायास करूं नये ॥
॥ निंदक दुर्जन संग्रही असती । त्यांची युक्ति चित्तीं आणूं नयें ॥
॥ परीसावे कोण राज्याचे रक्षक । विवेका विवेक पाहूनिया ॥
॥ सांगणे नलगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथाच्या काजा साह्य व्हावें ॥
॥ हेंची ऐकूनियां पावे समाधान । आतां या दर्शना काज नाहीं ॥
॥ घेवोनीयां भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दिस गेले गेले ॥
॥ तुका म्हणे राया धन्य जन्म क्षिती । त्रैलोकी हे ख्याती कीर्ती तूझी ॥
॥ आतां हें विनंति प्रधान अष्टका । प्रभूसी विवेक ऐसा सांगा ॥
॥ प्रतिनिधि मानरक्षक चतुर । सात्विकाचें घर तुम्हां पासी ॥
॥ मुजुमीचे धनी लेखन कारक । पत्रींचा विवेक समजावया ॥
॥ पेशवे सुरनीस चिटणीस डबीर । राजाज्ञा सुमंत सेनापती ॥
॥ भूषण पंडीत राय विद्याधन । वैद्यराजा नमन माझें असो ॥
॥ पत्रींचा हा अर्थ अंतरीं जाणोनी । विवंचोनी श्रवणी घाला राया ॥
॥ सात्विक प्रेमळ दृष्टांतांच्या मतें । बोलिलों बहुत कळावया ॥
॥ यथास्थित निरोप सांगणें हा राया । अर्थ पहावया जाउं न द्या ॥
॥ भिडेसाठीं बोलाल गाळूनी अर्थातें । अनर्थकारी तुमचें होईं तेणें ॥
॥ तुका म्हणे तुम्हा नमन अधिकाऱ्यां । सांगणें हें राया पत्र माझें ॥

—०—

शाहु छत्रपतींची योग्यता

ज्या वेळीं छत्रपति संभाजीचा १६८९ सालीं वध झाला आणि येसुबाई व शाहू औरंगजेबाच्या कैदेंत गेले, त्यावेळीं शाहूचें वय फक्त सहा वर्षांचें होतें. शाहू फार तेजस्वी होता. तो औरंगजेबाबरोबर राजकीय बंदिवान म्हणून होता. औरंगजेबाच्या कुटुंबांतील सर्व माणसें त्याला प्रेमानें वागवीत असत. तो खरोखरीच औरंगजेबाच्या मुलांना मामा म्हणत असे. अठरा वर्षें त्यानें जरी औरंगजेबाच्या कैदेंत घालविलीं, तरी ह्या संधीचा शाहूनें चांगला फायदा घेतला. मोंगल साम्राज्याचा ढिलेपणा शाहूच्या चांगलाच नजरेस आला. ह्या १८ वर्षांच्या कैदेंत मुत्सद्देगिरीचे शिक्षणच मिळालें. शाहू कैदेंत गेल्यामुळें त्याचा चुलता राजाराम हा जरी मराठी राज्याचा मालक झाला, तरी राजाराम मुख्य सिंहासनावर कधींच बसला नाहीं. मुख्य सिंहासनाचा अधिकारी शाहू आहे ही जाणीव शेवटपर्यंत राजारामाच्या मनांत होती. सबब राजाराम मंचकारोहण करीत होता व राज्यकारभार पहात होता. औरंगजेबाच्या कैदेंतून शाहूला सोडविण्याइतकी मराठ्यांच्या सैन्याची स्थिति नव्हती, या कामीं राजारामाचा नाइलाज होता. इ. स. १७०० सालीं ज्या दिवशीं राजाराम सिंहगडावर मरण पावला त्या दिवशीं औरंगजेबाचा मुक्काम सातारा येथें होता, आणि त्यानें सातारा डोंगरी किल्ल्याला वेढा दिला होता. औरंगजेबाच्या छावणींत शाहू कैदी म्हणून साताऱ्यास हजर होता, आणि त्याचा मुक्काम साताऱ्या नजिक करंजे नांवाच्या खेड्यांत होता. शाहू हा आपल्या बापासारखा शूर होता. कैदेंतून सुटून तो दक्षिणेंत आल्यानंतर ताराबाईच्या बाजूचे मराठे सरदारांचा पराभव भीमानदीचे कांठीं त्यानें केला होता. त्यानतर साताऱ्याजवळील चंदनवंदन किल्ले त्यानें लढून घेतले, तेव्हांच सातारची गादी हस्तगत झाली. सातारची गादी मिळाल्यानंतर ताराबाईच्या पक्षाचा पराभव करून, तिनें कोल्हापूर येथें निराळे राज्य स्थापूं नये म्हणून शाहू स्वतः स्वारीवर जाऊन, त्यानें पन्हाळा किल्ला लढून घेतला होता. परंतु रामचंद्रपंत अमात्य ह्यांच्या जबरदस्त कारस्थानामुळें कोल्हापूरच्या राज्याची स्थापना झाली. शाहू हा फक्त चैनी आणि विलासी आहे, त्याला काम करण्याचा कंटाळा आहे अशा प्रकारचे जें त्यासंबंधी वर्णन प्रथम प्रथम वाचण्यांत आलें तें चुकीचें होतें असे आतां सिद्ध झालें आहे. त्याचे मृत्यूपर्यंत पेशवे, दाभाडे, गायकवाड, रघुजी भोसले आणि बाबूजी नाईक बारामतीकर यांनीं ज्या स्वाऱ्या केल्या त्यांच्या इत्थंभूत हकीकती, मध्यवर्ति कचेरी जी सातारा येथें होती तेथें जाहीर कराव्या लागत. खंडणीचे हिशेब शाहूच्या मुख्य कचेरींत पाठवावे लागत. तहनाम्यासंबंधीं सर्व व्यवस्था सातारा दरबारांत जाहीर करण्यांत येई. पेशव्यानें कर्नाटकावर स्वारी करून चंदासाहेब यास कैद करून आणिला, त्याला साताऱ्याच्या किल्ल्यावरच कैदेंत ठेविला

होता. फ्रेंच लोकांनीं खंडणी भरून त्याला साताऱ्याहूनच सोडवून नेला होता. शाहूच्या कचेरींतून दररोज शेंकडो प्रकरणाचा निकाल होऊन त्यांचीं उत्तरें सांडणीस्वाराबरोबर साताऱ्याहून रवाना होत असत. शाहूनें काठेवाडांतून आणि अरबस्थानांतून उत्तम घोडे आणवून महाराष्ट्राकरितां उत्तम अवलाद उत्पन्न करण्याची तजवीज केली होती. ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर ह्यांच्या तपःसंपन्नतेची खात्री झाल्यामुळें शाहू त्या स्वामींना देवाप्रमाणें मान देत असे. डभोईच्या लढाईंत त्याच्या हाताखालच्या दोन सरदारांत लढाई होऊन बाजीराव पेशव्यानें त्रिंबकराव दाभाडे यास ठार मारिलें. ह्या प्रकरणाच्या मुळाशीं जें कारस्थान होतें तें आतां उजेडांत आलें आहे. त्यामुळें नवीन प्रकाश पडला आहे, व त्यांत शाहूची कर्तबगारी चांगलीच दिसून आली आहे. ज्यांना शाहू आणि बाजीराव पेशवा ह्या दोघांचाही उत्कर्ष सहन होत नव्हता, असें जें पंचायतन होतें त्याची नांवें पुढीलप्रमाणें आहेत. (१) निजाम उल्मुल्क, (२) कोल्हापूरचे छत्रपति संभाजी, (३) चंद्रसेन जाधव, (४) त्रिंबकराव दाभाडे आणि (५) दाभाडे यांचे आप्त व धार संस्थानचे मालक मळोजी पवार, ह्या पांच इसमापैकीं पहिल्या तिघांनीं आपण स्वतः रणांगणावर न येतां दाभाडे यास तोंडघशी पाडिलें. त्या लढाईंत त्रिंबकराव दाभाड्याबरोबर मळोजी पवार, आणि पिलाजीराव गायकवाड ह्यांचा मुलगा सयाजी, हे रणांगणावर पडले. हें भांडण इतकें विकोपाला जाईल अशी शाहूलाही कल्पना नव्हती, सबब शाहू स्वतः तळेगांव दाभाडे येथें जाऊन उमाबाई इच्याबरोबर मोठ्या चातुर्यानें समेट करून दिला. योग्य जागीं योग्य इसम नेमण्याचें चातुर्य शाहूमध्यें अप्रतिम होतें. राजवाडे इतिहासकार लिहितात; मराठे वीर पुरुषांची वर्गवारी केली तर, सर्व लोकांवर आपली जरब ठेवण्यांत जसा सदाशिवराव भाऊ पेशवा होता त्याच्याहीपेक्षां बाळाजी बाजीराव पेशवा अधिक हुशार होता. आणि त्या पेशव्यापेक्षांही शाहू अतिशय हुशार होता. शाहूचें ब्रीद असें होतें कीं, "जुनें मोडूं नये नवे करूं नये" याचा अर्थ असा कीं, आपलें मातुल घराणें जे दिल्लीचा बादशहा, त्यांचें वैभव कायम राखून दक्षिणेंत आपलें वर्चस्व वाढवावें. इ. स. १७०९ साली दिल्लीहून शाहू दक्षिणेंत आला. त्यानंतर ३० वर्षांनीं नादिरशहाची स्वारी दिल्लीवर झाली व मोठा प्रळय झाला. ही प्रळयाची बातमी शाहूला दोन महिन्यांनीं उशिरा पोंचली. तरीपण शाहुनें ताबडतोब पेशवे आणि शिंदे होळकर यांना असे निरोप पाठविलें कीं, पोर्तुगीज लोकापासून वसई जिंकून घेण्याचें जें काम चालू आहे ते काम अर्धवट सोडून दिलें तरी चालेल. परंतु मराठी सैन्यें दिल्लीच्या बादशहाच्या बचावाकरितां उत्तरेकडे ताबडतोब रवाना करा. परंतु ह्या हुकुमाचा कांहीं उपयोग होण्यासारखा नव्हता. कारण ३० वर्षांत मामाच्या घराचा किती बखेडा झाला आहे ह्याची कल्पना १२०० मैल दूर राहणाऱ्या ह्या भाच्याला मुळींच नव्हती. एकंदरींत राजा ह्या नात्यानें शाहूच्या अंगीं उत्तम

कर्तव्यनिष्ठा होती. त्याला औरस पुत्र नव्हता ह्यामुळें त्याच्या ४० वर्षांच्या कारकीर्दीपैकीं शेवटची तीन वर्षें मात्र उदासीनतेंत गेलीं; यामध्यें आणखी एक उदासीनतेंत भर पडण्याला कारण त्याची आवडती राणी सगुणाबाई ही मरण पावली हें होय. आपल्या पश्चात् पेशव्यानीं सर्वाधिकार आपणाकडे घेऊन मराठी साम्राज्याची सर्व जबाबदारी पत्करण्यास जो मनुष्य सर्वस्वी लायक म्हणून, शाहूनें निवडला, तो बाळाजी बाजीराव पेशवा हा खरोखरी महाराष्ट्रांत लायक इसम होता. तो कसा बिघडला आणि त्याच्या हातून मराठी साम्राज्याचें कसें नुकसान झालें याचा विचार निराळ्या प्रकरणांत होईल. शाहूनें केलेली निवड मात्र अगदीं बरोबर होती.

ब्रम्हेंद्रस्वामींची योग्यता.

ज्या काळीं ब्रह्मेंद्रस्वामी गुरुपदेश करून राजगुरु म्हणून प्रसिद्ध झालें त्यावेळीं महाराष्ट्रांतील सर्व वीर पुरुषांची अशी मनःस्थिति होती कीं, कोणत्या तरी तपःसंपन्न पुरुषाला आपण गुरु करावें, म्हणजे त्याच्या आशिर्वादानें आपणास रणांगणावर यश मिळेल. अशा पुष्कळ वीर पुरुषांची उदाहरणें मी ह्या प्रकरणांत शेवटी सांगणार आहे. बाजीराव बल्लाळ पेशवे याला युद्धशास्त्र शिकविण्याची कला ब्रह्मेंद्रस्वामींमध्ये होती असें बिलकूल नव्हते. कालिदासानें वर्णन केल्याप्रमाणें " वेदाभ्यास जडः " हें वर्णन ब्रह्मेंद्रस्वामीस लागू पडतें. रामदासस्वामी संबंधानें सुद्धां हेंच वर्णन तंतोतंत लागू पडतें. छत्रपती शिवाजीला युद्धशास्त्र शिकविण्याची योग्यता रामदासस्वामींमध्यें बिलकुल नव्हती. १६७२ सालापूर्वीं शिवाजी आणि रामदास यांची कधींही भेट देखील झाली नव्हती. त्यावेळीं मोठमोठ्या सावकाराकडून कर्ज काढल्याशिवाय कोणतेही पान हालत नसे. शेतकऱ्यानें कर्ज काढून मक्त्याच्या मामलती घेणाऱ्यांना जमीन महसुलाचा हप्ता भरावा लागे. कोणाच्याही घरीं लग्न निघालें किंवा घर बांधावयाचें असलें, किंवा शेतांत विहीर खणावयाची झाली तरी सावकार पहावा लागे. एक संस्थानिक मेला तर त्याच्या मुलानें मध्यवर्ति सत्तेला जो नजराणा भरावयाचा तो देखील सावकाराकडून कर्ज काढून भरावा लागे. वीर पुरुष कोणत्याही मोहिमेवर निघाले म्हणजे दारूगोळा खरेदी करण्यास आणि शिलेदारांचे पगार देण्यास आणि नालबंदीची रकम देण्यास सुद्धां कर्ज काढावें लागे. ब्रह्मेंद्रस्वामींची वर्तणूक निष्पाप होती. ते तपःसंपन्न होते ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. हल्लींच्या काळांतील बुवाबाजी प्रमाणें नांवें ठेवण्याजोगा कोणताही दोष ब्रह्मेंद्रस्वामींमध्यें नव्हता. सरदार लोकांच्या स्वाऱ्या शिकाऱ्याकरितां जो खर्च येत असे ती त्यांची सर्व कामें आंतबट्ट्याची होती. अशा स्थितीत व्याजाच्या हप्त्याची रक्कम सावकारांना वेळेवर कधींही पोंचत नसे.

बाजीराव बल्लाळ पेशवे आपल्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत पैशाच्या इतक्या पेचांत आला होता कीं, त्याला आत्महत्या करावीशी वाटूं लागलें. माधवराव बल्लाळ पेशवे मृत्यु पावले आणि त्यांची स्त्री रमाबाई हिनें सती जाण्याची तयारी केली. त्यावेळीं देखील सावकार लोकांनीं कर्ज फेडीकरितां पेशव्यांच्या दारांत धरणें धरलें होतें. व आमच्या कर्जाच्या फेडीबद्दल कोणी जामीनकी घेण्यास तयार झाल्याशिवाय माधवरावाचें प्रेत उचलूं देणार नाहीं असें त्यांनीं धरणें धरलें होतें. त्यावेळीं नाना फडणविसांनीं कर्जाबद्दल जामीनकी पत्करल्यामुळें पुढील विधी यथासांग पार पडले. १७९२ सालीं जून महिन्यांत महादजी शिंदा पुणें येथें आला, तेव्हां त्याच्या सरंजामाचे हिशेब पेशव्याकडे गुदरण्याबद्दल नाना फडण-विसांनीं तगादा केला. तेव्हां महादजी शिंद्यांच्या तोंडचे शब्द असें आहेत कीं, " शिंद्याच्या दौलतीला आज मित्तीस सात कोट रुपये कर्ज आहे. " सर्व सर-दारांची अशाच प्रकारें हलाखीची स्थिति होती. अशाच स्थितींत ब्रह्मेंद्रस्वामींनीं भिक्षा म्हणून एक प्रकारचा कर सर्व सरदारांवर बसविला होता. व व्याजाची रक्कम मोठी येत असे, तिनें दामदुप्पट करून जो द्रव्य संचय होईल त्या द्रव्यानें तलाव बांधणें, घाट बांधणें, मंदिरें, विहिरी बांधणें, आणि मंदिरांचे जीर्णोद्धार करणें व पांथस्थांना गोड फळें खावयास मिळावीं म्हणून सार्वजनिक पाणंद असेल तिच्या दोन्ही बाजूला आंब्यांचीं झाडें लावून त्यांना स्वत: खांद्यावरून पाणी नेऊन घालणें, हीं होत. त्यावेळीं व्याजाचे दर जास्त होते, यामुळें हें कर्ज फेडणें सरदारांस जड जाई व कर्जाचे हप्त्यांचे सरदार लोकांकडून वायदे केले जात, आणि हे वायदे चुकविण्याकरितां थापेबाजी करीत असत. अशा प्रकारें वचनभंगाची संवय सर्व मराठे सरदारांना असल्यामुळें, जो तेजस्वी पुरुष आहे त्याला अमर्याद संताप येत असे, आणि यामुळें अशा सरदारांना ब्रह्मद्रस्वामीकडून शिव्याशापाचीं पत्रें जात असत हें योग्यच होते. मल्हारराव होळकर वारल्यानंतर अहिल्याबाई होळकरीण हिच्या हातांत मल्हाररावाचा सोळा कोट रुपयाचा खजिना आला होता, अहिल्याबाईनें ह्या पैशानें मंदिरें बांधणें वगैरे हजारों धर्मकृत्यें केलीं, तीं सर्व मोठ्या प्रमाणावर होत असत. आणि तीं करण्याला अहिल्याबाईजवळ मुबलक पैसा होता, जीं कामें अहिल्याबाईनें मोठ्या प्रमाणावर केली, तींच कामें ब्रह्मेंद्रस्वामींनीं १७४५ सालापूर्वीं लहान प्रमाणावर केलीं. कारण ब्रह्मेंद्रस्वामी जवळ अहल्याबाईप्रमाणें मुबलक पैसा नव्हता. आणि सरदार लोकां-कडुन कर्जाची फेड वेळेवर होत नव्हती. सर्व मराठे सरदारांची पैशाची स्थिति अत्यंत टंचाईची होती. अशा स्थितींत ह्या दिवाळखोरी सरंजामदारांना कांहींएक तारण न घेतां मुबलक कर्ज कोणताही सावकार देण्यास तयार झाला नसता. तें काम ब्रह्मेंद्रस्वामीनीं उदारपणानें केलें, सबब ब्रह्मेंद्रस्वामींची थोरवी मोठीच समजली पाहिजे. ब्रह्मेंद्रस्वामींच्या तपःसंपन्नतेला लोक इतके पूज्य मानीत कीं,

त्यांचे जे भक्त गोमांतकांत होते त्यांनीं उत्तम आंब्यांच्या फळांची निवड करून पाड लागल्याबरोबर दोरीच्या जाळ्यांचें शीर ओझें करून वीस दिवसांच्या वाट चालीच्या मुक्कामावर धावडशी मुक्कामीं मजूराकडून शीर ओझ्यानें पोंचवीत असत. प्रवासांत कितीही दिवस लागले तरी तीं फळें बिघडत नसत. अशा उत्तम बीजाची लागवड ब्रह्मेंद्रस्वामीनीं धावडशी प्रांतांत करून ठेविली होती. एका मजुराच्या मजुरीचा हिशेब केला, आणि त्यावेळीं स्वस्ताईची फळांची किंमत लक्षांत घेतली असतां, आतबट्टा सोसून हीं फळें इतक्या लांब पाठवीत, असें दिसून येईल. परंतु भक्तानें गुरु माऊलीला आवडणारा पदार्थ कितीही जास्त खर्च झाला तरी तो गुरुच्या मुखांत पडावा, म्हणजे त्याचें सार्थक झालें इतकी भक्ति ब्रम्हेंद्रस्वामींच्या भक्तांच्या ठिकाणीं अलोट होती. हल्ली हापूस पायरींच्या फळांना जितकी किंमत पडते त्याच्या अष्टमांश देखील किंमत त्यावेळीं गोमंतकांतील आंब्यांना येत नव्हती. राजवाडे यांनीं ब्रह्मेंद्रस्वामींना असा ठपका दिला आहे कीं, "१७२८ सालापासून ब्रम्हेंद्रस्वामींनीं लावालावी करुन व चुगल्या सांगून शाहू छत्रपतीवर आपलें जें वजन होतें त्या वजनाचा दुरुपयोग करून मराठेशाहीचा अंत होण्याची जी कारवाई सुरूं केली, ती वाढत वाढत शेवटीं १८१८ सालीं सर्व साम्राज्याचा नाश करण्यास कारण झाली." हे राजवाडे यांचे विधान सर्वस्वी चुकीचे आहे. राजवाडे यांनीं आपल्या लेखसंग्रहांत कर्त्या पुरुषांच्या अक्षम्य चुका एके ठिकाणीं छापून नंतर जर ब्रह्मेंद्रस्वामीवर दोषारोप केला असतां, तर ते शोभले असते. बाजीराव बल्लाळ पेशवा आणि बाळाजी बाजीराव पेशवा या दोघांना पेशवे पदावर कायम करण्याकरितां ब्रह्मेंद्रस्वामींनीं आपला वशिला खर्च करून शाहू छत्रपतीकडून या दोन पेशव्यांच्या चुका माफ करविल्या. हाच राजवाड्यांचा ब्रह्मेंद्रस्वामीवर मोठा ठपका. परंतु आतां जो पुरावा उजेडांत आला आहे त्याचा विचार करितां बाजीराव बल्लाळ पेशवा आणि त्याचा ज्येष्ठ पुत्र यांनींच आपली करामत लढवून छत्रपती शाहुचें ऐश्वर्य वाढविलें हें सिद्ध झालें आहे.

ब्रह्मेंद्रस्वामीवर दुसरा ठपका राजवाडे यांचा असा आहे कीं, "हा ब्रह्मेंद्र लग्न मुंजी जमवितो आणि त्यापसून आपण स्वतः कमिशन किंवा दलाली मिळवितो." हा ठपका देखील गैरवाजवी आहे. कारण एखाद्या विद्यार्थ्याची मुंज जमविणें या कामांत भद्रेश्वर दीक्षिताला कोणीही कमिशन देणार नाहीं. त्या विद्यार्थ्याला या वर्षीं मुंज लाभत आहे किंवा नाहीं याबद्दल उपाध्यायाला विचारून मुंजीचा बेत नक्की करील. मराठे सरदारांतील लग्नें जुळविण्यासंबंधानें ब्रह्मेंद्रस्वामींनीं कमिशन मिळविलें, अशाबद्दल एकंदर पत्रव्यवहारांत एकच पत्र आहे. मराठ्यामध्यें ज्याची जातकुळी हलकी तो जरी सरंजामानें मोठा असला, तरी त्याच्याशीं शरीरसंबंध करूं नये असा मोठा कटाक्ष होता. खंडेराव दाभाडे

सेनापती आणि मळोजी पवार धार संस्थानचा मालक, हे दोघे सोयरे धायरे होते. हे आपली जातकुळी फार श्रेष्ठ समजत असत. खंडेराव दाभाडे यानें मळोजी पवारास पत्र लिहिलें कीं, " तुम्ही आपली मुलगी पिलाजीराव गायकवाड याचे मुलास देण्याचें ठरविलें आहे ते बरोबर नाहीं. आपली जातकुळी जशी श्रेष्ठ आहे तशी पिलाजीराव गायकवाडाची नाहीं. " त्यावर मळोजी पवारानें जबाव पाठविला कीं, " माझी पुष्कळ मुलें लहानपणींच वारली. माझ्या कुटुंबानें ब्रह्मेंद्रस्वामींना देवऋषि केलें आहे. म्हणजे ब्रह्मेंद्रस्वामीवर गुरूप्रमाणें भक्ति आहे. ब्रह्मेंद्रस्वामीच्या आशीर्वादानें एक मुलगा आणि एक मुलगी जगली आहेत. ब्रह्मेंद्रस्वामी सांगतील तरच मी आपली मुलगी पिलाजीराव गायकवाडाच्या मुलाला देईन. अशी माझ्या कुटुंबाची इच्छा आहे. " पुढें ह्या पत्रव्यवहाराची बातमी पिलाजीराव गायकवाडाला समजल्यावर त्यानें परभारें ब्रह्मेंद्रस्वामीस असें पत्र लिहीलें कीं, " जर तुम्ही ही सोयरीक जमवून द्याल तर एका हत्तीला जितके ओझें झेपेल तितके रुपये मी तुम्हास बक्षीस देईन. तूर्त दोन हजार रुपये पाठविले आहेत. " राजवाडे यांनीं सर्व जन्म जरी इतिहास संशोधनांत घालविला तरी त्यांना हें समजलें नव्हते कीं पुरंदर तालुक्यांत भुलेश्वरचें माळशिरस म्हणून गांव आहे तो गांव शाहू छत्रपतींनीं ब्रह्मेंद्रस्वामींना इनाम करून दिला होता. त्या माळशिरस गांवाचे जे वतनदार पाटील, त्यांची मुलगी ती मळोजी पवाराची बायको होती. तिनें मुलें जगत नाहींत म्हणून ब्रह्मेंद्रस्वामीस नवस केला होता, हें साहजीकच झालें. ही गोष्ट विचारांत न घेतां, राजवाडे यांनीं ब्रह्मेंद्रस्वामीवर हा आरोप केला आहे. पुढें त्या मुलीचें लग्न पिलाजीराव गायकवाडाच्या मुलाशींच झालें. पूर्वींच्या भाविक लोकांच्या धर्मभोळेपणाची पद्धत अशी होती कीं एखाद्या तपःसंपन्न गृहस्थानें लग्न जुळविण्याला संमती दिली म्हणजे त्या वधूवरांचा संसार सुखाचा होतो. मराठ्यांच्या इतिहासांत अशी उदाहरणें पुष्कळ आहेत. ब्रह्मेंद्रस्वामींनीं लग्नें जुळवून कमिशन मिळविले असे दुसरें उदाहरण मुळींच सांपडणार नाहीं.

एखाद्या तपःसंपन्न पुरुषानें आपल्याला आशिर्वाद दिला तर वीर पुरुषांना रणांगणावर खात्रीनें यश येईल अशी पूर्वींच्या लोकांची भक्ति होती. अशी उदाहरणें पुष्कळ देतां येतील. शाहू छत्रपती, बाजीराव बल्लाळ पेशवा व चिमणाजी अप्पा हे तर ब्रह्मेंद्रस्वामींच्या पायावर लोटांगणें घालीत होते, वसईच्या मोहिमेंत चिमणाजी अप्पा ब्रह्मेंद्रस्वामीस पत्रांत लिहितो " फिरंगी म्हणजे प्रत्यक्ष अग्नीचा पुतळा. स्वामींची कृपा रूपी सुदर्शन चक्र माझ्या संरक्षणाकरितां सिद्ध आहे, म्हणूनच मला या बिकट कार्यांत यश मिळालें. " स्वामींच्या पत्रांतून देखील चिमणाजी अप्पाला असें आश्वासन दिले आहे कीं " तुला वसई दिली, दिली, दिली. जर चिमाजी अप्पाची फत्ते झाली नाहीं तर ब्रह्मेंद्राचें संन्यासपण लटकें. "

१७६२।६३ सालीं जेव्हां राघोबादादा पेशव्यानें मिरजेला वेढा घातला, आणि किल्ल्याचें रक्षण गोविंद हरी पटवर्धन करीत होता, तेव्हां गोविंद हरीच्या छावणींत एक महंत बावा होता. त्या वेढ्याचे काम पांच आठवडे चाललें होतें. दररोज गोविंद हरी पटवर्धन, महंत बावाला शकून विचारीत असे. आणि महंत बावा सांगत असत कीं, तुम्ही भिऊं नका, तुमची फत्ते होईल. दमाजीराव गायकवाड यांचा तंटा पवार संस्थानिकाशी सुरू होता त्यांत दमाजीरावाची फत्ते होईल असें भविष्य ब्रह्मेंद्रस्वामींनीं सांगितलें होतें, त्याबद्दल दमाजीराव गायकवाडांनीं विजय मिळाल्यानंतर भुलेश्वर मंदिराचे जीर्णोद्धाराकरितां पंचवीस हजार रुपये दिल्याबद्दलचें पत्र उपलब्ध झालें आहे. महादजी शिंदे यांचा गुरु एक मुसलमान अवलिया होता. त्या अवलियाचा शिष्य नेहमीं महादजी शिंदे याच्या छावणीबरोबर असे. आणि त्या शिष्याला त्याच्या गुरुप्रमाणे महादजी मान देत असे. इ. स. १८०० सालीं रामचंद्र परशराम पटवर्धन यांनीं चार महिनेपर्यंत कोल्हापूर राजधानीला वेढा दिला होता. आणि तेथील छत्रपतीना जिंकण्याचा प्रयत्न चालविला होता. कोल्हापूरकर छत्रपतींच्या बाजूचा ब्राह्मण सेनापती रत्नाकरपंत राजाज्ञा हा पटवर्धनाशीं फार शौर्यानें लढत होता. रत्नाकरपंताचा एक महंत गुरु कोल्हापूर शहरांत होता. त्याला रत्नाकरपंत दररोज संध्याकाळीं लढाईच्या परिणामाबद्दल शकून विचारीत असे. आणि रत्नाकरपंताची फत्ते होईल असे तो महंत दररोज सांगत असे. शेवटी पटवर्धनांना कोल्हापूर जिंकतां आलें नाहीं. व त्यांनीं वेढा उठवून त्या ठिकाणाहून पळ काढिला.

अशा स्थितींत जेव्हां महाराष्ट्रांत हल्लींच्यासारखे सुशिक्षित सुधारक कोणीही नव्हते, त्यावेळीं भाविक शूर पुरुष ब्रम्हेंद्रस्वामीसारख्या तपःसंपन्न महंताच्या पायावर लोटांगणें घालीत राहिले यांत कांहींच आश्चर्य नाहीं. ब्रम्हेंद्रस्वामींनीं चुगल्या करून मराठी साम्राज्याचें कोणतेही नुकसान केलें नाहीं. आज ब्रम्हेंद्रस्वामींच्या देवस्थान संस्थेपैकीं १२ गांव इनाम म्हणून अद्यापि निरंतर चालू आहेत. या गांवांची देणगी कोणी दिली याबद्दलच्या सनदा आज देखील उपलब्ध आहेत. हीं गांवें निरंतर चालविण्याबद्दल इंग्रज सरकारानींही खात्री दिली आहे. देणगी देणाऱ्या सरदारांची यादी पुढें दिल्याप्रमाणें आहे. शाहू छत्रपती, बाजीराव बल्लाळ पेशवे, पंत सचीव, पंत प्रतिनिधि, आंग्रे सरदार, निंबाळकर, बडोद्याचे गायकवाड, आणि जंजिऱ्याचे शिद्दी हे होत.

स्वतः ढाल, तलवार घेऊन लढाईवर जाणारे ब्रम्हेंद्रस्वामी नव्हते, तरी देखील दुसऱ्याचे शौर्याची किंमत ओळखणारे होते याचें उदाहरण पुढें दिलेलें आहे. मानाजी आंग्रे आणि संभाजी आंग्रे या दोघां सापत्न भावांचा तंटा तोडीत असतांना स्वामी पत्रांत लिहितात. "तुम्ही दोघे आंग्रे बंधू इतके शूर आहांत, कीं जर तुमच्यामध्यें एकमेकांशीं सहकार्य कराल तर आभाळाला हात

लावाल." यावरून लायक माणसांची निवड करण्यांत त्या काळांत कर्ते पुरुष किती हुषार असत हें दिसोन येतें.

स्वतः ब्रह्मेंद्रस्वामी किंवा रामदासस्वामी हे तर शूर नव्हतेच. परंतु एकंदर ब्राह्मण किंवा प्रभु गृहस्थापैकीं शौर्याविषयीं जे प्रसिद्धीस आलेले होते, त्यांचें शौर्य देखील कृत्रिम शौर्य असेंच म्हणतां येईल. त्यांत शूरांचें प्रमाण अतिशय अल्प होतें. म्हणजे २१ वर्षांवरील पाच हजार ब्राह्मणांमध्यें एक लढवय्या इतकें अल्प प्रमाण होतें.

इंग्रजांनीं हिंदुस्थानांत राज्यविस्तार अन्यायांनी केला नाहीं.

विजयानगरच्या राज्याचा कांहीं भाग शिल्लक होता, त्यांच्या मालकी हक्कांत जो प्रदेश होता, त्यांपैकीं ईस्ट इंडिया कंपनीला मद्रास येथें भुईकोट किल्ला बांधण्याकरितां त्या संस्थानिकानें परवानगी दिली. व तेथें इंग्रज व्यापाऱ्यांची वखार सुरू झाली तोच हल्लींचा पोर्टसेंट जॉर्ज किल्ला शिल्लक आहे. येथून राज्यविस्तारास सुरुवात झाली. पुढें १६६३ साली पोर्तुगाल देशच्या राजानें मुंबई बेट इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस् यास आंदण दिलें. पुढें ५।६ वर्षांनीं त्या राजानें ईस्ट इंडिया कंपनीला तें मुंबई बेट दहा हजार पौंडास विकलें. इ. स. १६१२ साली सुरत येथें इंग्रजांनीं वखार बांधिली ती एका लहानशा भुईकोट किल्ल्यासारखी आहे. औरंगजेब बादशहाच्या मृत्युनंतर सुरत येथें मोंगलांचा सुभेदार जो मुसलमान नबाब होता त्याच्याशीं दोस्ती राखून इंग्रजांनीं आपलें व्यापारी ठाणें सुरतेस कायमचें बसविलें. मराठयांच्या लुटीपासून आपल्या मालाचें संरक्षण करण्यासाठीं १७६१ सालीं इंग्रजांनीं आपल्या वखारीभोंवती दुहेरी कोट बांधला. कलकत्ता येथील वखारींतील मालाच्या संरक्षणाकरितां, भोसल्यांच्या स्वारीपासून बचाव करण्याकरितां त्या वखारीभोंवती जो खंदक खणला त्यास मराठा खंदक हें नांव अद्यापि चालू आहे. तुळाजी आंग्रे हा शिरजोर झाल्यामुळें बाळाजी बाजीराव पेशव्यानें इंग्रजांच्या मदतीनें तुळाजीचा पराभव केला आणि त्याला कैदेंत टाकले. ह्या मदतीबद्दल पेशव्यानें बाणकोट किल्ला आणि त्याचें भोंवतालचे नऊ गांव इंग्रजांस दिले. बक्सार येथील लढाईंत शहाअलम बादशहा, मीरकासीम आणि अयोध्येचा नबाब सुजाउदौला या तिघांचा पराभव झाला. तेव्हांपासून बंगाल प्रांतावर मराठयांच्या स्वारीची भीति नाहींशी झाली. त्यानंतर एकदां मीरकासीम यानें मल्हारराव होळकरांची मदत घेऊन इंग्रजांचा पराभव केला होता, परंतु पुढें इंग्रजांनीं देखील मल्हारराव होळकरांचा पराभव केला. पुढें लवकरच

मल्हारराव होळकर वारला. आणि जानोजी भोसला नागपूरकर याचें माधवराव पेशव्याबरोबर युद्ध सुरू होते. पुढें जानोजीच्या मृत्यूनंतर त्याचे सावत्र भाऊ मुधोजी आणि साबाजी ह्यांच्यामध्यें युद्धें सुरू होती, व मुधोजीनें गोळी घालून साबाजीस ठार मारिलें. (१७७६) या भोसले घराण्यांतील यादवीमुळें बंगाल प्रांतावर कोणाही शत्रूनें स्वारी केली नाहीं. १७७९ साली वारन् हेस्टिंग्ज यानें १६ लाख रुपये मुधोजी भोसले यास देऊन बंगाल प्रांताचा कायमचा बंदोबस्त केला. कटक प्रांत खेरीज करून मराठ्यांचे बंगाल्यांत कांहींही राहिलें नाहीं. तो कटक प्रांत देखील १८०४ सालीं देवगांव येथील तहामुळें भोसल्या-कडून इंग्रजाकडे कायमचा आला. दिल्लीचे बादशहा दुर्बल झाले व बंगालचे नबाब देखील दुर्बल, यामुळें इंग्रजांचा व्यापार आणि राज्यस्थापना हीं बंगाल प्रांतांत चिरंतन राहिलीं. उत्तर सरकार प्रांत निजामअल्लीनें फ्रेंचाकडे वहिवाटीस दिला होता. तो प्रांत कायमचा बळकावावा अशी फ्रेंचांची इच्छा होती. सबब १७६६ साली इंग्रजांनीं फ्रेंचांचा पराभव करून उत्तर सरकार प्रांत जिंकला. व्यापाराचे सोयीकरितां इंग्रजांना समुद्र कांठचा प्रदेश फार सोयीचा होता, व कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडून ईस्ट इंडिया कंपनीला सक्त ताकीद होती कीं, हिंदुस्थानांत राज्यस्थापना करावयाची नाहीं, फक्त व्यापारांत चांगला फायदा मिळवावयाचा. हा उत्तर सरकार प्रांत कायमचा आपल्या राज्यास जोडला अशी जेव्हां निजामअल्लीनें तक्रार केली, तेव्हां निजामअल्लीला दरसाल २५ लाख रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. परंतु १८०३ सालानंतर जेव्हां ईस्ट इंडिया कंपनीच्या खजिन्याचें दिवाळें वाजलें आणि ही रकम देतां येईना, तेव्हां १८०५ साली नागपूरचे भोसल्याकडून इंग्रजांनीं वऱ्हाड प्रांत जिंकिला होता तो वऱ्हाड प्रांत निजाम-अल्लीला उत्तर सरकार प्रांताचे मोबदला कायमचा दिला. १८०३-४ सालीं निजामअल्ली वारल्यानंतर त्याचा वडील मुलगा पोलादजंग ह्याला गादी मिळू नये म्हणून बक्षीबेगम नांवाच्या राणीनें जबरदस्त कारस्थान सुरू केलें. परंतु त्या वेळेस इंग्रजांचें सैन्य जबरदस्त होते. यामुळें वडील मुलालाच गादी मिळाली. व निजामानें इंग्रजांशीं तैनाती फौजेचा तह केला होता. त्या तहाप्रमाणें निजामाच्या रक्षणाकरतां १५ हजार कंटिंजंट फौजेचा खर्च भागवतां येईल असा मुलूख निजामानें १८०३ सालापूर्वींच इंग्रजांना तोडून दिला होता. त्या वेळेच्या सुमा-रास होता होईल तो समुद्र किनाऱ्यालगतचा प्रदेश ईस्ट इंडिया कंपनीच्या मालकीचा असावा म्हणजे त्यांचा व्यापार व वखारी सुरक्षित राहतील असा मुत्सद्दीपणा इंग्रजी अम्मलदारांनीं लढविला व यशस्वी केला, हें पुढील तीन उदाहरणावरून दिसून येईल. टिपू सुलतानाला धुळीला मिळविल्यानंतर म्हैसूरच्या राज्यापैकीं जो मुलूख इंग्रजांनीं आपल्याकडे ठेविला त्यांत उत्तर कानडा व दक्षिण कानडा म्हणजे कारवार व मंगळूर हे दोन जिल्हे इंग्रजांनीं समुद्रकांठचे आपणाकडे

ठेविले. त्याचे पूर्वीच १७९२ सालीं टिपूशीं तह झाला त्यावेळीं तिनिवेल्ली आणि नेलोर हे जिल्हे इंग्रजांनीं आपणाकडे ठेविले. १८०२ साली जून महिन्यांत गायकवाडाशीं जो तैनाती फौजेचा तह झाला त्याप्रमाणें सुरत जिल्ह्यांतील चिखली तालुका इंग्रजांना कायमचा मिळाला. हा चिखली तालुका बलसाड बिलिमोरा या बंदरापासून फार जवळ आहे सबब तो तालुका समुद्रकांठचा प्रदेश असें म्हणण्यास हरकत नाहीं. शेवटच्या बाजीराव पेशव्याशीं वसईचा तह झाल्यानंतर जो २६ लक्ष वसुलाचा मुलूख इंग्रजांचे ताब्यांत तैनाती फौजेच्या खर्चाकरितां कायमचा आला, तो प्रदेश म्हणजे सुरत जिल्ह्यांतील ओलपाड तालुका, व कारवार जिल्ह्याला लगत सावनूर बंकापूर हे परगणे इंग्रजांच्या ताब्यांत कायमचे आले. सावंतवाडी संस्थानांत शांतता राखण्याकरितां, तैनाती फौजेच्या खर्चाकरितां जो मुलूख इंग्रजांना कायमचा तोडून दिला तो हल्लींचा वेंगुर्ले महाल होय. आसईच्या लढाईत दौलतराव शिंदे यांचा पराभव झाल्यानंतर तहाचे अन्वये जो प्रदेश इंग्रजांचे ताब्यांत आला त्यांपैकीं भडोच बंदर हा समुद्रकांठचा प्रदेश होय. आणि चंबळानदी आणि सतलज नदी ह्या नद्यांच्या मधला प्रदेश १८०४ सालीं इंग्रजांना कायमचा मिळाला, त्याचें कारण लासवारी येथील लढाईत शिंद्यांचा पराभव झाला, आणि नंतर तह झाला त्या तहाअन्वयें त्या प्रदेशाखेरीज आग्रा, अलिगड, दिल्ली हीं ठाणीं देखील इंग्रजांचे ताब्यांत आलीं. बांदा संस्थानचा मालक अलीबहादर हा फार शूर होता. आणि पेशव्यांची नोकरी इमानें इतबारें करण्याची त्याला मोठी हौस होती. तो मस्तानीचा नातू होता सबब तो लेकावळा अशी भाषा वापरून शेवटचा बाजीराव पेशवा तुच्छतापूर्वक त्याचा उल्लेख करीत असे. त्याच्या शौर्याचा उपयोग करून घेण्याची बाजीराव पेशव्याला अकल नव्हती, सबब १८०४ सालीं तैनाती फौजेच्या खर्चाकरितां जो सव्वीस लक्षांचा मुलूख इंग्रजांना कायमचा तोडून द्यावयाचा होता, त्यामध्यें ह्या अल्लीबहादरचें चार लाखांचें संपूर्ण संस्थान इंग्रजांनीं जबरदस्तीनें आपल्या ताब्यांत घ्यावें, व अल्लीबहादराला कांहीं राहूं नये अशा प्रकारचा मूर्खपणा बाजीरावानें केला, व त्याप्रमाणें इंग्रजांना त्यानें लेखी सनद लिहून दिली. इंग्रजांनीं पाहिलें कीं, हा अल्लीबहादर फार शूर आहे. ह्याच्या सैन्याची तयारी फार चांगली आहे, व बाजीरावाच्या सनदेप्रमाणें जर आपण जबरदस्तीनें ४ लाखांचें संस्थान घेऊं लागलों, तर हा अल्लीबहादर सुखासुखी शरण येणारा नव्हे. हा लढाईला उभा राहिला तर आपलेही शिपाई मारून टाकील. तस्मात् इंग्रजांनीं अशी तडजोड काढिली कीं अल्लीबहादरानें दोन लाखांचा मुलूख आपणाकडे ठेवावा व दोन लाखांचा मुलूख इंग्रजांनीं घ्यावा. त्याच्या मोबदला इंग्रजांनीं अल्लीबहादरचें संस्थानांत शांतता राखावी, अल्लीबहादर इंग्रजांचा मांडलीक समजण्यांत यावा, आणि बाजीराव पेशव्याचा धनीपणा झुगारून देण्याकरितां इंग्रजांनीं अल्लीबहादरला

मदत करावी. अशा रीतीनें एकही बंदुकीची गोळी खर्च न करितां इंग्रजांना दोन
लाखांचा मुलूख फुकटांत मिळाला. आपल्या हाताखालचे शूर सरदार यांना
बाजीराव पेशवा कसा नाखूष करीत असे याचें हें ठळक उदाहरण आहे. पुढें
१८१७ सालीं जेव्हां बाजीरावाचें इंग्रजाशीं युद्ध सुरू झालें तेव्हां हाताखालचे
शूर सरदार जे आपल्याला मदतीला आले असते त्यांची मदत बाजीरावानें
आपल्या मूर्खपणानें गमाविली. इ. स. १८११-१२ सालीं शिदोजीराव अप्पा
देसाई निपाणकर ह्याचें लहानसें निपाणी संस्थान बेळगांव जिल्ह्यांत होतें. हा
अप्पा देसाई फार शूर होता ह्याचे पूर्वज प्रथम लिंगाईत होते. परंतु पुढें मराठा
सरदारांच्या मुलीशीं शरीर संबंध केल्यामुळें हे निपाणीकर देसाई आपणाला मराठे
म्हणवूं लागले. त्यावेळीं कोल्हापूरच्या गादीवर दत्तकपुत्र शिवाजी राजे ह्या नांवाचे
होते. त्या छत्रपतींची अशी समजूत होती कीं, निपाणकर देसाई ह्यांची जातकुळी
हलकी सबब कोल्हापूरकर छत्रपतींची मुलगी अप्पा देसायाला देणार नाहीं. अप्पा
देसाई फार दुर्वृत्त होता, त्याला जरी दुसऱ्या २१ बायका होत्या तरी एकही
औरस पुत्र झाला नाहीं. त्यानें असा हट्ट धरला कीं कोल्हापूरच्या छत्रपतींच्या
मुलीशीं मी लग्न लावणार. त्याकरतां त्यानें सैन्य घेऊन कोल्हापूर शहराजवळ
रक्तपात आरंभला. कोल्हापूरचे छत्रपतीनीं तैनाती फौजेचा तह करून इंग्रजांची
मदत घेतल्याशिवाय अप्पा देसाई याचा पराभव होणें शक्य नाहीं, असें छत्र-
पतींनीं ठरविलें. त्यावेळीं सर्व मराठी साम्राज्याचा मालकी हक्क बाजीरावाकडे होता.
त्यानें जर सैन्य पाठवून बापू गोखल्यासारख्या सेनापतीला पाठविलें असते तर
निपाणकर देसायाचा बंदोबस्त ताबडतोब झाला असतां. परंतु बाजीरावाला
धनीपणा गाजवण्याची अक्कल नव्हती. तो उलट इंग्रजांना असें
लिहून कळवी कीं कोल्हापूरकर छत्रपती आमच्या पुड्यातले. त्यांच्याशीं
स्वतंत्र तह करावयाला इंग्रजांना अधिकार नाहीं. आणि कोल्हापूरच्या छत्रपतींना
असें लिहून कळवी कीं छत्रपतींनीं आपली मुलगी निपाण-
कर देसायांना देऊन टाकावी व भांडण लवकर मिटवावें. शेवटीं त्या निपाणकर
बहाद्दरानें छत्रपतींचा पराभव करून त्यांच्या मुलीशीं लग्न तर लावलेंच. आणि
लाजाहोम, सप्तपदी पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणीं आपणाला विष प्रयोग होईल
अशा भीतीनें, छत्रपतींच्या वाड्यांत जेवण न करतांच घाईघाईनें निपाणीकडे
निघून गेला. अशा भानगडीमुळें कोल्हापूरचे छत्रपतींना इंग्रजाशी तैनाती फौजेचा
तह करून त्या तहाअन्वयें इंग्रजांना मुलूख कायमचा तोडून द्यावा लागला. ह्या-
प्रमाणें हळूहळू इंग्रजांचा राज्यविस्तार हिंदुस्थानांत दृढमूल कसा झाला ह्याचें
उदाहरण प्रत्यक्ष घडलें तें दिलें म्हणजे खात्री होईल. घोड्याच्या सर्कशीची उपमा
या प्रश्नावर उजेड पाडणारी पाहिली पाहिजे. १८८६-८७ सालीं महाराष्ट्रांत
विष्णुपंत छत्रे यांची घोड्यांची सर्कस एकटीच होती. त्यांनीं युरोपीयनच्या धर्ती-

वर घोडे शिकवून लोकांना आश्चर्य चकीत करून सोडले. व लक्षावधि रुपये मिळविले. मोठा तंबू विकत घेतला. तेव्हां दक्षिण महाराष्ट्रांतल्या सर्व संस्थानिकांनीं आपले घोडे शिकवण्याकरतां विष्णूपंताच्या स्वाधीन केले. त्या घोड्यांच्या खाण्याचा खर्च, मोतद्दारांचा खर्च सर्व संस्थानिकांकडून मिळे. त्या घोड्याकडून खेळ दाखवून दररोज सर्कस करून दाखवी आणि तिकिट विक्रीचे लाखो रुपये विष्णुपंतांच्या हातांत येत. ह्या तिकिट विक्रीपैकीं दिवाबत्तीचा आणि प्रवास खर्च फक्त रुपयांत चार आणे खर्च होत असे बाकी विष्णुपंतांना निव्वळ फायदा रुपयात १२ आणे होत असे. घोडे शिकविण्याबद्दल संस्थानिकांकडून ह्या खेरीज बक्षिस मिळत असे तें निराळेंच. प्रथम शिकविलेले घोडे संस्थानिकाकडे परत पाठवून पुन्हां नवे घोडे आणावयाचे, त्यांच्याचकडून परभारे खेळ दाखवावयाचे. असा क्रम कित्येक वर्षें चालला होता. अशा रितीनें विष्णूपंत छत्रे यांनीं लक्षावधि रुपये मिळविले. ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यविस्ताराला ही उपमा तंतोतंत लागु पडते. १७९९ सालीं मे महिन्यांत टिपूला मारल्यानंतर म्हैसूरच्या हिंदू राजाचे मूळचें जें राज्य होतें ते त्याला देण्यांत आलें. त्यावेळीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांची गव्हर्नर जनरल यांना अशी सक्त ताकीद होती कीं, हिंदुस्थानांत इंग्रजांनीं राज्य स्थापावयाचें नाहीं. फक्त जेणेंकरून व्यापारांत जास्त फायदा होईल अशीच व्यवस्था कंपनीच्या अमलदारांनीं करावयाची. परंतु वॉरन् हेस्टिंग्ज ह्याच्या वेळेपासून अशी स्थिति झाली कीं, व्यापारांत मिळवलेला नफा लढाईंत खर्च करणें भाग पडलें. गव्हर्नर जनरल ह्याचे काम दरसाल नफातोट्याचा हिशेब, पत्रक रूपानें कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांच्याकडे पाठवावाच लागे. परंतु ही जमाखर्चाची तोंड मिळवणी करणें प्रत्येक गव्हर्नर जनरल याला फार अवघड होऊं लागले. त्याची कारणें अशी आहेत कीं यूरोप खंडांत जो फ्रेंच आणि इंग्लिश ह्यांच्यामध्यें एलाशापेलचा तह १७४८ सालीं झाला, त्या तहाअन्वयें मद्रास इंग्रजांना परत मिळाले. आणि कर्नाटकचा नबाब महमदअल्ली याचा हक्क फ्रेंचांनीं कबूल केलाच पाहिजे अशी त्या तहांत कलमें होतीं. ह्या तहाचा बरोबर अर्थ जर केला तर, असा होतो कीं, अर्काटचा नबाब महंमदअल्ली ह्याच्या शत्रूला फ्रेंचांनीं कधींही मदत करता कामा नये. परंतु हिंदुस्थानांतील इंग्रजांनीं त्या तहाचा असा अर्थ केला कीं, जर महंमदअल्लीच्या मुलुखाला हैदरअल्ली आणि टिपू यांच्याकडून त्रास पोंचला तर इंग्रजांनीं आपलें सैन्य देऊन ह्या दोन शत्रूंचा बंदोबस्त केला पाहिजे. परंतु हा अर्थ चुकीचा होता. सबब इंग्रजांना व्यापारांत मिळालेला नफा लढाईंत खर्च करावा लागला. आणि त्यामुळें इंग्रजांच्या व्यापारावर वाईट परिणाम झाला. हैदरअल्लीची सैन्याची तयारी फार उत्तम होती. ह्यामुळें इंग्रजांचें फारच नुकसान झाले, परंतु इंग्रजांच्या सुदैवानें हैदरअल्लीचा पराभव करण्याचें काम पेशवे करीत होते. त्यामुळें ईस्ट इंडिया कंपनी कायम राहिली. पुढें सरजॉन

शोअर गव्हर्नर जनरल ह्याचे कारकीर्दींत ही चूक इंग्रजांना कळून आली. म्हणून
महंमदअल्लीच्या मुलुखापैकीं ५/६ मुलुख आपल्या राज्याला गव्हर्नर जनरल यांनीं
कायमचा जोडला. महंमदअल्ली हा नवाब दुर्बळ असून मूर्ख होता आणि तो
१७९५ सालीं वारला. ह्या दीर्घायुष्याचा उपयोग त्यानें आपली नालायकी
दाखविण्यांतच केला. अशा रितीने कर्नाटकांत इंग्रजांचा राज्य विस्तार आपोआप होत
गेला. १८०६ सालीं म्हणजे लार्ड मिंटो हे गव्हर्नर जनरलच्या हुद्यावर असतांना
ईस्ट इंडिया कंपनीच्या खजिन्याची स्थिति समाधान कारक नव्हती. त्याचे पूर्वींच
इंग्लंडच्या पार्लमेंटनें ईस्ट इंडिया कंपनीला एक कोट रुपये कर्ज दिलें होतें. परंतु
त्यावेळेला युरोप खंडांत नेपोलियन बोनापार्ट ह्याचा धुमाकूळ फार भयंकर चालू
होता. तेव्हां गव्हर्नर जनरलला अशी भीति वाटली कीं जो बोनापार्ट इजिप्त
आणि सीरिया ह्या देशापर्यंत आला तो इराण, अफगाणिस्थान, बलुचिस्थान ह्या
देशांतून हिंदुस्थानावर खात्रीनें स्वारी करील. त्याचा प्रतिकार करण्याकरितां सैन्य
वाढविणें, या कामास कोर्ट ऑफ डायरेक्टर्स मंजुरी देणार नाहींत. आणि
खजिन्यांत तर पैसे नाहींतच. तेव्हां त्यांनीं अशी युक्ति काढिली कीं, ज्याअर्थी
दिल्लीचा बादशहा हाच हिंदुस्थानचा पूर्ण मालक आहे, आणि त्याचें राज्य
नेपोलियनच्या धुमाकुळापासून राखणें हें वजिराचें काम आहे, आणि अयोध्या
आणि लखनौ येथील नबाबांच्या ताब्यांत जो मोठा प्रदेश आहे, तो दिल्लीचे
बादशहाचे वजीर ह्या नात्यानें आहे, त्याअर्थीं हे जे दुर्बळ नबाब ह्यांच्या
ताब्यांतील मुलुखापैकीं चार पंचमांश मुलूख इंग्रजांनीं जबरदस्तीनें आपल्या
ताब्यांत घेतला आणि त्यांतील उत्पन्नाचा खर्च करून नेपोलियनशीं लढण्याला
नवीन सैन्य तयार केलें. नेपोलियन हिंदुस्थानावर आलाच नाहीं आणि लढाई
देण्याचें कारणच पडलें नाहीं. परंतु ते नबाब दुर्बळ होते आणि त्यांच्या
संस्थानचा कारभार मुळींच व्यवस्थित नव्हता, सबब हा मुलूख इंग्रजांच्या राज्याला
कायमचा जोडला गेला. ह्या मुद्याचें स्पष्टीकरण करण्याकरतां १७७६।७७ सालचा
इतिहास थोडासा पहावा लागेल. १७७५ सालीं इंग्रजांच्या तोफखान्यांच्या मदतीनें
जेव्हां रोहिले लोकांचा फडशा पाडून अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला ह्याच्या ताब्यांत
रोहिलखंड पूर्णपणें आलें, त्यावेळीं इंग्रजांचा जो खर्च झाला होता तो हप्तेबंदीनें फेडण्याचें
सुजाउद्दौला यानें कबूल केलें होतें. हा सुजाउद्दौला जर कांहीं दिवस जास्त जगला
असता तर त्यानें ते पैसे खात्रीनें फेडले असते. परंतु तो लवकरच अपघातानें
मारला गेला. ज्या रोहिले लोकांना पादाक्रांत केलें त्यांतील एका मोठ्या
सरदारांच्या मुली त्यानें जबरदस्तीनें आपल्या जनानखान्यांत घातल्या. त्या मुलींची
इच्छा सुजाउद्दौला याजबरोबर लग्न करण्याची नव्हती. एका मुलीनें आपल्या
वेणीमध्यें एक सुरी लपवून नेली होती. सुजाउद्दौला आणि ती मुलगी रात्रीं
एका खोलींत गेली असतांना त्या मुलीनें त्या सुरीनें सुजाउद्दौलाच्या गुप्त

इंद्रियावर प्रहार केला. त्यामुळें सुजाउद्दौवला एक तासाच्या आंत मरून गेला आणि नंतर त्या मुलीनेंही आपल्या स्वतःच्या पोटांत तीच सुरी खुपसून घेऊन आत्महत्या केली. खोलीच्या दाराला आंतून कडी असल्यामुळें वैद्याच्या मदतीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें खोलीचे दार फोडून दोघांचीही प्रेतें बाहेर काढण्यांत आली. ही बातमी वॉरन् हेस्टिंग्ज याला दोन महिने उशिरा समजली. रोहिल्यावरील स्वारीचा खर्च अयोध्येच्या नवाबाकडून न मिळाल्यामुळें वॉरन-हेस्टिंग्ज यानें अयोध्येच्या बेगमाकडून जबरदस्तीनें पैसा काढला, आणि ईस्ट इंडिया कंपनीचे हिशेबाच्या पत्रकाची तोंडमिळवणी केली. सुजाउद्दौवला जिवंत असतांनाच अलाहाबाद आणि कुरा हे दोन जिल्हे सुजाउद्दौवला याला विकून टाकून पन्नास लाख रुपये घेतले होते. सुजाउद्दौवल्याच्या पाठीमागून जे नवाब गादीवर बसले ते सर्व दुर्बल होते. ह्यामुळें त्यांच्या संस्थानच्या प्रदेशांत आणि रोहिलखंडांतसुद्धां जमीन महसूल गोळा करण्याचें काम इंग्रजांनाच करावे लागे. अशा रीतीनें रोहि-ल्यांच्या स्वारीवरील खर्चाचे रकमेची कित्येक वर्षें फेड न झाल्यामुळें, ह्या प्रांताचा कारभार इंग्रजांच्या ताब्यांत १७७७ सालापासूनच आला असें म्हणण्यास हरकत नाहीं. १७९५ सालाचे सुमारास युरोपखंडांत नेपोलियन बोनापार्ट याचा धुमाकूळ चालू असल्यामुळें पूर्व बाजूला इंग्रजांनीं राज्यवृद्धिसाठीं कोणतेही प्रयत्न केले तरी ते अन्यायाचे म्हणतां येणार नाहींत. कारण त्यावेळीं इंग्रजांचा हिंदुस्थानांतील व्यापार आणि संपादन केलेला मुलूख ह्यांच्या रक्षणाकरतां असें करणें भागच पडे. युरोपियन राजांची अशी स्थिति होती कीं, त्यावेळीं तिकडे शिक्षणाचा प्रसार झाला होता. आणि तह होऊन ज्या शर्ती पाळाव्या असें ठरेल त्या ते तंतोतंत पाळीत असत. युरोपांत तह झालेला असेल त्याची नक्कल आणि गव्हर्नरला पत्र हीं सोबत असली म्हणजे वाटेल तो ठाणेदार तहाप्रमाणें ताबडतोब ठाणें स्वाधीन करीत असे. १७९५ सालाच्या सुमाराला हॉलंड हें दुर्बल राष्ट्र होतें. आणि नेपोलियनच्या धुमाकुळामुळें जर पूर्वेकडील कोणतेही ठाणें डच लोकांनीं फ्रेंचांना देण्याबद्दल तहनाम्यांत कबूल केलें, तर इंग्रजांना बाधक होईल, ह्या भीतीनें इंग्रजांनी डच लोकांचीं अशीं ठाणीं जबरदस्तीनें जिंकून घेतलीं. त्यांपैकींच कोचीन बंदर हें इंग्रजांनीं डच लोकांपासून १७९५ सालीं जबरदस्तीनें जिंकून घेतलें. १८०६ सालीं संपूर्ण सीलोन बेट आणि आफ्रिकेंतील केपकॉलनी हा प्रदेश डच लोकापासून जिंकून घेतला. आणि १८१० सालीं मॉरिशस बेट फ्रेंचापासून इंग्रजांनीं जिंकून घेतलें. सीलोन आणि केपकॉलनी हें प्रांत जरी सध्या वसाहतीमध्यें मोडतात, तरी १८०६ सालीं ते डच लोकांच्यापासून जिंकून घेतले आहेत, आणि त्याचे कारण हिंदुस्थानच्या व्यापाराचें रक्षण करणें हेंच होय. कारण त्यावेळीं एडन आणि सुवेज हे प्रदेश इंग्रजांच्या ताब्यांत नव्हते. ह्यामुळें केप-कॉलनीच्या टोंकाला वळसा घालूनच इंग्रजांना हिंदुस्थानाकडे यावे लागे. सबब

राज्यवृद्धीची हीं प्रकरणें न्यायाचीच समजली पाहिजेत. १८१३ सालापर्यंत हिंदुस्थानांतील संस्थानिक एकमेकांविरुद्ध लढत असत व आपले प्रदेश वाढवीत असत. १८१४ सालापासून अशा प्रकारच्या लढाया बहुतेक बंद झाल्या, आणि बारा वर्षेपर्यंत ज्या ज्या संस्थानिकांच्या मुलुखांत इंग्रजांनीं शांतता स्थापन केली, असें झाल्यामुळें अनेक संस्थानांचा फायदा झाला, हें पाहून बाकीच्या संस्थानिकांना देखील असें वाटूं लागलें कीं, आपण देखील इंग्रजांच्या पंखाखालीं जावे, आणि तैनाती फौजेच्या खर्चाकरितां इंग्रजांना मुलूख तोडून द्यावा व आपण सुखी व्हावें. पंजाबांतील शीख लोकांचा पुढारी रणजितसिंग ह्यानें ३५ वर्षेपर्यंत इंग्रजांशीं दोस्ती ठेवून शीख संस्थानिकांची खरोखरी भरभराट केली. आणि त्यांच्या सैन्याचीही स्थिती अती उत्तम सुधारली. १८३४ सालीं त्यानें गव्हर्नर जनरल लॉर्ड वुइल्यम बेंटिंक याला मोठी मेजवानी दिली व त्याला अशी सूचना केली कीं, शीख संस्थानिक आणि इंग्रज ह्या दोघांच्याहि सैन्याची तयारी अती उत्तम आहे त्याअर्थी आपण दोघांनीं मिळून सिंध प्रांत जिंकून आपण निमेनिम वांटून घेऊं. परंतु त्यावेळीं गव्हर्नर जनरल ह्यानें ह्या सूचनेचा तीव्र निषेध केला. आणि त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, अशा प्रकारें चढाईचें धोरण सुरूं करण्याला इंग्रजाना कोर्ट ऑफ डायरेक्टर्स ह्यांची मुळींच परवानगी नाहीं.

हा शीख लोकांचा शहाणा पुढारी मेल्यानंतर तसा लायख इसम दुसरा कोणीही नव्हता. ह्यामुळें १८४० सालीं अफगाणिस्थानांत इंग्रजी सैन्याची कत्तल झाली, ही बातमी जेव्हां शीख सेनापतींना समजली, तेव्हां त्यांनाही असा गर्व झाला कीं, आपण इंग्रजी सैन्याला सहज जिंकूं. ह्या वेडेपणामुळें पतंगानें ज्याप्रमाणें दिव्यावर झडप घालावी त्याप्रमाणें शीख सैन्यानें इंग्रजाशीं लढण्याला आपण होऊन सुरवात केली. अशा लढाया चालता चालता शेवटीं १८४९ सालापर्यंत कांहीं शीख संस्थानिक खेरीज करून बाकीचा सर्व पंजाब प्रांत इंग्रजांच्या ताब्यांत आला.

१८४२ सालाच्या सुमारास वाफेची गलबतें सुरूं झाली त्यामुळें मोठ्या प्रमाणावर गलबतें बांधण्यांत येऊं लागलीं. सिंधू नदींतून गलबतांतून व्यापार करण्याला फार सोईचे पडेल व सैन्याची ने आण करण्याकरितां सिंधु नदी फार सोयीची, असें इंग्रजांना वाटूं लागलें. त्या नदीच्या दोन्ही कांठावरचा प्रदेश इंग्रजांच्या मालकीचा असल्याखेरीज हा जलप्रवास सुखाचा होणार नाहीं असें त्यांना वाटूं लागले. खेरीज त्याच वेळीं उत्तरेकडे शीख लोकांशीं युद्धें सुरूं होतीं, आणि पूर्व बाजूला चीन देशाशी अफूच्या व्यापारानिमित्त इंग्रजांचें युद्ध सुरूं होतें. अशा वेळीं सैन्य दारूगोळा आणि धान्यसामुग्री नेण्या आणण्याकरितां सिंधु नदीचा उपयोग इंग्रजांना जास्त प्रमाणावर होण्याचा संभव होता. सबब १८४३ सालीं सिंध प्रांत जिंकण्यांत आला. कारण चीनचें युद्ध आणि शीख लोकांचीं युद्धें

ही एकाच मालकाची अशी समजण्यांत येत होती, आणि हल्लींप्रमाणें त्यावेळीं हिंदुस्थानांत रेल्वेचा प्रसार झाला नव्हता.

म्हैसूरचा टिपू सुलतान ह्याच्यामध्यें शौर्य हा गुण अतिशय उत्तम होता परंतु हैदरअल्लीप्रमाणें त्याच्यांत मुत्सद्दीपणा बिलकुल नव्हता. हैदरअल्ली मरण्यापूर्वींच त्यानें टिपूला जवळ जवळ वेडाच ठरविलें होते तें बरोबर होतें. टिपूच्या मूर्खपणामुळें इंग्रजांना हिंदुस्थानांत पुष्कळ मुलूख संपादन करतां आला. टिपू सुलतान आणि नरगुंदचा संस्थानिक भास्करराव भावे ह्या दोघांची स्थिती जवळ जवळ सारखीच होती. पतंग ज्याप्रमाणें दिव्यावर झडप घालतो आणि त्या योगानें आपला स्वतःचा नाश करून घेतो, तशीच स्थिति ह्या दोन संस्थानिकांची झाली. टिपूनें आपल्या राज्यांत डोंगरावर अवघड जागी असा एक सुळका शोधून काढला होता कीं, लढाईत पाडाव केलेले युरोपियन कैदी त्या सुळक्यावर नेऊन तेथून त्यांना कडेलोट करून ठार मारावयाचें, अशी क्रूर शिक्षा टिपूनें ठरविली होती, ह्याचा परिणाम टिपूचें शरीर आणि राज्य सर्व धुळीस मिळविण्यापर्यंत शत्रूंनीं पोंचविला. तीच अवस्था नरगुंद संस्थानांतील भास्करराव भावे यांच्या बंडासंबंधीं लागू पडेल. भावे यांनीं देखील दोन तीन गोरे अंमलदारांना ठार मारिलें. आपलें संस्थान किती लहान व १८५६ सालीं इंग्रजांची सत्ता केवढी वाढली ह्याचा कांहीं एक विचार न करितां केवळ युरेपियन अंमलदार ठार मारल्यानें हिंदुस्थानांतून इंग्रजांची सत्ता नाहींशी होणें शक्य आहे काय ? सबब भास्करराव भावे ह्याला फाशी देऊन नरगुंद संस्थान खालसा केलें, यामुळें आपोआप इंग्रजी राज्यविस्तार वाढूं लागला हें न्यायाचेंच झालें.

१८१९ सालीं सांगलीकर पटवर्धन यांनीं इंग्रजांना असें लिहिलें कीं, पेशवे ब्राह्मण होते सबब आम्ही त्यांचे हाताखालीं लष्करी नोकरी करीत होतो तें योग्यच होतें, परंतु इंग्रज हे म्लेंछ आहेत सबब त्यांच्या हाताखालीं लष्करी नोकरी करणें आमच्यासारख्या ब्राह्मण सरदाराला कमीपणा आणणारें आहे, यास्तव धारवाडजवळ हुबळी महाल आहे तो लष्करी नोकरीचे मोबदल्यांत इंग्रजांना कायमचा तोडून दिला. ईश्वरी योजना अशी होती कीं, इंग्रजासारखे दैवी संपत्तीनें श्रेष्ठ असे राजे हिंदुस्थानाला प्राप्त व्हावे. कारण त्यांचें राज्य होण्यापूर्वी रयत सुखी होती हें म्हणणे बरोबर नाहीं. सर्व जमीन लागवडीत आलेली नव्हती. देशांत शांतता स्थापन करणेचें काम मोठ्या प्रमाणावर इंग्रजांनीं जसें केलें, तसें कौशल्य हिंदुस्थानांतील कोणाही संस्थानिकांत नव्हतें. इंग्रजांनीं पेंढारी आणि ठग लोकांचा नायनाट करून टाकून रयतेला सुखी केले. पूर्वी धान्य फार स्वस्त होतें आणि पैसा फार महाग होता. राजानें शेतकऱ्यापासून जमिनीच्या उत्पन्नाच्या ⅙ पेक्षां जास्त कर घेऊं नये हें शास्त्र वचन पूर्वीचे राजे मुळींच पाळीत नव्हते. मक्त्याच्या मामलती देत असत यामुळें जमीन महसूल वसूल करण्यांत गरीब

लोकांवर फार जुलूम होत असे. देशाच्या एका भागांत दुष्काळ पडला तर दुसऱ्या भागांतून धान्य आणवून रयतेचे प्राण वाचवावे अशी व्यवस्था पूर्वीच्या राजाला करतां येत नव्हती. दक्षिणेची सैन्यें उत्तरेकडे जातांना सैन्यांतील जनावरांना दाणावैरण मिळविण्याकरितां गरीब शेतकऱ्यांची उभीं पिकें जबरदस्तीनें जनावरांना चारीत असत. जडजड तोफा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं शेंकडो मैल दूर नेण्याकरतां राजे लोकाजवळ पुरेसे बैल नसत. सबब शेतकऱ्यांचे बैल जबरदस्तीनें पकडून पांच कोसपर्यंत त्यांच्याकडून तोफा ओढवून, नंतर ते बैल परत पाठवीत असत. अशा रीतीनें रस्त्यावरील सर्व गांवांत राजे लोकांचा जुलूम चालत असे. मराठा सैन्याचा धुमाकूळ उत्तर हिंदुस्थानांत दरसाल पावसाळ्यानंतर सुरू होत असे, यामुळें राजस्थानच्या प्रदेशांत मराठ्यांच्या सैन्याला गनीम ही संज्ञा देण्यांत आली होती. गनीम ह्या शब्दाचा अर्थ मनुष्यजातीचा शत्रू असा होतो. हेच मराठे शिलेदार बंगाल प्रांतांत लुटालूट करण्यास गेले म्हणजे बंगाली लोक त्यांना बरगे असे नांव देत असत. बरगे ह्याचा अर्थ लुटमार, जाळपोळ करण्यांत पटाईत असा होत होता. १८५९ सालीं महादेव गोविंद रानडे ह्यांचे वय सतरा वर्षांचे होतें, व ते आर्टस् कॉलेजमध्यें शिकणारे एक विद्यार्थी होते. त्यांनीं मराठ्या संबंधानें इंग्रजींत एक निबंध लिहून वाचिला त्यांत पुढील वाक्य होतें. "The Maratha Empire was founded by Robbers and it was strengthened by Robbers" हें वाक्य अगदीं बरोबर होतें. यावरून दैवीसंपत्तीनें श्रेष्ठ असें इंग्रज राज्यकर्ते हिंदुस्थानाला पाहिजे होते ही ईश्वरी योजना न्यायाची होती असें दिसून येईल.

—०—

नाना फडणीस ह्याची कर्तबगारी

॥ भले बुद्धिचे सागर नाना । ऐसे नाहीं होणार ॥
॥ मर्दानें हो राज्य राखिलें । मनसुबीची तलवार ॥

नाना फडणीस हा लोकोत्तर बुद्धिमत्तेचा पुरुष होता ह्यांत मुळींच संशय नाहीं पेशव्यांच्या साम्राज्याला ह्याच्या बुद्धीचा कितपत उपयोग झाला हें पाहण्याकरितां प्रथम त्यानें केलेली चांगलीं कामें सांगुन नंतर त्याचे कर्तबगारीमुळें मराठी साम्राज्याचें नुकसान किती झालें हेंहि दाखविणें जरूर आहे. १७६० सालीं आपली आई आणि बायको यांना बरोबर घेऊन सदाशिवरावभाऊ पेशव्यांच्या सैन्याबरोबर नाना फडणीस उत्तरेकडे गेला तो काशीयात्रा वगैरे करतां येतील अशा हेतूनेंच गेला. यात्रेचा हेतु सफल झाला नाहीं. कपीनदी ओलांडल्यावर

सदाशिवराव भाऊच्या कचेरींत जीं जीं कारस्थानें झालीं त्या त्या कारस्थानांत नाना हा साक्षीदार म्हणून हजर होता. शेवटच्या दिवशीं सदाशिवराव भाऊ रणांगणावर जाईपर्यंत प्रत्येक सल्लामसलत सदाशिवराव भाऊ आणि नाना ह्यांच्या देखरेखी खालीं होत होती. तो पानिपतच्या पराभवानंतर स्वतः लंगोटी नेसून आणि बोरीचा पाला खाऊन आपला जीव त्यानें जगविला, आणि भेलसा मुक्कामीं बाळाजी बाजीराव पेशवा ह्याची आणि नानाची मुलाखत झाली, त्या ठिकाणीं पानिपतच्या स्वारीची इत्थंभूत हकीकत नानानें पेशव्यास कळविली. पुण्यास आल्यानंतर ह्या सर्व माहितीचा उपयोग नवीन पेशवा माधवराव बल्लाळ याला करून घेतां आला. अकरा वर्षांच्या कारकीर्दींत माधवराव बल्लाळ पेशव्याला कोणत्याहि सल्लामसलतींत नानाचा फार उपयोग झाला. माधवरावाचा नानावर अत्यंत विश्वास. घोडपच्या लढाईत राघोबा दादाचा पराभव झाल्यानंतर राघोबा दादाला खुद्द शनवारच्या वाड्यांतच कैदेंत ठेविले होते. त्याच्यावर सक्त देखरेख ठेवण्याकरितां माधवराव बल्लाळ यानें नानाचीच योजना केली होती. काळोख्या रात्रीं फंदफितूरी करून राघोबा दादानें पळून जाण्याचा बेत केला त्याचा बंदोबस्त नाना हुशार होता म्हणूनच झाला. लायक माणसाची महत्त्वाच्या जागेवर नेमणूक करणें ह्या कामांत नाना फार कुशल होता. पुरंदर किल्ल्यावर गंगाबाई बाळंतीणीच्या खोलींत असतांना त्या खोलीच्या दरवाज्याबाहेर पुरुषोत्तम कृष्ण पटवर्धन मंगळवेढेकर या लायक माणसाची नेमणूक नानांनीं केली होती. ह्या मुळेंच सवाई माधवराव पेशवे ह्यांचे प्राण वांचले. असे कट झालें होते. हें उघडकीला आले. आनंदीबाई पेशवे इनें एका कामाठणीला फितूर करून तिच्या वेणीमध्यें एक सुरी दडवून नेऊन, त्या सुरीनें तान्हें मूल सवाई माधवराव याचा प्राण घेण्याकरितां पाठविलें होते. परंतु ह्या मंगळवेढेकरानें मोठ्या चातुर्यानें तो कट उघडकीला आणून त्या कामाठणीला कडेलोटाची शिक्षा देऊन ठार मारविलें. सालबाईच्या तहानंतर बारावर्षेंपर्यंत नानाला जी स्वस्थता प्राप्त झाली त्या स्वस्थतेचा उपयोग करून नानानें पेशव्यांच्या खजिन्याची स्थिति चांगली सुधारली. सालबाईचे तहापर्यंत पेशवे सरकारचें खास सैन्य ठेवलेलें असे, त्याचा खर्च फार मोठा होता, ह्यामुळे पेशवे नेहमीं कर्जबाजारी असत. परंतु सालबाईच्या तहानंतर सर्व कारभार नानाच्या एक हातीं चाले, यामुळे नाना लढाईची कामगिरी परभारे हाताखालच्या सरदारांकडून भागवीत असे. मोहीम फत्ते झाली म्हणजे सरदारांना बक्षिसें पेशव्यांकडून देववीत असें. सरदारांच्या सरंजामाचे हिशेब तपासीत असे, आणि अशा रितीनें सर्व सरदारावर नानाचा चांगला वचक असे. जो कागद सवाई माधवराव पेशव्यापुढें ठेवावा त्याच्यावर नानाच्या सांगण्यावरून पेशवा सही करीत असे. अशा तऱ्हेनें सवाई माधवरावाच्या मृत्युपर्यंत बारा वर्षेंपर्यंत एकतंत्री कारभार नानानें [illegible]. कार-

भाईच्या कारस्थानांत महादजी शिंदे, परशरामभाऊ पटवर्धन, हरीपंत तात्या फडके आणि पानसे तोफखानेवाले, ह्यांच्यासारख्या शूर वीर पुरुषांना नाना सारखा पुढारी लाभला म्हणूनच बारभाईचें कारस्थान यशस्वी झालें. हीं जी चिकाटी आणि धोरण नानामध्यें होते ते गुण सखाराम भगवंत बोकील यामध्यें नव्हते. ह्यामुळें बारभाईच्या कारस्थानाच्या सुरवातीला जरी सखाराम बापू आणि नाना एक होते, तरी सखाराम बापूच्या घरखोडीमुळें त्यांना शेवटीं तुरुंगवास भोगावा लागला आणि त्यांतच त्याला मृत्यू आला. सखाराम बापू पुढारी होण्यास बिलकूल लायक नव्हता. शत्रूंच्या मुलूखांतून गुप्त बातम्या काढण्याकरतां नानानें शेंकडों हेर नेमिलें होते. आणि ह्या कलेमध्यें नानाचा हात धरील असा एकही पुरुष त्यावेळीं हिंदुस्थानांत नव्हता. १७८२ सालीं फत्तेसिंग गायकवाडानें इंग्रजाशीं असा गुप्त तह केला होता कीं, इंग्रजांनीं गोविंदराव गायकवाडाला मदत करूं नये आणि त्याचे मोबदला फत्तेसिंगानें इंग्रजांना तापी नदीच्या दक्षिणेकडे असलेला गायकवाडाचा सर्व मुलूख द्यावा. हा मुलुख कोणता होता हें आजही दाखवितां येईल. तो मुलुख असा. नवसारी, पलसाणा, कामरेज, सोनगड, व्यारा, महूआ, चिखली, नंदुरबार, गणदेवी, बिलीमोरा आणि सुरत अठाविशी पैकीं चौदा परगणे असा होय. हा मुलूख त्याचवेळीं इंग्रजांचे ताब्यांत गेला असता. परंतु ह्या गुप्त तहाची बातमी १७८३ सालीं नानाला मिळाल्यानंतर नानानें वॉरन् हेस्टिंग्ज यास असे निषेधपर पत्र लिहिलें कीं, अशाप्रकारें गायकवाडाबरोबर तुम्ही परभारे तह केला तर, आम्ही चालूं देणार नाहीं. कारण गायकवाड आमच्याच पुठ्यातले. हा तह जर कायम झाला तर सालबाईचा तह इंग्रजांनीं मोडला असें आम्ही समजूं, आणि नंतर आम्हांस जे सुचेल ते करूं. परंतु आठ वर्षांच्या ह्या राघोबा दादाच्या भानगडीमुळें वॉरन् हेस्टिंग्ज देखील कंटाळून गेला होता, म्हणून हा गायकवाडाशीं झालेला गुप्त तह त्यानेंही रद्द करविला. १८०० सालीं मार्च महिन्यांत नाना मृत्यू पावला त्यापूर्वीं कांहीं महिने गव्हर्नर जनरलकडून बाजीराव रघुनाथ पेशवे याजकडे लिहून आलें होतें कीं, पेशव्यांनीं देखील इंग्रजाबरोबर तैनाती फौजेचा तह करावा, म्हणजे त्यांत पेशव्यांचा फायदा होईल. परंतु नानानें गादीवरील पेशव्यास अशी उत्तम मसलत दिली कीं, असा तह केल्यानें पेशव्यांचे स्वातंत्र्य नष्ट होईल. ही मसलत बाजीराव रघुनाथ पेशव्याला देखील पसंत पडली.

ही झाली नानाच्या कर्तबगारीची चांगली बाजू. आतां नानांच्या कर्तबगारीची वाईट बाजू देखील तितकीच जोरदार आहे. नानांच्या वेळीं इनाम आणि जहागिरी फुकट मिळवाव्या हें जणुकाय महाराष्ट्रांतील कर्त्या माणसांना व्यसनच लागलें होतें. सवाई माधवराव १८ वर्षांचा झाला आणि तो नाना सांगेल त्या कागदावर सही करीत होता. पेशव्यांना कर्ज काढण्याचें कांहीं कारण

नसतांना पुण्यांतील मोठमोठ्या सावकाराकडून मोठमोठ्या कर्जाऊ रकमा घ्यावयाच्या आणि त्याबद्दलचे गहाण दस्तऐवज पेशव्यांच्या सहीचे द्यावयाचे. हीं कर्जें पुढें पेशव्यांनीं व्याजासह फेडण्याचें ऐवजीं, इनामगांवांच्या सनदा त्या सावकारांना वंशपरंपरेनें पेशव्याच्या सही शिक्याच्या द्यावयाच्या. अशा रितीनें लबाडीनें दिलेली सनदा पत्रें इंग्रज सरकारनें अद्यापीहि वंशपरंपरेनें चालविली आहेत. १७९२ सालीं श्रीरंगपट्टणाच्या टिपूवरील मोहिमेंत फत्ते होऊन तह झाला. त्यावेळीं पेशव्यांना एक कोट रुपये खर्चाबद्दल रोख मिळाले. त्यावेळीं पेशव्यांच्या खजिन्याची स्थिति फार चांगली होती. परशुरामभाऊ पटवर्धन ह्यांनीं रणांगणावर श्रम साहस करून उत्तम कामगिरी बजाविली. परशुरामभाऊ नानाच्या नेहमीं अर्ध्या वचनांत असे. अशा स्थितीत नानानें लष्करी खर्चानिमित्त झालेलें पटवर्धनांचें कर्ज तावडतोब फेडुन टाकण्याचें मनांत आणिलें असतें, तर हें काम कांहीं नानाला अशक्य नव्हते. परंतु ह्या कामांत नानाचा स्वार्थसाधुपणा दिसून आला. टिपूपासून जिंकलेल्या मुलुखापैकीं जे महाल पेशव्यांच्या वांटणीला आले त्यापैकीं धारवाड जिल्ह्यांतील राणेबिन्नुर, हनगल आणि सावनूर हे तीन महाल परशुरामभाऊंच्या ४० लाख रुपये कर्ज फेडण्याच्या बाबतींत परशुरामभाऊकडे कर्ज फेडीत हे तीन महाल लावून दिले. हे तीन महाल पुढें मागें पेशव्यांच्या सनदा घेऊन आपला मित्र परशुरामभाऊ ह्याच्या घरांत कायमचे घालावे असा नानाचा गुप्त हेतु होता. परंतु सवाई माधवराव पेशवा अकाली मरण पावल्यामुळें ह्या तीन महालासंबंधीं अनेक भानगडी उत्पन्न होऊन त्या पायीं पटवर्धनांना अनेक संकटें भोगावीं लागली. आतां पटवर्धन दप्तरांतील पत्रें उजेडांत आल्यामुळें हा नानाचा स्वार्थ साधुपणा विद्वान् लोकांना फार उशीरा समजून आला. इंग्रजी राज्य झाल्यानंतर ज्या ज्या वेळीं दुष्काळ पडतात त्या त्या वेळीं इंग्रज सरकार दुष्काळीं कामें सुरू करतात. त्या कामावर आरोग्य बिघडूं नये म्हणून अन्नपाणी आणि दवाखाने ह्यांची व्यवस्था उत्तम ठेवली जाते. जर कदाचित् कॉलरा सुरू झाला तर प्रेतांना मूठमाती देण्याची हयगय झाल्यास रोगाचा जास्त फैलाव होईल, म्हणून कॉलऱ्यानें लोक मरूं लागण्यापूर्वींच त्यांना पुरण्यासाठीं शें दोनशें खड्डे अगोदरच उकरून ठेवतात. अशा प्रकारचे खड्डे मयत इसमांना पुरण्याकरितां तयार केलेले असतात. परंतु नानानें मराठी साम्राज्याला जिवंत समाधि मिळेल असेच खड्डे तयार करून ठेविले. त्याची कडू फळें हिंदुस्थानाला पुढें कित्येक शतकें भोगावी लागणार. अशा प्रकारचीं नानाचीं कृत्यें जीं उघडकीस आलीं तीं पुढें दिल्याप्रमाणें:— साताऱ्याचे छत्रपति हे वास्तवीक मराठी साम्राज्याचे मालक असतांना नानाचे वेळीं ते फक्त राजकीय बंदिवान म्हणून असत. त्यांच्या खाजगी खर्चाला जी दरसाल पांच लाख रुपये नेमणुक होती त्यांत देखील नानानें कापाकाप करून ती नेमणुक एक लाखावर आणण्यांत आली. छत्रपतींचे जास्त हक्क होते ते पेशव्यांच्या पीछे

खान्यांत पुण्यास पोंचविण्यांत आले. कित्येक कामाठणींना छत्रपतींच्या वाड्यांतून दररोज अडीश्री दाणे मिळत असत, त्या दाण्यांची नेमणूक बंद करण्यांत आली. अशा वेळीं छत्रपतींचा आत्मा किती तळमळला असेल ? जे छत्रपति पेशव्यांचे धनी म्हणून पेशवे चांगला मुहूर्त पाहून राजदर्शनाकरितां सातारा येथें जात, त्याच पेशव्यांना मात्र राजदर्शनाचें पुण्य घडत असे, आणि सवाई माधवरावाचा दरसाल खाजगी खर्च ज्या वेळीं सहा लाख रुपये होता, त्यावेळीं त्यांचे धनी जे छत्रपति त्यांचा मात्र खाजगी खर्च एक लाख रुपये. हा नानांचा केवढा निष्ठुरपणा !

सवाई माधवराव पेशवा मेल्यानंतर साडेतीन महिन्यांनीं बाजीराव रघुनाथ पेशवा ह्याला जुन्नरहून पुण्यानजीक आणविले. ह्या साडेतीन महिन्यांत नानानें पेशव्यांचा सर्व खजिना शनवारच्या वाड्यांतून लांबविला ! त्यावेळीं चार कोटि रुपयांपेक्षां देखील जास्त शिल्लक पेशव्यांच्या खजिन्यांत होती. हा सर्व खजिना नानानें गुप्तपणें राजवाड्यांतून हालविला आणि आपल्या वशिल्याचे जे मामलेदार डोंगरी किल्ल्यावर कामगिरीवर होते, त्या मामलेदारांजवळ विश्वासानें गुप्तपणें तो खजिना ठेवून दिला. पुढे १७९७ च्या डिसेंबर महिन्यांत नाना स्वतः कैदेंत गेले तेव्हां हा सर्व पैसा त्या मामलेदारांनीं गुप्तपणें गिळंकृत केला. ह्याच पैशामुळें पुण्याच्या लोकांना अत्यंत यमयातना पुढें पांच वर्षेपर्यंत भोगाव्या लागल्या. सवाई माधवराव पेशवा मेल्यानंतर त्याच्या विधवेच्या मांडीवर दत्तक देणेकरितां कोंकणांतून सगोत्र मुलगे नानानें आणविले. परंतु दौलतराव शिंदे व जिवबादादा बक्षी ह्यांच्या कारस्थानामुळें हा नानांचा डाव सर्वस्वी फसला. त्यावेळीं शिंद्यांच्या फौजेची तयारी अति उत्तम होती. त्यांनीच बाजीराव रघुनाथ पेशव्याला गादीवर आणण्यासाठीं जोराचा नेट धरिला. तेव्हां नानानें दुष्ट बुद्धीनें असा एक कट रचिला कीं खानदेशांत जांब गांवीं दौलतराव शिंद्याची छावणी होती, त्या ठिकाणीं मारेकऱ्याकडून दौलतराव शिंद्याला ठार मारवावें असा कट करून नानानें द्रव्यसहाय्य दिलें. परंतु दौलतराव शिंद्याच्या सुदैवानें हा कट यशस्वी झाला नाहीं. त्यांतील ७।८ इसम पकडले गेले व त्यांनीं तोफेच्या तोंडी जाण्यापूर्वी कबूली जबाब दिले त्यांत ह्या कटातील मुख्य सूत्रचालक नाना फडणीस होता हें उघडकीस आले. ह्यानंतर ह्या दुष्टपणाबद्दल नानाची बेअब्रु करावयाची असा शिंद्याच्या छावणींतील लोकांनीं निश्चय केला, परंतु दरम्यान १७९६ च्या जानेवारीमध्यें शिंद्यांचा हुशार दिवाण जिवबादादा बक्षी हा अजारी पडून मृत्यु पावला. यामुळें शिंद्यांचे पुण्यास येणें लांबणीवर पडलें. शिंदे पुण्यास येण्यापूर्वीच नानानें जुन्नरहून बाजीरावास पुण्यास आणिलें होतें. त्यानंतर ह्या मारेकऱ्याच्या कामाबद्दल शिंद्यांच्या कारभाऱ्याकडून नानाची खास बेअब्रु केली जाणार अशी जेव्हां नानास भीति पडली, तेव्हां बाजीराव रघुनाथ पेशव्यास साताऱ्याच्या छत्रपतीकडून वस्त्रे देवविण्यां-करितां म्हणून नानानें पुण्याहून पाय काढला आणि साताऱ्यास गेले, आणि साताऱ्याहून

रायगड आणि महाड येथें जाऊन तेथून कारस्थानें नानानें खेळविलीं. जो बाजीराव रघुनाथ पेशवा नानाला नको होता त्यालाच बाळोबा तात्या पागनीस, दौलतराव शिंदे आणि परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं मसलत करून कैद केलें होतें, आणि तोच बाजीराव १५ हजाराची जहागीर आणि दोन किल्ले दिले तर मी पेशव्यांच्या गादीवरील हक्क सोडावयास तयार आहे, असा कबूल झाला असतांना देखील त्याच बाजीरावाला १७९६ साली डिसेंबर महिन्यांत पुन्हां पेशवाईच्या गादीवर आणण्यामध्यें पुन्हां नानानेंच आपली पुण्याई खर्च केली, यामुळें नानानें ही जी घोडचूक केली तीच पुढें पेशवाईच्या नाशाला कारण झाली. याप्रसंगीं विनाश-काले विपरीत बुद्धिः हें तत्त्व नानाच्या फाजिल शहाणपणाच्या ह्या कृत्यामुळें तंतोतंत लागू पडलें.

परशुरामभाऊ पटवर्धन याला या कारस्थानानंतर दीड वर्षेपर्यंत कारागृह-वास भोगावा लागला ही संधि साधून नानानेच आपल्या पदरचे एक लाख रुपये कोल्हापूरच्या छत्रपतींना दिले आणि तुम्ही सैन्याची तयारी करून परशुरामभाऊ पटवर्धन यांची ठाणीं जबरदस्तीनें जिंकून घ्या मी तुम्हास मदत करतो असें सांगितलें. ह्याप्रमाणें कोल्हापूरकर छत्रपति व परशुरामभाऊ यांच्या वैराला नवीन जोम फुटला आणि हें भांडण वाढत वाढत इतकें वाढलें कीं, शेवटीं १७९९ साली सप्टेंबर महिन्यांत पट्टणकुडीसारख्या क्षुद्र लढाईत कोल्हापूरकराकडून परशुराम-भाऊला मृत्यु आला. याच्या मुळाशीं नाना फडणवीसाचेंच दुष्ट कारस्थान होतें. पुढें परशुरामभाऊ पटवर्धनाच्या मुलांनीं आपलें बापाचे मृत्युबद्दल कोल्हापूरच्या छत्रपतीवर सूड उगविण्याकरितां जेव्हां १८०० साली जानेवारींत कोल्हापूर शह-राला वेढा दिला, तेव्हां परशुरामभाऊच्या मुलांना सैन्याच्या तयारीकरितां ५ लाख रुपये नानानेंच दिले. ह्याप्रमाणें नाना फडणवीस म्हणजे, बारशालाही तयार, आणि बाराव्यालाही तयार, अशा प्रकारें दुहेरी कारस्थान नानाचें होतें. हा जो पैसा सढळ हातानें नाना वारंवार खर्च करी तो पेशव्यांच्या खजिन्यांतीलच दुबाडलेलाच होता. १७९६ सालच्या मार्च महिन्यांत साताऱ्याच्या छत्रपतीकडून बाजीरावाला पेशवाईची वस्त्रें आणण्याकरितां नाना साताऱ्यास गेला. तेव्हां त्यानें साताऱ्याच्या छत्रपतींना अशी विनंती केली कीं, "पेशवाईच्या गादीवर कोणास बसवावे याबद्दल पुण्यास बजबजपुरी माजली आहे. तुम्ही मराठी साम्राज्याचे खरे मालक आहां. तुम्ही पुण्यास चला. मी तुम्हास तावडतोब एक कोट रुपये सातारा येथें देतो. माझ्या पसंतीचा पेशवा गादीवर बसवलाच पाहिजे असा तुम्ही लेखी हुकूम माझ्या हातांत द्या. म्हणजे इतर मराठे सरदाराची मदत घेऊन मी तोच पेशवा गादीवर बसवतो व दौलतराव शिंदे आणि बाजीराव रघुनाथ ह्या दोघांचे कांहीं चालूं देत नाहीं. हें काम मी कसें शिताफीनें करून दाखवितों ते पहा." परंतु ही विनंती छत्रपतींनीं मान्य केली नाहीं, कारण छत्रपति दुर्बळ होते; राजकी-

बंदिवान होते. आणि १७५२ सालापासून ४२ वर्षेपर्यंत छत्रपतींना ज्यांच कांहींच सत्ता नाहीं अशा प्रकारें ते निर्माल्यवत् होते. हे जे एक कोट रुपये छत्रपतींना नाना देणार होता ते देखील पेशव्यांच्या खजिन्यांतील लुबाडलेलेच होते. जो नाना दीडवर्षापूर्वीच छत्रपतीचा खाजगी खर्च दरसाल ५ लाखाच्या ऐवजी १ लाखावर आणण्याइतका निष्ठूर होता, तोच नाना ह्यावेळीं छत्रपतींना एक कोट रुपये ताबडतोब देण्याला तयार झाला इतका उदार झाला, त्याअर्थी ही नानाची दुर्बुद्धीच मराठ्यांच्या नाशाला कारणीभूत झाली. १८०० सालीं मार्च महिन्यांत नाना मरण पावला, आणि पटवर्धन बंधूंनी जरी दहा लाख रुपये खर्च करून कोल्हापूर शहराला दिलेल्या वेढ्याचें काम पांच महिने चालविलें, तरी त्यांत कवडी इतकें देखील यश आलें नाहीं. आणि वेढा उठवून पटवर्धन बंधूंनीं पळ काढला. सवाई माधवराव पेशवा मेल्यानंतर नानानें जितकीं कारस्थानें केलीं तितकी सर्व निष्फळ झालीं. "माझे ग्रह फिरले आहेत" असें नाना आपल्या तोंडानें म्हणूं लागला. १७९९ च्या मार्च महिन्यांत परशुरामभाऊ पटवर्धन कोल्हापुरकराशीं लढत असतांना सैन्य, दारुगोळा आणि पैसा याबाबतींत परशुरामभाऊ अत्यंत संकटांत होता. त्यानें नानाला विनंति केली कीं, "नाना मागले सर्व विसरून जा. आणि यावेळीं मी तुमचा धाकटा भाऊ म्हणून संकटाचे वेळीं मदत करा." यामुळें इतर मराठे सरदारांना नानानें इतकीं पत्रें लिहिलीं, आणि त्या पत्रावरून परशुरामभाऊ पटवर्धनाला पन्नास हजार सैन्य तरी मदतीला जाईल असी व्यवस्था नानानें केलेली असून, एक शिपाई देखील परशुरामभाऊच्या मदतीला गेला नाहीं. कारण सर्व शिलेदारांचे पगार थकलेलें, आणि नालबंदीचें येणें थकलेलें. ज्या नानानें १७९४ सालच्या डिसेंबर महिन्यांत सवाई माधवरावाच्या सहीचीं पत्रे रवाना करून, खर्ड्यांच्या लढाई करितां १ लक्ष ६० हजार सैन्य जमा केलें, त्याच नानाच्या चार वर्षानंतर स्वदस्तुरच्या पत्रानें एकही शिलेदार लढाईला तयार झाला नाहीं, हें केवढें अंतर ! कारण १७९४ सालांतले नाना निराळे आणि १७९९ सालांतले नाना निराळे.

॥ पुंप्योष्मणा विरहित: पुरुष: स एव ॥
॥ त्वन्य: क्षणेन भवतीतिविचित्र मेतत् ॥

नाना असामान्य बुद्धिमान तर खराच. परंतु त्याला कटिशूलाची व्यथा इतकी जबरदस्त होती कीं, पुण्याचा घाशीराम कोतवाल यानें नानाला खूष करण्याकरितां उत्तर हिंदुस्थानांतून १६ आणि १८ वर्षांच्या दोन सुंदर मुली कसबिणीकडून खरेदी घेऊन, त्या नानाच्या नाटकशाळा करण्याकरितां नानाला बक्षिस दिल्या होत्या. ह्यामुळें घाशीराम कोतवाल अनेक प्रकारचे अन्याय करून पुण्यांतून पैसे उकळीत होता. जो कोतवाल नागरिकांच्या रक्षणाकरितां नेमला, तोच पुढें शहरच्या लोकांना छळूं लागला. एकदां तर घाशीरामाच्या बागेंतील

मक्याची कणसें त्याला न विचारतांना भिक्षुक ब्राह्मणांनीं तोडून भाजून खाल्लीं ह्या अपराधाबद्दल घाशीरामानें १८ ब्राह्मणांना ठार मारिलें. नंतर इतर भिक्षुक ब्राह्मण उघडे बोडकें शनवारवाड्याच्या दिल्लीदरवाजांत येऊन आरडाओरड करून सवाई माधवराव पेशव्यास अर्ज करूं लागले. "श्रीमंत आपण २१ वर्षांचें झाला तरी किती दिवस नानाच्या कुडच्यानें पाणी पिणार? हा घाशीराम कोतवाल नानाला सुंदर नाटकशाला अर्पण करीत आहे, आणि ब्राह्मणांला ठार मारतो तरी पेशव्यांच्या दरबारांत अन्यायाची दाद लागत नाहीं?" सवाई माधवराव पेशव्यानें ह्या नंतर आपल्याच जबाबदारीवर नानाला न कळवितां जे एक शौर्याचें कृत्य केलें तें हेंच. स्वतः शिपाई घेऊन सवाई माधवराव गेले आणि घाशीरामाला पकडून ब्राह्मणांच्या ताब्यांत दिलें. ब्राह्मणांनीं त्या घाशीरामाला दगडांनीं ठेंचून ठार मारिलें.

जर एखाद्या अज्ञान सरदाराची मिळकत कोर्ट ऑफ् वॉर्डस्च्या वहिवाटीला असेल, आणि त्या सरदाराच्या घराण्यांत जर एकादी सकेश विधवा असेल, व ऋतुप्राप्ति नंतर ती सोंवळी होण्यास नाकबूल असेल, तर तिला वश करण्याकरितां गुप्तपणें नाना आपले हस्तक पाठवीत असे. अशा एका घराण्यांत त्या सकेश विधवेचा सावत्र मुलगा तिला सोंवळी करण्याकरितां आग्रह धरीत होता. तेव्हां तें भांडण त्रिकोपाला गेले, आणि त्या भांडणाचे पर्यवसान तरवारीनें कांहीं माणसांना जखमी करण्यापर्यंत मजल गेली. ह्या अन्यायाची दाद लावण्याकरितां कित्येक दिवसपर्यंत पेशव्यांच्या दरबारांत खटपट केली, परंतु नानाच्या गुप्त कारस्थानामुळें दाद लागेना. शेवटीं १७९२ सालीं महादजी शिंद्यांचा मुक्काम पुण्या नजीक असतांना, त्या अर्जदारांनीं महादजी शिंद्यामार्फत न्याय मिळवून घेतला. महादजी शिंदे यांनीं सवाई माधवराव पेशव्यासमोर भरदरबारांत नाना फडणविसाच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचून सर्व प्रकरण सवाई माधवराव पेशव्याला समजावून दिले.

पुरंदरच्या तहानंतर पुन्हा वडगांवच्या लढाईचें कारण काय ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास आजपर्यंत सवड नव्हती, परंतु आतां इतिहासांतील पुरावा अशा रीतीनें उजेडांत आला आहे कीं, नाना फडणविसाच्या चुकीमुळेंच ह्या कलहाला नवीन अंकूर फुटले. जो नाना नेहमीं म्हणत असें कीं, "युरोपियन टोपीकर हे वचनाचे पक्के, जे एकदां बोलतील त्यांत कधींही बदल करणार नाहींत." अशा प्रकारें नाना फडणीस नेहमीं त्यांची वाहवा करीत असे. असें असून त्याच टोपीकरांना फसविण्याचा नानानें प्रयत्न केला आणि पेशवाईवर नवीन संकट ओढवून आणिलें. पुरंदरच्या तहानें पेशव्यांनीं इंग्रजांना तीन लक्ष रुपयांचा मुलुख देण्याचे कबूल केलें होतें. आणि ही शर्त अज्ञान बालक पेशवा ह्याच्या वतीनें उभयतां कारभारी नाना फडणीस व सखाराम भगवंत बोकील यांनीं पुरे करावयाची

असा ठराव झाला होता. परंतु हा तीन लक्षांचा मुलुख देण्याला नाना फड-णवीस अळंटळं करूं लागला. त्यावेळेस पैसा फार महाग असल्यामुळें आणि मामलतीचे मक्ते देत असल्यामुळें प्रत्येक प्रांतांचा जमीन महसूलाच्या कमाल आकाराचा आंकडा निराळा असे, आणि पेशव्यांच्या हातांत प्रत्यक्ष रक्कम कमी येत असे. नानानें हा तीन लक्षाचा मुलूख इंग्रजांना दिला तर नाहींच परंतु " कमाल आकार किंवा प्रत्यक्ष वसूल " असे प्रश्न उत्पन्न करून पत्र व्यवहारांत कित्येक महिने फुकट चालविले. नाना फडणवीसासारखा शाहणा माणूस अशा प्रकारें आपल्या लेखी वचनाला हरताळ लावील अशी वॉरन् हेस्टिंग्ज याला कल्पना नव्हती, आणि इंग्रजांना फसविण्याकरितां फ्रेंचांचा वकील पेशव्यांच्या दरबारी बोलावून त्याचा आदरसत्कार करण्याचा मोठा भपकेबाज समारंभ नानानें करण्याला सुरवात केली. या भीतीनें इंग्रज घाबरून जाईल व तीन लक्षांचा मुलुख मागण्याचा आपला हट्ट सोडील अशी नानाची कल्पना होती. परंतु ही कल्पना साफ चुकीची होती. ज्या वेळेला मुंबईच्या गव्हर्नरकडून कल-कत्त्याच्या इंग्रजाकडे ह्यासंबंधीं रिपोर्ट गेला, व कारभाऱ्यांनीं तीन लक्षांचा मुलूख दिला नाही अशी जेव्हां वॉरन् हेस्टिंग्जनें खात्री करून घेतली तेव्हां वॉरन् हेस्टिंग्जचे इच्छेविरुद्ध पुन्हा लढाई सुरूं करण्याकरतां कलकत्त्याहून सैन्य रवाना झालें. नंतर चार वर्षांनीं सालबाईच्या तहानें ही भानगड कायमची मिटली. तरी तीन लक्षांच्या मुलुखाऐवजी साष्टी तालुका इंग्रजांना कायमचा द्यावा लागला. १७७६ सालींच जर नाना फडणवीसानें हा तीन लक्षांचा मुलूख इंग्रजांना दिला असता, तर कांहीं मोठेसे अवघड नव्हतें. यावरून वडगांवच्या लढाईची आपत्ति नवीन उत्पन्न करण्याचें श्रेय नानाच्याच अविचाराला द्यावें लागतें.

प्रो. चिंतामण गंगाधर भानु ह्यांनीं " नाना आणि महादजी " असें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. ह्या पुस्तकांत महादजी आणि नाना ह्या दोघांच्या कर्तबगारीची तुलना केली आहे. आणि त्यांत नाना मात्र इमानी नोकर, आणि महादजी बेइमानी अशा प्रकारचें वर्णन केले आहे. प्रो. भानु हे इतिहास ह्या विषयाचे प्रोफेसर असल्यामुळें त्यांच्या पुस्तकाची सर्वत्र वाहवा झाली. परंतु आतां असा पुरावा उजेडांत आला आहे कीं, नानापेक्षां महादजी शिंदे ह्याचीच कर्तब-गारी मराठी साम्राज्याच्या उपयोगी जास्त पडली. वडगांवच्या लढाई नंतर साडेतीन वर्षेपर्यंत महादजी शिंदे हा मध्य हिंदुस्थानांत, राघोबाच्या तर्फेनें जे इंग्रज लढाई चालवीत होते त्या इंग्रजाशीं लढण्यांत गुंतला होता, आणि पैसा, दारूगोळा आणि लढणारें सैन्य याबाबतींत महादजी अत्यंत बेजार झाला. आणि महादजी आणि वॉरन् हेस्टिंग्ज हे दोघेही आपापल्यापरी अगदीं रडकुंडीला आले. त्याचा परिणाम सालबाईच्या तहानें दोन्ही पक्षांतील शत्रुत्व कायमचें मिटलें.

नानाचा अधिकार योग हें पुस्तक मिरजेचे विद्वान शास्त्री वासुदेव वामन खरे यांनीं प्रसिद्ध केलें आहे. त्या पुस्तकाची जरी सर्वत्र वाहवा झाली तरी नानांची वाईट कृत्यें हल्लीं ज्याप्रमाणें व्यवस्थित रीतीनें मांडता येतील तशी त्या पुस्तकांत कांहीं सोय केलेली नाहीं.

नाना फडणवीस याचा जन्म होण्यापूर्वीं शंभर वर्षांपासोन हिंदुस्थानांतील शूर शिलेदार वर्गामध्यें असा एक दंडक पडला होता कीं पैसा मिळविण्यामध्यें पाप किंवा पुण्य याचा मुळीच विचार करावयाचा नाहीं. मारेकऱ्यांचे काम भाडोत्री वेतन घेऊन करणें व श्रीमंत होणें हा एक फायदेशीर धंदाच होऊन बसला होता. छत्रपती शिवाजीनें दक्षिणचा सुभेदार औरंगजेब यास मदत करण्याचें कबूल करून १६५६ सालापूर्वीच विजापूरच्या सैन्याचा पराभव केला होता, पुढें कांहीं वर्षांनीं विजापूरच्या बादशहास भाडोत्री मदत करून सुभेदार औरंगजेब याच्या सेनापतीचा दक्षिणेंत पराभव केला होता. सन १७५३ साला नंतर मेवाड, मारवाड प्रांतामध्यें शिंदे–होळकर यांनीं मोठमोठीं सैन्यें नेऊन हेच धंदे आरंभिले होते. नागोर शहरांत विजयसिंहाला कोंडून जेर करण्याकरितां विरुद्धपक्षाकडून एक कोट रुपये घेतले होते. जयपूरकर ईश्वरसिंग व माधवसिंग यांना भाडोत्री मदत करून एकदा एका पक्षाला व पुन्हा दुसरे वेळीं दुसरे पक्षाला मदत करण्याचें कबूल करून रक्तपात जास्त होतील असे धंदे आरंभिले होते. ईश्वरसिंग यानें विष प्राशन करून आत्महत्या केली व माधवसिंगाकडून मल्हाररावाच्या हातावर तुरी देऊन त्यास चांगलेच फसविले व तीन हजार मराठा घोडेस्वारांची कत्तल झाली हा त्यातलाच प्रकार होता. सुमेरसिंग गारदी मारेकऱ्यानें नारायणराव पेशव्याचा खून केला व दुसरेच दिवशीं राघोबा दादानें एक लाख रुपये सुमेरसिंग यास देवविले. सन १७७५ सालाचे सुमारास अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला यानें वारन् हेस्टिंग्जच्या उत्तम तोफखान्याच्या मदतीनें रोहिले लोकांचा फडशा पाडला अशी शेंकडो उदाहरणें मराठेशाहीत घडून आली. एकंदरीत भाडोत्री मारेकऱ्यांचा धंदा त्यावेळीं फार फायदेशीर होता.

बडोदें येथील गायकवाड घराणें

बाळापूर अकोल्याच्या लढाईपूर्वीं खंडेराव दाभाडे सेनापती ह्यांच्या घोडदळांत दमाजीराव गायकवाड हे एक सामान्य शिलेदार होते. सबब तेथपासून इ. स. १८०२ सालीं इंग्रजाबरोबर गायकवाडांनीं तैनाती फौजेचा तह खंबायत मुक्कामीं केला तेथपर्यंत गायकवाडांची तेजस्वी कारकीर्द फक्त ८२ वर्षांची झाली. खंबायतच्या तहानंतर इतर संस्थानिकाप्रमाणें गायकवाडही निस्तेज बनले. बाळापूर

अकोल्याची लढाई जी सय्यद बंधूच्यावतीनें जिंकली गेली त्यांत दमाजीराव गायकवाडांचें असमान्य धैर्य दिसून आलें. आतां पराभव खास होणार आणि मराठ्यांची लांडगेतोड होणार, त्याअर्थी एकदां नशिबाची परीक्षा पाहून मारूं किंवा मरूं ह्या ईर्षेनें शत्रूवर उलटून चाल केली, त्यामुळें एकट्या दमाजीरावानें शाहू छत्रपतीच्या अब्रूचें रक्षण केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. डभोईच्या लढाईच्या वेळीं दाभाडे सेनापतींच्या हाताखालचे सरदार म्हणून पेशव्याशीं लढतांना पिलाजीराव गायकवाडाचा मुलगा सयाजी हा मरण पावला, त्यावेळीं तसें करणें गायकवाडास भागच होतें. आपल्या सैन्यांतील सरदारांची कर्तबगारी ओळखून त्यांना योग्य किताब देणे ह्या कामांत शाहू छत्रपति फार कुशल होता, त्यामुळें बाळापूर अकोल्याच्या लढाईनंतर गायकवाडांना सेनापतीचे दुय्यम म्हणून सेनाखासखेल समशेर बहाद्दर हे किताब दिले ते यथायोग्यच झालें. त्यानंतर उत्तम घोडदळ ठेवल्यामुळें गायकवाडांच्या सरंजामाची भरभराट झाली. एके प्रसंगीं खानदेशांत मुसलमान शत्रूशीं लढत असतांना शत्रूचें सैन्य दुप्पट मोठें आहे सबब ह्याला फसविण्याला काय युक्ति करावी ह्या बाबतींत गायकवाडांनीं जें प्रसंगावधान दाखविलें तें खरोखर लोकोत्तर होतें. शत्रू जवळ आला नाहीं त्या अवधींत, आपल्या घोड्यांचे नाल उलटे मारून खिळ्यांनीं पक्के करून घोड्याच्या नालाच्या खुणावरून शत्रूला कसें चकविलें हें इतिहासांत प्रसिद्ध आहे. म्हणजे आपल्या बचावाकरितां गायकवाडी स्वार जर दक्षिणेकडे गेले तर नालांच्या खुणावरून ते उत्तरेकडे गेले अशी शत्रूची फसगत झाली. गायकवाडांचे घोडदळांत सैन्यभरती पश्चिम खानदेश, बागलाण आणि नाशिक ह्या प्रांतांतून होत असल्यामुळें तापी नदीच्या कांठीं सोनगड डोंगरी किल्ला आहे त्याच ठिकाणीं मुख्य लष्करी ठाणें गायकवाडांना ठेवावें लागें. पुढें सन १७२४ सालीं मुसलमान सुभेदारांपासून तटबंदीचें शहर बडोदें हें जिंकून घेतलें तेव्हांपासून उत्तरेकडे राज्यविस्तार करण्याला सोईचें पडूं लागलें. कडिप्रांतांतील रजपूत फार दंगेखोर आणि काठेवाडांतील वाघेरे कोळी लोक पेंढारी लोकाप्रमाणें लूटमार करण्यांत फार कुशल, ह्यामुळें गायकवाडांना आपलें लष्करी ठाणें पाटण आणि कडी या ठिकाणीं ठेवावें लागलें. त्या बाजूच्या सर्व आडदांड लोकांना गायकवाडी स्वारांनीं झोडपून काढून वठणीवर आणिलें, सबब मराठी साम्राज्याच्या वायव्य बाजूच्या शत्रूंचा बंदोबस्त एकट्या गायकवाडांनीं केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. जसजसें पेशव्यांचें वजन वाढत गेलें तसतशी गायकवाडांची पेशव्याशीं स्पर्धा वाढत गेली हें साहजीकच झालें. पेशव्यांनीं आपले जामात म्हणजे इचलकरंजी येथील व्यंकटराव नारायण घोरपडे ह्यांचें घोडदळ नेहमीं सातारा येथें ठेवून हुजूर कामगिरीवर एक सरदार कायमचा नेमिला होता, त्याप्रमाणें दमाजीराव गायकवाड ह्यांनींही आपला सतरा वर्षांचा मुलगा गोविंदराव यास हुजूर कामगिरीकरितां सातारा येथें कायमचे ठेवण्याचा

सन १७४७ सालीं प्रयत्न केला. परंतु त्यांचें घोडदळास पैशाचा पुरवठा बडोद्याहून करण्यासारखी खजिन्याची स्थिति नव्हती त्यामुळें हें काम घडून आलें नाहीं ! जोंपर्यंत शाहू आणि उमाबाई दाभाडे जिवंत होती तोपर्यंत गायकवाडांना गुजराथ प्रांताचा स्वतंत्र अंमलदार म्हणतां येत नव्हते. कारण उमाबाई दाभाडे इचा मुख्य सरदेशमुखीचा हक्क म्हणून गुजराथ प्रांताबद्दल दाभाड्यांना खंडणी-दाखल रोख रक्कम गायकवाडाकडून पोंचत होती. शाहू छत्रपति वारल्यानंतर मराठी साम्राज्याचा सर्व अधिकार पेशव्याकडे आला. अशा प्रकारे जी सनद झाली होती ती सनद ज्या ज्या माणसांना आवडली नाहीं तीं माणसें ताराबाई, रघुजी भोसला, दमाजी गायकवाड आणि तुळाजी आंग्रे हीं होत. ह्या राज्यक्रांतीनंतर दमाजीराव आपलें सैन्य घेऊन ताराबाईला मदत करण्याकरितां सातारा येथें आले. परंतु पेशव्यांचें सैन्यबल मोठें होतें त्यामुळें शहराशेजारी गेंडा माळ म्हणून जागा आहे त्या माळावर पेशव्यांच्या सैन्यानें दमाजीरावाचा पराभव केला आणि दमाजी-रावाला कैद केलें. व दोन वर्षेपर्यंत गायकवाडांचे सरंजामाचे हक्क जप्त करण्यांत आले. परंतु तुळाजी आंग्र्यापेक्षां दमाजीराव फार हुशार आणि दूरदर्शी यामुळें बलिष्ठापुढें नमतें घेऊन पेशव्याशीं मित्रत्वाचा तह केला आणि त्या तहाच्या शर्ती शेवटपर्यंत पाळल्या. त्या तहानें गुजराथेंत जो प्रदेश गायकवाड जिंकतील त्यांतील निम्मा प्रदेश पेशव्यास दिला पाहिजे व पेशवे बोलावतील तेव्हां १० हजार घोडदळ घेऊन कामगिरीवर आलें पाहिजे. ह्या प्रकारें कोणत्या कोणत्या कामगिरीवर गायकवाडांना जावें लागलें त्या लढायांची यादी थोडक्यांत देतां येईल. म्हणजे उदगीरची लढाई, पानिपतची लढाई, राक्षसभुवनची लढाई, खर्ड्याची लढाई; ह्या खेरीज १७६७ सालापर्यंत माधवराव बल्लाळ पेशव्याच्या बोलावण्याप्रमाणें दमाजी-राव गायकवाडांना हैदरअल्लीवरील लढायांत सुद्धां हजर रहावे लागे. गायकवाडी दप्तरांतील कागद अजून पूर्णपणें प्रसिद्ध व्हावयाचे आहेत, ते प्रसिद्ध झालें म्हणजे ह्यापेक्षां अधिक लढायांचीं नांवें देखील तपशीलवार देतां येतील. पुणें येथील बारभाईच्या कारस्थानांत गायकवाड बंधु एकदा एका पक्षाला तर दुसऱ्या वेळीं दुसऱ्या पक्षाला अशी जी धरसोड त्यांच्या हातून झाली, त्यांचीं कारणें निराळीं आहेत. माधवराव बल्लाळ पेशवे आणि राघोबादादा ह्या चुलत्या पुतण्यांच्या भांड-णांत बहुतकरून दमाजीराव आणि गोविंदराव गायकवाड हे राघोबादादाच्या पक्षाकडून लढलेले आहेत. १७६० सालीं सदाशिवरावभाऊ पेशव्यांनीं कुंज-पुऱ्यावर चाल करून, तोफांचा मारा करून तटाला खिंडार पाडलें, ही फार धुमश्चक्रीची लढाई झाली. त्या खिंडारांतून मराठ्यांनीं आंत प्रवेश केला त्यांत दमाजीराव गायकवाडांच्या घोडदळाचा पहिला नंबर होता. पेशव्यांनीं गायकवाडाशीं वागतांना नेहमीं सावत्र मुलाप्रमाणें वागणुक ठेविली, यांमुळें गायकवाडांना मराठ्यांच्या जुटामधून प्रथम फुटून वेगळें व्हावें लागलें,

हें बरोबरच झालें, असा पुरावा आतां उजेडांत आला आहे. १७७५ सालीं एप्रिल महिन्यांत मही नदीच्या कांठीं अडास येथें जी मोठी लढाई झाली त्या लढाईंत एका बाजूस राघोबादादा पेशवे, गोविंदराव गायकवाड आणि सुरत येथील इंग्रजी सैन्य, आणि दुसऱ्या बाजूस, म्हणजे सवाई माधवरावाच्या पक्षाचा जो बारभाई समूह त्या बाजूनें लढण्याला हरीपंत फडके, फत्तेसिंग गायकवाड आणि महादजी शिंदे व दुसरे लहान सरदार होते. या अडास येथील लढाईंत राघोबादादा पेशव्याचा जरी पूर्णपणें पराभव झाला तरी विरुद्ध बाजूनें शिंदे यानें अंगचोरपणा केला. सबब हरीपंत फडके आणि फत्तेसिंग गायकवाड ह्या दोघांनाच जास्त मेहनत करावी लागली. इमानानें काम करून देखील आपल्या कामाचें चीज होत नाहीं असें फत्तेसिंग गायकवाडानें जेव्हां पाहिलें तेव्हां १७८० सालीं तो उघडपणें राघोबादादा पेशवा आणि गॉडर्ड सेनापती ह्यांना मिळाला. गायकवाडांच्या सावत्र भावांत ज्येष्ठ पुत्र कोण, ह्या मुद्यावर २४ वर्षेंपर्यंत जें रण माजलें त्या भांडणाला मूळ कारण पेशवे हेच होत. त्यावेळीं पेशव्यांच्या दरबारी रामशास्त्री प्रभुण्यासारखा हुशार मनुष्य सर न्यायाधीश होता, त्याला उत्तम संस्कृत येत होतें. आणि तो उत्तम शास्त्र जाणत होता. असें असून शास्त्र वचन पाहून गोविंदराव गायकवाडाकडे ज्येष्ठत्त्व येत नाहीं हें शास्त्रांत थोडें डोकें घातलें, तर तेव्हांच दिसून येईल. ज्या सरदाराला पुष्कळ बायका आहेत आणि त्या बायकांना निरनिराळ्या वेळीं मुलगे झाले तर, शास्त्रांत नियम असा आहे कीं, बापानें ज्याचें तोंड प्रथम पाहिलें तो मुलगा ज्येष्ठ. गोविंदराव गायकवाडाचा भांडणाचा मुद्दा असा होता कीं, वडील बायकोचा मुलगा गोविंदराव सबब दमाजीरावाच्या पश्चात् सरंजाम ज्येष्ठत्त्वाच्या नात्यानें गोविंदरावाकडे यावयास पाहिजे. परंतु सयाजी आणि फत्तेसिंग हे वयानें गोविंदरावापेक्षां वडील होते. त्या अर्थी गोविंदरावांचा नंबर तिसरा येतो. मानाजीराव मात्र सर्वांत धाकटे म्हणजे चौथ्या नंबरचे होतें. शास्त्र वचनाचा माधवराव बल्लाळ पेशवे आणि रामशास्त्री प्रभुणे ह्यांनीं अर्ध्या घटकेपर्यंत विचार केला असता तरी गोविंदरावाचे भांडण वावगें होतें, हें तेव्हांच दिसून आलें असतें. असें झालें असतें तर, ह्या सावत्र भावांचा झगडा २४ वर्षेंपर्यंत जो झाला तो झालाच नसता. पुढें १७९० सालीं फत्तेसिंग वारल्यावर वास्तविकपणें मानाजीरावाच्या अगोदर गोविंदरावाचा हक्क होता, परंतु त्यावेळीं गोविंदराव निर्धन होते आणि मानाजीरावाच्या हातांत गुजराथ प्रांताचा वसूल होता. सबब नाना फडणवीसानें मानाजीरावाजवळून नजराण्याची रक्कम घेऊन गोविंदरावाऐवजी मानाजीरावाला सरंजामाची वस्त्रें देवविली. ही नजराण्याची बाबद अशी आहे कीं, पेशव्यांनीं हा नियम सर्व सरदारांना सरसकट लागू केला नव्हता. जो सरदार गैरमर्जीतला किंवा दुर्बळ असेल त्याच्यापासून संस्थानच्या उत्पन्नाचा एक वर्षांचा वसूल नजराणा म्हणून घेण्यात येत असे. १७९० सालीं मानाजी-

रावाकडून असा नजराणा घेण्यांत आला. व नंतर अडीच वर्षांनीं गोविंदरावाकडून तितकीच रक्कम नजराण्याबद्दल मागितली आणि शिवाय मानाजीरावाच्या वेळेला थकलेली बाकी ३६ लाख रुपये गोविंदरावांनीं दिलीच पाहिजे असा आग्रह धरिला. गोविंदराव गायकवाड २४ वर्षेपर्यंत सावत्र भावाशी भांडत राहिले ह्यामुळें निर्धन होते. खेरीज कोणत्याही सावकाराकडून कर्ज काढल्याशिवाय नजराण्याची रक्कम सवाकोट रुपये पेशवे ह्यांना देणें म्हणजे अत्यंत मोठें संकट होतें. त्यावेळीं पैसा फार महाग होता, आणि सवालाख रुपये देखील कर्ज गोविंदरावास कोणी सावकार देणार नाहीं अशी स्थिति असतांना, पेशव्यांनीं जबरदस्तीनें गोविंदरावा॰ कडून दीड कोट रुपये वसूल केले. हें कर्ज फेडण्याचें काम पुढें सात वर्षांत देखील आटोपलें नाहीं. यामुळें गोविंदराव यांची शेवटची सात वर्षे अत्यंत निर्धन अवस्थेंत गेलीं. गायकवाड सरदार हे किती बाणेदार होते ह्याचें उदाहरण इ. स. १७७६ सालीं एक प्रकार घडला त्यावरून येईल. १७७६ सालीं पेशवे आणि इंग्रज ह्यांच्यामध्यें पुरंदरचा तह झाल्यानंतर मुंबईच्या इंग्रजांनीं गोविंदरावास अशी मसलत दिली कीं, पुरंदरच्या तहामुळें यापुढें आम्हाला राघोबादादा पेश॰ व्याला मदत करतां येणार नाहीं. परंतु गोविंदराव गायकवाडाला मदत करून फत्ते-सिंगापासून आम्हीं तोफखान्याच्या जोरावर बडोदें शहर जिंकून घेऊं आणि त्यांत गोविंदरावाला स्थानापन्न केले, तर पुरंदरचा तह आमच्या आड येणार नाहीं. गोविंदरावांनीं इंग्रजांना असें बाणेदारपणाचें उत्तर दिलें कीं, " तुम्ही फत्तेसिंगा-जवळून बडोदें शहर जिंकून घ्याल ह्यांत कांहींच शंका नाहीं. परंतु तें शहर मला द्याल असा विश्वास मला कसा यावा ? बडोद्यासारखें तटबंदीचें शहर एकदां इंग्रजांच्या मगरमिठींत सांपडलें म्हणजे तें पुन्हां मला मिळणें अशक्य. तुम्ही मला बडोद्याऐवजीं नवसारी, पेटलाद, चांपानेर किंवा डभोई यासारख्या शहरीं मला आपली नवी राजधानी करण्यास सांगाल, व बडोदें शहर तुम्ही कायमचे बळकावून बसाल, तुमच्यापासून बडोदें शहर जिंकून घेणें मला अशक्य होईल. " ज्यावेळीं गोविंदरावाच्या खिशांत पांच रुपये सुद्धां नव्हते अशा वेळीं गोविंदरावानें हें केवढें बाणेदारपणाचें उत्तर दिलें ? ह्यांचें कारण गोविंदरावानें श्रमसाहस आणि विपत्ति भोगिली होती, त्यामुळें त्याच्या विपत्तीनें शाहणे केलें होतें. वडगांवच्या तहानंतर राघोबादादाच्या विरुद्ध आणि इंग्रज सैन्याच्या विरुद्ध पेशव्यांच्या वतीनें मध्य हिंदुस्थानांत महादजी शिंदा साडेतीन वर्षेपर्यंत लढत होता. त्याला मदत करण्याला ज्या शूर सरदारांची मदत पाठपुरावा करण्याकरितां नाना फडणीस करवीत होता, त्यामध्यें १७८० सालीं आक्टोबर महिन्यांत गोविंदराव गायकवाडांना देखील " आपलें घोडदळ घेऊन महादजीच्या मदतीला जा " असें पत्र नवीन उजेडांत आलें आहे. त्यावेळीं गोविंदराव गायकवाडांचा मुक्काम मही नदीच्या उत्तरेस होता सबब मही नदीचें पाणी कमी होऊन वाट मिळाल्या-

बरोबर मी आपलें सैन्य घेऊन तावडतोब महादजीच्या मदतीला जातों असें उत्तर गोविंदरावाकडून आलेलें आहे. बारभाईचें कारस्थान सुरूं झाल्यापासून फत्तेसिंग गायकवाड नाना फडणवीसाचे बाजूला होते. परंतु १७८० सालीं फत्तेसिंग गायकवाड राघोबादादाचे पक्षाला मिळून, अहमदाबादेनजिक जनरल गॉडर्ड ह्यास मदत करीत होते. ही बातमी नानाला समजण्यास उशीर लागला ह्यामुळें नानानें गोविंदरावाला आपल्या बाजूला वळविण्याकरितां हें पत्र लिहिलेलें आहे. १७८२ सालीं फत्तेसिंग गायकवाडानें जेव्हां असें पाहिलें कीं, बारभाईचें कारस्थानाचा शेवट लवकर होत नाहीं, आणि सुरतेच्या इंग्रजांनीं जर गायकवाडी मुलुखावर हल्ला केला तर नाना फडणीसाच्या पक्षाकडून आपल्या मदतीला पुण्याहून सैन्याची कुमक येण्याचा संभव नाहीं. त्यामुळें फत्तेसिंगानें इंग्रजाशीं एक गुप्त तह केला कीं, " आम्ही बारभाईचे पक्षाला मदत करणार नाहीं आणि इंग्रजांनीं गोविंदरावाला मदत करूं नये. " ह्या अटीवर तापी नदीच्या दक्षिणेला जितका गायकवाडाचा मुलूख आहे तितका सर्व इंग्रजांना बक्षिस द्यावा." ह्या गुप्त तहाचीं बातमी काढण्यात नाना फडणीस फार हुशार असल्यामुळें, त्यानें गव्हर्नर जनरल ह्यास स्पष्ट कळविलें कीं, गायकवाड आमच्याच पुढ्यांत आहेत. त्याअर्थी इंग्रजांना परभारें गायकवाडाशीं तह करतां येत नाहीं. असा तह तुम्ही केला तर, सालबाईचा तह तुम्ही मोडला असें आम्ही समजूं व पुन्हां आपलें दोघांचें शत्रुत्व सुरूं होईल. वॉरन हेस्टिंगला ह्या शत्रुत्वाचा कंटाळा आला होता. सबब गायकवाडाशीं हा झालेला तह रद्द करण्यांत आला. व अशा रीतीनें तापी नदीच्या दक्षिणेकडील गायकवाडांच्या मुलुखाचा बचाव झाला. १७९५ सालीं खर्ड्यांच्या लढाईंत मराठ्यांच्या भगव्या झेंड्याखालीं सर्व मराठे सरदार एकजुटीनें निजामाशीं लढले. त्या लढाईंत गोविंदराव गायकवाड सुद्धां पांच हजार घोडेस्वार घेऊन पेशव्यांच्या मदतीला गेले होते. गायकवाड सरदार मराठ्यांच्या जुटामधून कां फुटलें त्याचीं कारणें पुढें दिल्याप्रमाणें आहेत. सवाई माधवराव पेशवा मेल्यानंतर सर्वत्र बंडाळी निर्नायकी आणि लूटमार जाळपोळ सुरू झालीं. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. अशी स्थिति सुरूं झाली. नाना फडणीसाच्या वशिल्याचा आबा शेलूकर हा अहमदाबाद येथील पेशव्यांचा सुभेदार होता. तो पुणें येथें राहून अहमदाबाद प्रांताचा मुलकी अंमलदार म्हणून कामगिरी करीत असे. १७९८ सालीं आबा शेलूकर ह्याला दौलतराव शिंद्यानें पुणें मुक्कामीं प्रथम कैद केलें. आणि नंतर त्याच्यापासून दंड वसूल करून सोडून दिले व अहमदाबादेस जाऊन जमीन महसुलाचे पैसे वसूल करून पेशव्यांच्या खजिन्यांत पाठविण्याकरितां त्याला दौलतराव शिंद्यानें गुजराथेंत पाठविलें. त्या आबा शेलूकरानें गुजराथेंत जाऊन पेशव्यांचा मुलूख व गायकवाडांचा मुलूख ह्या दोन्ही मुलुखांत लुटालूट सुरूं केली. यामुळें सर्व प्रजा हैराण होऊन गेली. नंतर गायकवाडांचा

सेनापती बाबाजी अप्पाजी फणसे हा सैन्य घेऊन अहमदाबाद शहरावर स्वारी करून आबा शेलूकराला त्यानें कैद केले. आणि बोरसद येथील तुरुंगांत कैदेंत टाकलें. कान्होजीराव गायकवाड हा गोविंदरावाचा ज्येष्ठ पुत्र परंतु त्याची आई धर्मपूर संस्थानच्या रजपूत राजाची मुलगी. मराठा जातीच्या स्त्रीच्या पोटीं कान्होजीरावाचा जन्म झाला नाहीं एवढ्याच सबबीवर इतर मराठे सरदार कान्होजीरावाला अनौरस पुत्र म्हणून त्याची जात-कुळी हलकी सबब त्याला कमी लेखूं लागले. सबब कान्होजीराव बापाच्या हयातींत बंड करून गायकवाड रयतेची लूटमार जाळपोळ करूं लागला. गायकवाडी खजिन्यांत जमीन महसूल येईना व कर्ज फिटेना. सर्वत्र बंडाळी होऊं लागली आणि अरब सैन्याचे पगार पुष्कळ थकले. सबब ह्या बंडाळींत अरबसुद्धां सामील झाले. गोध्रा, पंचमहाल जिल्ह्यांत शिंद्यांचा अंमल होता. दौलतराव शिंद्याशी यशवंतराव होळकराचें मोठें शत्रुत्व सुरू होते. त्यामुळें यशवंतराव होळकरानें पंचमहाल जिल्ह्यांत जी लूटमार, जाळपोळ चालविली होती त्याची झळ गायकवाडी मुलुखालाही लागत होती. हल्लीं जशा संस्थानाच्या हद्दी नक्की करण्यांत आल्या आहेत तशा त्यावेळीं नव्हत्या. त्यामुळें या यशवंतराव होळकराच्या अत्याचाराविरुद्ध कोणाकडे फिर्याद न्यावी आणि दाद लावून घ्यावी अशी सोय नव्हती. गोविंदराव महाराज गायकवाड १८०० सालीं नोव्हेंबर महिन्यांत मृत्यु पावल्यावर, कडी येथील त्यांचे पुतणे मल्हारराव गायकवाड यांनींही सैतानी लीला सुरू केल्या. इतक्या सर्व संकटामुळें त्याचवेळीं गायकवाडी राज्य नष्ट झालें असतें, परंतु त्यावेळचे हुशार दिवाण रावजी आप्पाजी फणसे यांनीं इंग्रजाबरोबर तैनाती फौजेचा तह १८०२ सालच्या जून महिन्यांत केल्यामुळें गायकवाडी राज्याचा बचाव झाला. पुणें येथें देखील त्यावेळीं पेशवे यांच्या दरबारांत सर्व प्रकारें अंदाधुंदी झाली होती. अशा रितीनें गायकवाडांना मराठ्यांच्या जुटांमधून फुटून स्वतंत्र तह करावाच लागला. १८०५ सालीं कान्होजीराव गायकवाडाच्या सैतानी लीला बंद पाडण्याकरितां इंग्रजांनीं कान्होजीला गलबतांत घालून मद्रास इलाख्यांत पोंचविला व तेथें बंदिखान्यांत ठेविला. यामुळें गायकवाडी राज्यांत निरंतर शांतता नांदू लागली. दमाजीराव गायकवाडानें पानिपतच्या मोठ्या पराभवाचे वेळीं देखील इमानानें पेशव्यांना मदत केली होती. परंतु सदाशिवराभाऊ पेशव्यानें आपलाच हेका चालविला, ह्यामुळें दुसऱ्या कोणाही मराठा सरदारांचा इलाज चालला नाहीं. पानिपताच्या युद्धांत दमाजीरावाबरोबर गेलेलें दहा हजार सैन्य कत्तलीमुळें मेलें किंवा उपासमारीनें मरून गेलें. फक्त एका शिलेदारासह वर्तमान दमाजीराव यांनीं धांवपळ करीत आपलें राज्य गांठलें. व श्रम साहसामुळें त्यांचा चेहरा इतका काळवंडून गेला होता कीं, कडी प्रांतांतील एका ठाण्यांत ते स्वतः येऊन पोहोंचलें, त्या वेळीं त्यांच्याच हाताखालच्या ठाणेदारानें मालकाला देखील ओळखिलें नाहीं.

ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांच्या तपःसंपन्नतेमुळें जशी शाहू महाराजांची भक्ति त्यांच्यावर बसली होती तशीच दमाजीरावांचीही त्या स्वामीवर भक्ति होती. नर्मदेच्या उत्तरेला माळव्यांत धार संस्थानच्या पवारांची आणि गायकवाडांच्या मुलुखांची हद्द ह्या दोन्ही जवळ जवळ येतात. त्या हद्दींमुळें पवारांचा आणि दमाजीरावांचा जेव्हां तंटा सुरू झाला, तेव्हां तें प्रकरण लढाईपर्यंत आलें. ह्या प्रकरणांत गायकवाडांची फत्ते होईल असें आशिर्वाद पत्र ब्रह्मेंद्रस्वामींनीं दमाजीरावाला पाठविलें. त्याप्रमाणें फत्ते झाल्यानंतर, त्यावेळीं पैशाची इतकी टंचाई असून देखील दमाजीरावांनीं ब्रह्मेंद्रस्वामींना भुलेश्वर मंदिराचें जीर्णोद्धाराकरितां २५ हजार रुपये बक्षिस दिले. हें भुलेश्वराचे मंदिर पुरंदर तालुक्यांत आहे. दरसाल १२ शें रुपयांची भिक्षा दमाजीरावाकडून ब्रह्मेंद्रस्वामींना पोचविली जात होती. पुढें ह्याच बाराशें रुपया ऐवजीं दमाजीरावाचे नातू आनंदराव गायकवाड यांनीं ब्रह्मेंद्रस्वामीच्या संस्थानाला एक इनाम गांव कायमची सनद करून दिला. तो सियादा नांवाचा इनामी गांव अद्यापि त्या संस्थानाकडे चालत आहे व तो सुरत जिल्ह्यापैकीं चिखली तालुक्यांत आहे.

गायकवाडांचें घोडदळ इतकें जबरदस्त होते, आणि कडीप्रांतांतील आडदांड रजपूत लोकांना इतकी दहशत त्या घोडदळाची होती कीं, ४५ वर्षांपूर्वी इंग्रजी अमदानींतील एक उदाहरण दिलें म्हणजे त्यासंबंधी खात्री होईल. अहमदाबाद जिल्ह्यापैकीं प्रांटीज तालुका आणि मोडेसा पेटा महाल हे ब्रिटिश हद्दींतील भाग अशा ठिकाणीं आहेत कीं, त्यांच्या चारी बाजूंनी गायकवाड सरकारची हद्द लांबवर पसरलेली आहे. सादरा येथें पोलिटिकल एजंटाचें ठाणें आहे, व तेथें पूर्वी गायकवाड सरकारचे एक हजार घोडेस्वारांची पलटण इंग्रजांना मदत करण्याकरितां ठेवण्यांत आली होती. अहमदाबादेहून प्रांतीजकडे जाण्याला त्यावेळीं रेल्वे नव्हती. सबब कोणीहि युरोपियन अंमलदार प्रांटीज मोडेसा या भागांत जाऊं लागला तर त्यास कडीप्रांतांतील आडदांड लोक ठार मारून टाकीत. यामुळें युरोपियन अंमलदारांना त्या अडदांड लोकांची इतकी दहशत बसली होती कीं, सरकारी कामानिमित्त प्रांतीज मोडेसा या भागांत युरोपियन अम्मलदार जात असत, ते प्रथम पोलीटिकल एजंट मार्फत लिहून गायकवाडी घोडेस्वार बरोबर घेऊन गेल्याखेरीज कोणत्याही युरोपियनाची तिकडे जाण्याची छाती होत नसे. ही फार गैरसोयीची गोष्ट होती, त्यामुळें जेव्हां सर्व पोलिटिकल एजंटांची सभा झाली, तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानसरकारला अशी सूचना केली कीं, प्रत्येक वेळेला गायकवाडी घोडेस्वाराची मदत घेण्याऐवजीं अहमदाबाद आणि सादरा येथें असणारे पोलिस खात्याचे घोडेस्वार हे जरी ब्रिटिश सरकारचे नोकर असले, तरी त्यांना गायकवाडी घोडेस्वारासारखा युनिफॉर्म करण्याला मंजुरी दिली, म्हणजे हे आडदांड लोक त्या पोषाखावरून फसले जातील. ह्या कामाला

हिंदुस्थानसरकारची मंजुरी मिळाली. हल्लीं बडोदे येथें असलेले हुजुरात पलटणीचे घोडेस्वारांचा जसा पोषाख आहे तसा त्यावेळीं इंग्रजी पोलीसखात्याच्या माउंटेड पोलीसचा ठरविण्यांत आला.

ह्या एकंदर गायकवाडांच्या कर्तबगारीवरून गायकवाडासंबंधीं आपल्या इतिहासाच्या द्वितीय खंडांत राजवाडे इतिहासकार यांनीं जे तुच्छता दर्शक वर्णन केलें आहे तें चुकीचें आहे हें ध्यानांत येईल. राजवाडे यांनीं लिहिलेले उद्गार पुढीलप्रमाणें आहेत. "कोणतेही महत्त्वाचे कार्य बडोद्याच्या गायकवाडांनीं केलें नाहीं. दाभाडे ह्यांची शागीर्दी करून गुजराथ प्रांतांतील दिल्लीच्या बादशहाचा मालकी हक्क बुडविला. पेशवे यांची शागीर्दी करून दाभाडे यांचा मालकी हक्क बुडविला. आणि इंग्रजांची शागीर्दी करून पेशव्यांचा मालकी हक्क बुडविला." हें सर्वथैव चुकीचें आहे. वास्तविक गायकवाडांच्या शौर्याचा इतिहास पेशवे, शिंदे, होळकर आणि नागपूरकर भोसले यांच्या बरोबरीचाच आहे.

—०—

सातारचे छत्रपति प्रतापसिंह महाराज.

सन १८३९ साली ह्या छत्रपतीवर बंडाचा आरोप ठेवून त्यांना गादीवरून काढून टाकून काशी क्षेत्रीं पोंचविलें. त्या आरोपाबद्दल शहानिशा करणें जरूर आहे. बंगाल प्रांतांतील प्रोफेसर बसू यांनीं "खिश्चन राज्यकर्त्यांचा उदय" कशानें झाला याबद्दल इंग्रजींत पुष्कळ ग्रंथ छापून प्रसिद्ध केले आहेत. त्या ग्रंथांत छत्रपति प्रतापसिंह महाराज निर्दोष होते असें त्यानें दाखविलें आहे. परंतु त्यांच्या ग्रंथांत पुष्कळ चुकीच्या गोष्टी आहेत. १७७९ सालीं हैदरअलीनें मद्रासचा तह इंग्रजाशी केलेला मोडून टाकून आपण होऊन मद्रासेवर हल्ला केला. तसेंच १८५६ सालीं नरगुंद संस्थानचे राजे भास्करराव भावे यांनीं आपण होऊन इंग्रजाशीं शत्रुत्व पुकारलें. तसेंच १८४१ सालीं शीख लोकांनीं आपण होऊन इंग्रजी सैन्यावर स्वारी करून शत्रुत्व उत्पन्न केलें. त्याचप्रमाणें १८३७ सालापासून सातारा येथील सेनापती बाळासाहब भोसले यानें बंड करून इंग्रजांना झोडपून काढावें, अशी मसलत गादीवरच्या छत्रपतींना दिली. गादीवरच्या छत्रपतींच्या मनाचा दुर्बळपणा जास्त होता, यामुळें आपल्या हाताखालील लोक बंडाच्या मसलती करीत आहेत ही वाईट गोष्ट आहे, ह्याचा ताबडतोब बंदोबस्त केला पाहिजे इतकी कर्तबगारी प्रतापसिंगाच्या अंगीं नव्हती. पतंगानें दिव्यावर झडप घालून आपला नाश करून घ्यावा त्या सारखीच ही चार उदाहरणें आहेत म्हणजे हैदरअलीचे, शीखांचे, भास्करराव भावे यांचे व बाळासाहेब भोसले

सेनापती यांचें होय. १८३७ सालीं इंग्रजी राज्याचा विस्तार किती झाला होता व इंग्रजांचें सैन्य बळ किती मोठें होतें याची कल्पना ह्या अशिक्षित छत्रपतीला कोठून असणार ? हिंदुस्थानचा नकाशा देखील दाखविण्यासारखा सातारा राज्यांत कोणाजवळही नव्हता. ग्रँडडफ याचा इतिहास १८२६ सालीं प्रसिद्ध झाला होता त्याचीं भाषांतरें मराठी शाळेंतील विद्यार्थ्यांना वाचतां येतील अशी देखील त्यावेळीं तयार केलेली नव्हती. लिहिणें, वाचणें व हिशेब करणें ह्या तीनच कला ज्याला अवगत आहेत अशा इसमालाच त्यावेळीं विद्वान म्हणून समजण्यांत येत असे. सेनापती बाळासाहेब भोसले यानें नागपूरच्या भोसल्यांना पत्रे पाठवून साताऱ्यास बंड झालें तर सैन्याची मदत करा अशी विनंति केली होती. त्यावेळीं हल्लींसारखें टपाल खातें नव्हतें. १८३५ सालीं ब्रिटिश हद्दींत टपाल सुरू झालें होतें, परंतु तें सरकारी पत्रव्यवहारा पुरते होतें. त्यावेळीं सातारा हें संस्थान होतें यामध्यें टपालाची सोय मुळींच नव्हती. त्यावेळीं शांतता स्थापन झाली होती यामुळें रेशिमकांठी धोतरजोडे व लुगडीं नागपूर प्रांतांतून मुंबई पुणें या प्रांतांत पाठविण्याचा व्यापार उंटावरून चालत होता. व मुंबईकडचा माल उंटावरून नागपूर प्रांती जात होता. अशा मालाच्या गठ्ठयांतून बाळासाहेब भोसले यांची पत्रें नागपूरच्या भोसल्यांना पोंचविली गेली. परंतु नागपूर येथील संस्थानिकाची स्थिति १८३७ सालीं कशी होती याची कल्पना साताऱ्याच्या छत्रपतीला कोठून असणार ? नागपूर येथें देखील ब्रिटिश रेसिडेंट रहात असे आणि नागपूर संस्थानांपैकीं २६ लक्षांचा मुलूख इंग्रजांना तोडून दिला होता, व दत्तक पुत्र रघूजी भोसले यांचे रक्षण व त्याच्या संस्थानचे रक्षण करण्याची जबाबदारी इंग्रजांनीं घेतली होती. आणि त्या करितां इंग्रजांची सहा हजार तैनाती फौज नागपूर येथें ठेविली होती. साताऱ्याच्या छत्रपतीला कल्पना नव्हती कीं, सातारा आणि नागपूर यांत किती कोसांचें अंतर आहे. नागपूरचा राजा दुर्बळ आहे व त्यानें जरी साताऱ्याकडे सैन्य पाठविण्याचें मनांत आणिलें असतें, तरी किती राजांच्या हद्दींतून हें सैन्य साताऱ्यास येऊन पोंचणार ? आणि सातारा नागपूर या दोन्हो ठिकाणचीं सैन्यें एक झाली तरी, इंग्रजी सैन्याशीं लढाई करणें कितपत शक्य आहे, याचा मुळींच विचार केला नव्हता. नागपूरच्या दरबारी ही सातारा येथील पत्रें गेल्यावर त्यांनीं तीं पत्रें रेसिडेंटा मार्फत मुंबईच्या गव्हर्नरकडे पाठविली. त्यामुळें ह्या बंडाच्या चौकशीला सुरवात झाली. बाळासाहेब भोसले सेनापती यानें गोवे प्रांतांतील पोर्तुगीज गव्हर्नरकडे देखील अशींच पत्रे पाठवून इंग्रजाशीं लढण्याकरितां दारूगोळा विकत देण्याबद्दल विनंति केली होती. गोवें प्रांत जरी साताऱ्यापासून जवळ आहे तरी, त्यावेळीं पोर्तुगीज आणि इंग्रज हे मित्र होते आणि म्हणून असा दारूगोळा विकण्याचें त्यांनीं कबूल केलें नाहीं. त्यांनीं ह्या बंडाची पत्रें मुंबईच्या गव्हर्नरकडे पाठविली. यामुळें या बंडाच्या चौकशीला दुहेरी सुरवात झाली. दुसरी एक चूक

छत्रपतींनीं अशी केली होती कीं, राज्यांतील मोठ्या पगाराच्या जागा ब्राह्मणांना न देतांना प्रभू लोकांना देण्यांत आल्या होत्या. त्यामुळें अर्थात ब्राह्मण लोक नाराज होऊन पटवर्धन संस्थानांतून पोट भरण्याकरितां जाऊन भिक्षुकी वृत्ति करण्यास त्यांनीं सुरुवात केली होती. छत्रपतींनीं अग्निहोत्राच्या नेमणुका देखील ब्राह्मणांना न देतां प्रभू लोकांना दिल्या होत्या. या प्रभू गृहस्थापैकीं रंगो बापूजी नांवाचा एक हुषार माणूस छत्रपतींना मदत करीत होता. त्यानें अशी कैफियत तयार केली होती कीं छत्रपति निर्दोष आहेत. परंतु त्यांतील पुरावा चुकीचा होता. नाखूष झालेल्या ब्राह्मणांनीं अर्थात रेसिडेंटकडे खोट्यानाट्या तक्रारी करून सातारा संस्थानांत छत्रपतीकडून जुलूम होत आहे असे अनेक अर्ज मुंबई सरकारापर्यंत रवाना झाले, त्या अर्जांमुळें या बंडाच्या चौकशींत भर पडत गेली. याच सुमारास छत्रपतींचा धाकटा भाऊ शहाजी ऊर्फ आप्पासाहेब यांचें आणि प्रतापसिंहाचें वांकडे आलें होतें. हे आप्पासाहेब नैतिक अधःपाताचे बाबतींत शेवटच्या पेशव्याचे धाकटे भाऊ शोभतील अशी यांची पूर्ववयात कीर्ति होती. पुढें त्यांनीं आपली पुष्कळ वर्तणूक सुधारली आणि शेवटच्या नऊ वर्षांत आप्पासाहेबांची कारकीर्द प्रजेला सुखावह झाली. ह्या आप्पासाहेबांनीं रेसिडेंटाच्या बंगल्यावर जाऊन बाळासाहेब भोसले ह्याच्या बंडाची सर्व तपशीलवार हकीकत रेसिडेंटाला कळविली. परंतु त्यांनीं रेसिडेंटाकडून वचन घेतले होतें कीं, (१) माझ्या वडील भावाच्या जिवाला अपाय होता कामा नये. (२) त्याला गादीवरून काढल्या-नंतर मला गादीवर बसविले पाहिजे. (३) आणि जे लोक बंडाला मदत करण्याकरितां खेळखंडोबा करीत आहेत त्यांच्या घरावर रेसिडेंटानीं चौक्या पहारे ताबडतोब बसविले पाहिजेत. (४) मी गादीवर बसल्यानंतर माझ्या राज्यांत सती जाण्याची चाल सक्तीनें बंद करीन.

बाळासाहेब भोसले याला जेव्हां समजले कीं, बंडाचा कट रेसिडेंटाला कळून चुकला, तेव्हां त्यानें नागव्या तलवारी घेतलेले तीनशें घोडेस्वार राजवाड्या-समोर मैदानांत उभे केले. आणि छत्रपतीकडे दरबार हॉलमध्यें जाऊन त्यानें छत्रपतींची लेखी परवानगी मागितली कीं, बंडाला सुरुवात करण्याला तुम्ही हुकूम द्या. म्हणजे रेसिडेंटाच्या बंगल्यावर जाऊन कापाकापीला सुरुवात करतो. परंतु छत्रपतींनीं असा हुकूम दिला नाहीं. त्यांनीं बाळासाहेबाला आपल्या जवळ बसविले आणि चार उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या त्या अशा "आपल्या हांतून ही मसलत शेवटाला जाणार नाही. सातारा शहरांतील प्रजाजनांची विनाकारण कत्तल होईल. इंग्रजांचा जोर फार मोठा आहे, तूं आपल्या स्वारांना घरोघर निघून जाण्यास सांग. मी लेखी हुकूम देणार नाहीं." ही गोष्ट झाल्यानंतर ब्रिटिश रेसिडेंट छत्रपतींच्या राजवाड्यांत आले व लिहून आणलेली सर्व हकीकत कारकुनाकडून छत्रपतीना वाचून दाखविली. खेळखंडोबा

करणारे सर्व लोकांची नांवनिशीवार यादी छत्रपतींना वाचून दाखवून त्यांना असा प्रश्न केला कीं, ही बंडाची हकीकत खरी आहे किंवा नाहीं? छत्रपतींनीं सांगितलें कीं ही सर्व हकीकत खरी आहे, परंतु मी लेखी कबूली देणार नाहीं व त्याच्यावर सही देणार नाहीं. दोन घटकापूर्वींच मी बाळासाहेबाला असा उपदेश केला आहे कीं, तूं ह्या भानगडींत पडूं नकोस व बंडाचा विचार सोडून दे. ह्या बंडाच्या मसलती कित्येक महिने चालू होत्या तरी त्या बंद पाडण्याचें काम छत्रपतीकडून झालें नाहीं त्याचा परिणाम त्यांना राज्यत्याग करावा लागला हें होय. पुढें रेसिडेंटानें सांगितल्याप्रमाणें छत्रपतींनीं राजवाड्यांतून निघून जाऊन साताऱ्यापासून आठ मैलावर असलेल्या लिंब गांवाच्या शेरीमध्यें सोपा आहे त्यांत महिना दोन महिने मुक्काम केला. पुढें गव्हर्नर जनरलचा हुकूम आल्यानंतर छत्रपतींना काशीक्षेत्रीं पोंचविण्यांत आलें. शेरीमध्यें मुक्काम असतांना छत्रपतींच्या छावणीवर रेसिडेंटाकडून गोरे सोल्जरांचा पहारा ठेवण्यांत आला होता. कोणालाही छत्रपतींना भेटण्याला किंवा त्यांच्याशीं बोलण्याला परवानगी नव्हती. प्रतापसिंहांना काशीक्षेत्रीं पोचविल्यानंतर त्यांच्यातर्फे त्यांचा कारभारी रंगो बापूजी हा एक प्रभु जातीचा गृहस्थ अतिशय चळवळ करणारा होता. त्याला पुष्कळ रक्कम खर्चासाठीं देऊन इंग्लंडला पाठविण्यांत आले होते. ह्या गृहस्थाला इंग्रजांच्या मॅजिस्ट्रेटनें पकडण्याकरितां वॉरंट देखील पाठविलें होतें. हा रंगो बापूजी विलायतेस गेल्यावर तेथें चौदा वर्षे राहिला. तेथें गेल्यावर इंग्लिश शिकला. प्रतापसिंह महाराजांची कैफियत मोडी लिपीमध्यें तयार करून ती शिळा प्रेसवर त्यानें लंडन येथें छापविली. कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांच्या प्रत्येक मेंबराला त्यानें असें समजावून दिलें कीं, प्रतापसिंह महाराज निरपराधी आहेत. परंतु गव्हर्नर जनरलची बाजू त्यांच्यापुढें मांडण्यास विरुद्ध बाजूनें पुरावा करणें त्यावेळीं शक्य नव्हतें. यामुळें गव्हर्नर जनरलच्या रिपोर्टावर जो कायमचा ठराव झाला तो फिरवितां येत नाहीं असाच कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनीं निकाल दिला. १८४८ सालीं काशीक्षेत्रीं प्रतापसिंह महाराज निपुत्रिक मरण पावल्यानंतर पांच वर्षांनीं हा रंगो बापूजी हिंदुस्थानास परत आला. या प्रतापसिंह महाराजांच्या बाबतींत इंग्रजांनीं अन्याय केला असें म्हणतां येत नाहीं.

ज्यांचा हात लढाईत १८०८ सालीं तुटला होता असे जे परशुरामपंत पंतप्रतिनिधि यांचे चरित्र नवीन छापून प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून स्पष्ट दिसतें कीं, १८३८ सालीं सातारा येथें बंडाची तयारी चालू होती. प्रतिनिधि संस्थानापैकीं जास्त मुलुख सातारा संस्थानांत होता. तरी विजापूर जिल्ह्यापैकीं बागेवाडी महाल व दुसरे कर्नाटकांतील गुणदाळ व कोल्याळ हे महाल ब्रिटिश जिल्ह्यांत होते. त्यामुळें इंग्रजांशी दोस्तीनें राहणें हें प्रतिनिधींचें कर्तव्यच होतें. ज्यावेळीं १८३८ सालीं साताऱ्चे बाळासाहेब भोसले बंडाचे पुढारी यांनीं

प्रतिनिधींना पत्रें पाठविलीं कीं " ज्या अर्थी साताराचे छत्रपती तुमचे धनी आहेत त्या अर्थी इंग्रजांना झोडपून काढून हिंदुस्थानांतून घालवून देण्याकरितां तुम्ही आपले घोडदळ व लढवय्ये शिपाई साताराचे बंड-वाल्यांना मदत करण्याकरितां पाठविणें तुमचें कर्तव्य आहे. " परंतु ह्या पत्रांचा प्रतिनिधीनीं निषेध केला. आणि छत्रपतीवर कांहीं संकट येऊं नये म्हणोन अशा प्रकारचीं पत्रें त्यांनीं गुप्त ठेविलीं. यावरून बंड झालें होतें हे सिद्ध होतें.

पानिपत प्रकरण

पानिपत प्रकरणासंबंधानें प्रस्तावना करितांना मराठ्यांचें परावलंबन हा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्याचा विचार केल्याखेरीज ह्या प्रकरणावर प्रकाश पडत नाहीं. मराठे लोकांनीं हिंदुस्थानांतल्या सर्व भागांतल्या शूर संस्थानिकांना जिंकून खंडण्या वसूल केल्या त्याचें कारण त्यांच्या बंदुका आणि तोफा, या बाबतींत परावलंबन पराकाष्ठेचें असे. बंदुकीच्या दारूला लागणारीं द्रव्यें म्हणजे सोडा, गंधक आणि कोळसा यासंबंधीं पहिल्या दोन द्रव्याच्या बाबतींत सर्वस्वी युरोपियन व्यापाऱ्यावर अवलंबून रहावें लागे. तसेच युरोपियन गोलंदाजांनीं शिकवून तयार केलेले गोलंदाज आपल्या चाकरीस ठेवावे, आणि त्यांच्या हातून मोठमोठ्या लढाया जिंकाव्या अशी प्रत्येक वीर पुरुषाला इच्छा झाली. इब्राहिमखान गारदी हा प्रसिद्ध गोलंदाज फ्रेंच सेनापती लाली याच्या तालमींत तयार झाला होता. त्याला जास्त पगार देऊन हैद्राबाद येथील निजाम अलीनें आपल्या सैन्यांत चाकरीस ठेविलें. त्याहीपेक्षां जास्त पगार देऊन सदाशिरावभाऊ पेशव्यानें त्यास आपल्या चाकरीस ठेविलें. त्याच्याच तोफखान्याच्या कर्तबगारीवर सदाशिवरावभाऊ पेश-व्यानें १७६० सालीं उदगीरची लढाई जिंकली. पुढें उदगीरच्या रणांगणावर सदाशिरावभाऊ असतानांच १७६० च्या जानेवारी महिन्यांत दत्ताजी शिंदे हा अहमदशहा अबदालीशीं लढत असतांना, यमुनेच्या घाटावर झालेल्या लढाईत कामास आला. ही दत्ताजीच्या मरणाची हकीकत बाळाजी बाजीराव पेशवा आणि सदाशिवरावभाऊ यांना पोचल्यानंतर, पडदूरच्या छावणींत दोघे चुलत भाऊ एकत्र जमले, व अहमदशहा अबदालीशी लढण्याकरितां मोठी तयारी केली पाहिजे असा त्यांनीं निश्चय केला. दत्ताजी शिंद्यांचा मृत्यु झाला त्या वेळेपासून मराठी साम्राज्याला जी उतरती कळा लागली ती चाळीस वर्षांत मराठे साम्रा-ज्याचें स्वातंत्र्य नष्ट होण्यांत तिचें पर्यवसान झालें. त्या लढाईकरितां निघण्यापूर्वी एक आठवडा दोघाही पेशव्यांनीं राघोबादादाच्या उत्तरेकडील मोहिमामध्यें जीं

अर्धवट आणि आतबट्ट्याची कामें झालीं त्या कामांचा पाढा वाचण्यांत तो आठ-वडा फुकट घालविला. त्यावेळीं सेनापतीच्या जागेसाठीं जी सदाशिरावभाऊची निवडणूक करण्यांत आली, ती यथायोग्य होती. परंतु " अति सर्वत्र वर्जयेत् " हें तत्त्व सदाशिरावभाऊंना शिकविण्याला कोणी गुरू भेटला नाहीं हें हिंदुस्थानचें मोठें दुर्दैव होय. पूर्वींच्या मोहिमामध्यें घोडदळाचा जो सुटसुटीतपणा होता तो यावेळीं राहिला नाहीं. सदाशिवरावभाऊनें आपलाच हेका चालविला ही गोष्ट खरी आहे. गनिमी काव्याच्या पद्धतीनें लढण्याच्या कामांत पटाईत झालेले जे अनुभविक सेनापती मल्हारराव होळकर किंवा दमाजी गायकवाड, यांच्या मसलतीनें जर सदाशिवरावभाऊ चालता, तर घोडदळाच्या धडाडीनें अहमदशहा अबदालीला जिंकणें त्यावेळीं कांहीं कठीण नव्हतें. मल्हारराव होळकरानें स्पष्ट सांगितलें होतें कीं, " विश्वासराव पेशवा व सदाशिवरावभाऊ या खाशांनीं चंबळा नदीच्या पुढें जाऊं नये. एक पावसाळा उज्जयनीस छावणी करून रहावें. आम्ही अबदालीचा समाचार पाहून घेतो. " परंतु इब्राहिमखान गारदी याचे सल्ल्यानें तोफखान्यावर भिस्त ठेवून खडा सामना करण्याचा सदाशिवरावभाऊनें निश्चय केला. मराठ्यांची नेहमींची पद्धत अशी असें कीं, पावसाळ्याकरितां छावणी कर-ण्यास सोयीची जागा पाहून तीन महिने लढण्याचें काम बंद ठेवावयाचें. परंतु ह्या पानिपत प्रकरणीं सदाशिवरावभाऊनें दिल्लीला पोहोचण्यांत इतका उशीर केला कीं, जुलै महिन्याच्या मुसळधार पावसांत दिल्ली जिंकून घेतली. दिल्लीच्या राजवाड्यांतील सिंहासन फोडिलें आणि चांदीचे छत तोडिलें. त्यामुळें जे शूर हिंदू सरदार मदतीला आले होते ते सुद्धां नाखूष झाले. पेशव्यांचे सैन्य दिल्ली प्रांतांत अशा गैरसोयीच्या वेळीं पोंचलें कीं, सभोंवतालचा मुलूख लुटून देखील पोट भरणार नाहीं अशी ती वेळ होती. नाना फडणवि-साच्या पत्रापैकीं एक पत्र हल्लीं उजेडांत आले आहे, त्यावरून १७६० सप्टेंबर महिन्यांतच पेशव्याच्या सैन्याला धान्याचा तुटवडा पडूं लागला होता असें स्पष्ट दिसतें. अबदालीच्या सैन्याला मात्र रोहिलखंड आणि अंतर्वेदी या दोन प्रांतांतून धान्याचा पुरवठा नजिबखान रोहिल्याकडून भरपूर मिळत होता; ही अबदालीची रसद लुटून तेंच धान्य पेशव्यांच्या सैन्यास पोंचविण्याबद्दल भाऊसाहेब पेशव्यांची पत्रें गोविंदपंत बुंदेल्याला जात होती. तें काम बुंदेल्यानें बरोबर केले नाहीं म्हणून पेशवा त्याच्यावर फार संतापला होता. परंतु ही पेशव्याची चूक होती. पेशव्यांचें सैन्य मर्यादेबाहेर मोठें होतें, आणि त्याला धान्य पुरें पाडण्याची जबाबदारी थोडे सैन्य बाळगणाऱ्या एकट्या बुंदेल्यावर टाकणें न्यायाचें नव्हतें. सूरजमल जाट हा कुंभेरी येथील राजा त्याला पानिपत येथील छावणीत बोलावण्यांत आलें होतें. त्याच्याकडून खंडणीची लाखो रुपयाची बाकी वसूल होणें होती. सूरजमल भाऊ-साहेबाला थापा देत असे कीं, हजारो खंडी धान्य माझ्या राज्यांतून मिळेल. परंतु

या थापा लबाडीच्या होत्या असें मागाहून सिद्ध झालें. जर सदाशिवराव भाऊनें आपलें डोकें शांत ठेविलें असतें तर, सूरजमल्लाच्या राज्यांतून धान्य संभाळून आणण्याकरितां २५ हजार सैन्य जरी पाठविलें असतें तरी अशक्य नव्हते. इतकें अवाढव्य सैन्य पेशव्याजवळ होते. पेशव्यांच्या सैन्याबरोबर दोनशेपेक्षां सुद्धां जास्त हत्ती होते. ह्या हत्तींना खाण्याकरितां दाणावैरण किती लागेल याचा विचार मुळींच कोणी केला नाहीं. लढणारे शिपाई ज्या ठिकाणीं अन्नावाचुन मरूं लागले तेथें हत्ती घोडे किती मेले असतील याची विचारपूस कोण करतो ? लढाईच्या शेवटच्या दिवसाचे पूर्वीं दोन दिवस खुद्द पेशव्यांच्या खाशांच्या छावणी जवळ मेलेल्या घोड्यांची घाण सुटली होती. ते मेलेले घोडे छावणीपासून लांब नेऊन टाकण्याची देखील सोय राहिली नव्हती. इतके लोक रडकुंडीला आले होते. दिल्लीहून कुंजपुरा ७७ मैल लांब आहे. कोणताही हुशार सेनापती दिल्लीसारखे तटबंदीचे शहर सोडून धान्याची तजवीज केल्याशिवाय, आणि पावसाळा संपण्याच्या पूर्वीं, व नद्यानाले भरले असतांना इतक्या लांब ७७ मैलाचा प्रवास आपल्या सैन्याला करण्याला भाग पाडणार नाहीं. यावरूनच सदाशिवराव भाऊचा हेकेखोरपणा दिसून येतो. आणि त्या प्रांताची भाऊसाहेबाला बिलकुल माहिती नव्हती. त्या प्रांतांत भाऊसाहेबांचें येणें प्रथमचें आणि शेवटचेंच होते. ह्यासाठींच मल्हारराव होळकरानें सुरवातीलाच जी सूचना दिली होती कीं, "खाश्यांनीं चंबळा नदीच्या पलीकडे जाऊं नये. उज्जयनीस एक पावसाळा छावणी करावी." ही सूचना समंजसपणाची होती. अबदालीचें सैन्य देखील अवाढव्य होते. त्यानें देखील पावसाळ्या पुरती कुंजपुरा येथें छावणी केली ती अशा हेतूनें कीं पेशवे तूर्त कांहीं लढाईला उभे राहणार नाहींत. कुंजपुरा हा लहानसा भुईकोट किल्ला दक्षिणेंतील निपाणी, सांगोले किंवा बारामतीप्रमाणेंच आहे. अहमदनगर, आग्रा किंवा अलीगड याप्रमाणें तो मोठा भुईकोट किल्ला नाहीं. पेशव्याबरोबर लढवय्ये लोकांचा भरणा आणि तोफखाना किती होता याचा विचार केला तर कुंजपुरा लढून घेतला हें कांहीं मोठेसें शतकृत्य केलें नाहीं. पेशवे आणि अबदली हे दोघेही एकमेकाला भिऊन होते. अबदलीनें ज्या तहाच्या अटी घातल्या होत्या त्या पेशव्यांना मुळीच मान्य होण्याजोग्या नव्हत्या. पेशव्यांच्या हाताखालीं इतके इमानी लोक होते कीं, दिल्लीसारख्या तटबंदीच्या शहरांत आणखी तीन महिने देखील अर्धपोटी राहून वेळ मारून नेली असती. इतकी भयंकर कत्तल होऊं दिली नसती. अबदलीच्या अटी अशा होत्या कीं, नर्मदा नदीपासून हिमालयापर्यंत उत्तरेकडचा सर्व प्रदेश दिल्लीच्या बादशहाकडे रहावा. आणि दक्षिणेकडचा नर्मदेपासून रामेश्वरापर्यंत पेशव्यांनीं आपलेकडे ठेवावा. परंतु ह्या अटी कोणालाही मान्य होण्याजोग्या नव्हत्या. कारण शिंदे, होळकर, गायकवाड. पवार, बुंदेले या सर्वांचे सरंजाम नर्मदेच्या उत्तरेकडेच होते. इतक्या हलगर्जीपणाबद्दल आणि भाऊ-

साहेबाच्या हेकेखोरपणाबद्दल पेशव्यांचा जो नाश झाला तो अपरिहार्य होता. भाऊसाहेबांनीं पानिपतच्या अपयशाचे सर्व खापर मल्हारराव होळकराच्या माथीं मारलें तें बरोबर नव्हते. मल्हाररावची एकच चूक होती ती ही कीं नजीबखान रोहिल्याजवळ थोडें सैन्य असतांना जर शिंदे आणि होळकर एकदिलानें वागून नजिबखानाचा समूळ विध्वंस केला असता तर, त्यावेळी शक्य होतें. नजीबखान रोहिल्यानेंच पेशव्यांच्या नाशाकरितां अफगाणिस्थानांतून अबदल्लीला बोलावून आणिलें हे जरी खरें आहे तरी, अबदल्लीला देखील दिल्लीच्या बादशहाच्या दुर्बळ तेचा फायदा घेऊन आपण स्वतःच दिल्लीस बादशहा व्हावें अशी त्याची प्रबळ इच्छा होती. अयोध्येचा नवाब सुजा उद्दौवला हा देखील गोड बोलून पेशव्याशीं मित्रत्व दाखवितो, आणि आणीबाणीच्या वेळीं अबदल्लीला अनुकूल होऊन पेशव्यांना दगा देतो, ही त्याची लबाडी पेशव्याला शेवटपर्यंत समजली नाहीं. पानिपताच्या रणभूमिवर सदाशिवरावभाऊ मृत झाला ही गोष्ट खरी आहे. त्याचें मुंडकें लांब उडाले होतें यामुळें प्रेत ओळखता आले नाहीं. तरीपण त्याच्या अंगावर ल्हासे होतें त्या जागीं दाट केंस उगवलेलें होते, त्या खुणेवरून माहितगार लोकांनीं त्या प्रेताला ओळखले. आणि अग्नि संस्कार दिला हीं गोष्ट खरी आहे. परंतु ही खरी हकीकत पुण्यास पोंचविण्यास त्यावेळेस कांहीं साधन राहिलें नाहीं. पेशव्यांनीं सैन्याबरोबर बायका नेल्या होत्या यामुळें त्यांचें संकट दुणावलें असा जो प्रवाद आहे तो खरा नाहीं. त्या लढाईच्या वेळीं विश्वासराव याची बायको त्र्यंबकेश्वर येथें होती. सदाशिवरावभाऊंचे कुटुंब पार्वतीबाई ही मात्र बरोबर होती. नाना फडणवीसाची आई आणि बायको ही मात्र यात्रेच्या निमित्तानें छावणीबरोबर गेली होती, यामुळें दिल्लीसच राहिली व छावणीबरोबर पानिपतास गेली. दिल्लीहून बनारसच्या मार्गावर धामधुमीमुळें सुरक्षितता नव्हती, सबब ही मंडळी यात्रेला गेली नाहींत. मल्हारराव होळकर ह्याच्या तलवारीला पुष्कळ लढायामधून यश येत गेल्यामुळें तो नेहमीं आपली बायकामुलें बरोबर नेत असे. आणि पानिपताच्या संकटाच्या वेळीं देखील त्यानें आपली मुलेंमाणसें सुरक्षित स्थळीं राहतील अशी अगोदरपासून तजवीज केली होती. पानिपतानंतर सदाशिवरावभाऊची बायको पार्वतीबाई हिला ज्या खिजमतगारानें सुरक्षितपणें पुण्यास आणिलें त्या खिजमतगाराला माधवराव बल्लाळ पेशवे यांनीं एक गांव वंशपरंपरेनें जहागीर करून दिला. या पानिपताच्या आपत्तिमुळें मराठी साम्राज्याचा जर कोणता फायदा झाला असेल तर तो हा कीं, त्यामुळें दोन तेजस्वी राष्ट्रीय पुरुषांच्या कर्तबगारीला संधि आणून दिली. त्यापैकीं एक इसम म्हणजे माधवराव बल्लाळ पेशवे, आणि दुसरा इसम महादजी शिंदे हा होय. जर विश्वासराव पेशवा पानिपतावर मेला नसता तर माधवराव पेशव्याला आपली कर्तबगारी दाखविण्याला संधि मिळाली नसती. महादजी शिंद्यांचा पुतण्या

जनकोजी शिंदा हा वडील घराण्याचा त्याच्याकडे शिंदे सरदारांचा सरंजाम चालत होता. तो जनकोजी शिंदा पानिपतावर मारिला गेल्यामुळें महादजी शिंदा, ज्याला पानिपता पूर्वी विदुर किंवा अनौरस पुत्र मानित असत, त्याच्याकडे मुख्य सरदारकी आल्यामुळें तीस वर्षेपर्यंत त्यानें आपल्या कर्तबगारीने आपला सरंजाम पुष्कळ वाढविला.

१८५७ सालचें बंड

बॅरिस्टर सावरकर यांनीं जें प्रसिद्ध केलें आहे कीं, १८५७ सालचें बंड हें स्वातंत्र्याकरितां युद्ध होतें. हें म्हणणें खरें नाहीं. हिंदु आणि मुसलमान या दोघांचीही इच्छा अशी होती कीं, इंग्रजांनीं शांतता प्रस्थापित केली आहे तरी देखील लढाईवर न जातानांच स्वस्थ बसून पगार खावा. फुकट खाण्यास मिळावें ही हिंदु आणि मुसलमान या दोघांचीही इच्छा होती. या बंडांत इंग्रज सरकारनीं कवायत शिकविलेल्या ज्या पलटणी बिथरल्या, त्यामध्यें शेंकडा ५० शिपाई पुरभय्ये जातीचे होते. शेंकडा ४० शिपाई मुसलमान जातीचे होते. आणि शेंकडा १० शिपाई मराठा जातीचे होते. शौर्याविषयीं प्रसिद्ध अशा ज्या जाती हिंदुस्थानांत प्रसिद्ध होत्या, म्हणजे रजपूत, शीख, जाठ; गुरखे, गिराशिया, या शूर जातींच्या शिपायांना हें बंड नको होतें. सामान्य जनतेला देखील हें बंड नको होतें. संस्थानें खालसा झाल्यामुळें शिलेदारांची बेकारी वाढली, आणि ते बंड करण्याला तयार झाले ही गोष्ट खरी आहे. काडतुसांना गायीची आणि डुकराची चरबी लावतात अशी खोटी अफवा पलटणींत पसरली होती. तिचा परिणाम शेंकडा ५० पुरभय्ये शिपाई या बंडांत सामील झालें असा झाला. अयोध्या आणि लखनौ येथील मुसलमानी संस्थानें खालसा झाल्यामुळें शेंकडा ४० मुसलमान शिपाई बंडांत सामील झाले. आणि शेंकडा १० मराठे शिपाई सामील झाले, ह्याचें कारण शिलेदारांची बेकारी हें होय. बंडवाल्या शिपायांत लष्करी शिस्त मुळींच नव्हती. गेल्या चाळीस वर्षांत अक्षरशत्रू लढवय्या शिपायांना देखील असें कळून चुकलें होतें कीं, शिस्तीच्या जोरावर इंग्रजांनीं फार मोठा राज्यविस्तार केला. ही माहिती असून देखील काळ्या शिपायांनीं शिस्त मुळींच पाळिली नाहीं. बंडवाल्यांचे पुढारी होण्याला लायक असे इसम चार होते. एक ब्रह्मावर्त येथील (१) नानासाहेब पेशवे (२) तात्या टोपे (३) लखनौ येथील एक मौलवी होता, आणि (४) झांशीची राणी लक्ष्मीबाई. बंडाचा धुमाकूळ जर सवा वर्ष चालू होता तर

बंडवाल्यांचे काम म्हणजे एक चांगला पुढारी नेमावयाचा. त्याचा हुकूम सर्वांनीं मानावयाचा. एकादा मध्यवर्ति किल्ला आपले ताब्यांत ठेवून त्यांत जखमी झालेले शिपाई व दारूगोळा ठेवावयाचा. ज्या ज्या बंडवाल्यांना पैसा, धान्यसामुग्री, दारूगोळा आणि सैन्याची कुमक पाठविण्याची जरूर पडेल, तेथें तेथें ते पाठविण्याची व्यवस्था पुढाऱ्यांच्या हुकुमानें व्हावी. ह्याकरितां बंडवाल्यांच्या प्रत्येक छावणींतून मुख्य पुढाऱ्याकडे टपाल पोंचविण्याची व्यवस्था करावयास पाहिजे होती. ती त्यांना करितां आली नसती असें नाहीं, परंतु बंडवाल्यांचे प्रथमपासून शेवटपर्यंत असे धंदे होते कीं, तालुक्याचे खजिने फोडावयाचे. प्रत्येक शिपायाच्या दोन खिशांत जेवढे रुपये मावतील तेवढे रुपये घ्यावयाचे. तालुक्याचे तुरुंग फोडावयाचे. तुरूंगांतील सुटलेल्या बदमाष लोकांना मदतीला घेऊन रयतेला लुटावयाचे. गोरे अंमलदारांना ठार मारावयाचे, त्यांच्या बायका मुलांची कत्तल करावयाची. त्यांच्या बंगल्यांना जाळून टाकावयाचे. आपली मुलें माणसें नातलगाचे घरीं गुप्तपणें दडवून ठेवावयाची. कोणीही चांगला पुढारी याची नेमणुक न करितां वर दिलेली इतकीं कामें त्यांची तींच कामें स्वतःच्या जबाबदारीवर ते करीत असत. ह्याच्या उलट इंग्रज अंमलदारांनीं फार शांतपणें आणि शिस्तीनें बंड मोडण्याचें काम चालू ठेविलें होतें. अलाहाबाद येथील भुईकोट किल्ल्यांत दारूगोळा तयार करण्याचे कारखाने होतें. गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग हा बंड मोडेपर्यंत सवा वर्ष अलाहाबाद येथेंच बसून होता. आपल्या हाताखालच्या सर्व अंमलदाराकडून बंडासंबंधीं सर्व रिपोर्ट अलाहाबाद येथें मागवीत असे. इंग्लंडहून सर ह्यू रोज हा सेनापती, आपले हाताखालीं हुशार गोलंदाज आणि गोरे सैन्य घेऊन मदतीला आणण्याबद्दल त्याचा विलायतेशीं पत्रव्यवहार सुरू होता. सर ह्यू रोज मुंबईस पोचण्याला नऊ महिने लागले. तोंपर्यंत लॉर्ड कॅनिंग यानें हिंदुस्थानांतील सर्व भागांतील युरोपियन अंमलदारांना "आपल्या हाताखालील शिपायाशीं सौजन्यानें वागा, व त्यांचीं मनें बिथरतील अशीं कोणतीही कृत्यें करूं नका." असे हुकूम पाठविले होते. व उत्तरेकडे बंड झाल्याची हकीकत दक्षिणेकडे समजू देऊं नका असे हुकूम गुप्तपणें पाठविले होते. हल्लींप्रमाणें त्यावेळीं आगगाड्या नव्हत्या. व वर्तमानपत्रेंहि नव्हती. पंजाबांतील इंग्रज सेनापतींना जेव्हां असें समजलें कीं मिरत येथील छावणींतून काळे शिपाई लाहोर येथील सैन्यांत चिठ्याचपाट्या पोंचवितात व गुप्तपणें त्यांची गांठ घेतात. व दिल्लीकडील बंडाप्रमाणें तुम्हीही बंडांत सामील व्हा अशाबद्दल त्यांचीं मनें वळवितात, असे शिपाई बिथरले असतांना पंजाबांतील गोरा सेनापती इतका धैर्यवान होता कीं त्यानें सर्व काळे शिपाई कवायतीच्या निमित्तानें मैदानांत बोलाविले. आणि त्यांना हत्यारे खालीं ठेवण्यास लाविलें, त्यांचीं हत्यारे काळ्या शिपायांच्या ⅙ संख्या असलेले जे गोरे शिपाई त्यांना उचलून घेऊन कुलपांत ठेवण्यास सांगितलें. आणि काळ्या शिपायांना आपापल्या

बराखीमध्यें परत जाण्यास भाग पाडिलें. याप्रमाणें हत्यारें काढून घेण्याचें काम मोठ्या धिटाईनें त्यानें केलें. ज्या वेळीं युरोपियन लोकांची सरसकट कत्तल झाली, त्या वेळेला पंजाबातील कित्येक संस्थानिकांनीं युरोपियन लोकांच्या कुटुंबांना आपले राजवाडे राहावयास दिले, आणि आपल्या कुटुंबांतील माणसाप्रमाणें त्यांचे पोषण आणि संरक्षण केलें. लॉर्ड कॅनिंग यानें आपलें डोकें शांत ठेवून जे शिपाई त्याचा हुकूम ऐकत होते त्यांच्याकडून दिल्ली शहराला चार महिने वेढा देवविला, आणि दिल्ली बंडवाल्यापासून जिंकून घेतली आणि बादशहा महंमद बहादुरशहा बंडवाल्यांना सामील आहे असे शाबित झाल्यानंतर त्यास रंगून येथें कायमचे पोंचविलें. ह्या बंडापासून देशाला जर कोणता फायदा झाला असेल तर, तो हा कीं ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं पुढें केव्हांही हिंदुस्थानच्या लोकांच्या धर्मांत हात घालू नये हा होय. त्या वेळच्या पुष्कळ सुशिक्षित युरोपियन लोकांना वाटूं लागले होतें कीं, हिंदुस्थानच्या लोकांची स्थिति सुधारण्याला जर कोणता उत्तम उपाय असेल तर, तो हा कीं, हिंदुस्थानच्या लोकांना सक्तीनें ख्रिस्ती करावें. परंतु हा उपाय चुकीचा होता. हें बंड म्हणजे स्वातंत्र्याचें युद्धच होतें असें म्हणणें सर्वथैव चुकीचें होय. बंडाची धुमश्चक्री जोरांत होत होती, तो प्रदेश इतका लहान होता कीं त्याचें क्षेत्रफळ महाराष्ट्रांतील पांच जिल्ह्या-इतकेंच होतें.

हल्लींच्या स्थितींत सुशिक्षित लोकांना काय करतां येईल?

ज्या इंग्रज राज्यकर्त्यांनीं सर्व जगांत राज्यविस्तार केला, त्यांनीं आपली अर्थशास्त्राविषयींची तत्त्वें निश्चित केलीं आहेत. इतकेंच नव्हे तर यशस्वी करून राखविलीं आहेत. केवळ हिंदुस्थान देशाची संपत्ति लुटून आपण श्रीमंत व्हावें अशी दुष्ट इच्छा त्यांचे ठिकाणीं मुळींच नाहीं. कच्च्या मालाची किंमत या रूपानें दरसाल पांचशें कोटि रुपये हिंदुस्थानांत येत आहेत ही गोष्ट खरी आहे. रेल्वे विस्ताराच्या निमित्तानें एक मैलाला एक लाख रुपये इतका खर्च करून, युरोपांतील भांडवल हिंदुस्थानांत घातलें आहे आणि त्यामुळें हिंदुस्थानांत उद्योग-धंद्याची वाढ शेंकडो पटीनें झाली आहे ही गोष्ट प्रथम कबूल केली पाहिजे. यासाठीं सुशिक्षित लोकांनीं पुढील मुद्दे लक्षांत ठेविले पाहिजेत. हिंदुस्थानांतून परदेशी जाणारा कच्चा माल म्हणजे अफू, कापूस, गहूं, हिरडा, कातडी, हाडकें, वगैरेची यादी हजारापर्यंत देतां येईल. त्यांची किंमत हिंदुस्थानच्या लोकांच्या

हातांत पडत आहे हा मुद्दा कबूल केला पाहिजे. पुढील महत्त्वाचे मुद्दे येणेंप्रमाणें:—

(१) इंग्रज राज्यकर्त्यांच्या अर्थशास्त्राचीं तत्त्वें आपण कबूल केलीं पाहिजेत.

(२) हिंदुस्थानांत जास्त सुपीक प्रदेशांत लोकसंख्या पातळ आहे, व कमी सुपीक प्रदेशांत लोकसंख्या दाट आहे, यामुळें शक्य तितकी लोकसंख्येची विभागणी पुन्हा करविली पाहिजे. या कामीं देशी संस्थानिकांचें सहकार्य घेतलें पाहिजे.

(३) दारूबाजीमुळें फार पैसा बाहेर देशी जातो व हिंदुस्थानच्या लोकांचें दारिद्र्य वाढत आहे यामुळें जहाल, मवाळ व देशी संस्थानिक यांच्या सहकार्यानें दारूबाजी बंद करण्याचे उपाय योजिले पाहिजेत.

(४) देशी संस्थानिकांचे मुलूख दूरदूर ठिकाणीं पसरलेले आहेत ते सर्व एक संघानें संकलित करावें म्हणजे त्या योगानें दारूबाजी बंद करण्याला उपाय योजना करतां येईल.

(५) देशी संस्थानिकांचे मुलूख संघटित केल्यानें पुष्कळ नद्यांना धरणें बांधून इरिगेशन वाढवितां येईल, आणि जलजनित वीज उत्पन्न करितां येऊन उद्योगधंद्यांची वाढ शेंकडों पटीनें करितां येईल.

(६) राजानें शेतकऱ्यापासून जमीनीच्या उत्पन्नाच्या एक षष्ठांशापेक्षां जास्त उत्पन्न घेऊं नये असे शास्त्र वचन आहे. त्याचा प्रयोग करून पाहण्याकरितां सुशिक्षित संस्थानिकांच्या सहकार्यानें एक नमुनेदार वसाहत करून दाखवावी. म्हणजे शेतकऱ्यांची स्थिति कशी सुधारते हा प्रयोग पाहतां येईल.

(७) जिराईत जमीन इरिगेशनमुळें बागाईत केली असतां त्या जमिनींत पूर्वीं जितक्या लोकसंख्येचें पोषण होत असतें त्याच्या आठ पटीनें लोकसंख्या पोषिली जाईल. असा प्रयोग पाहण्याकरितां ही नमुनेदार वसाहत उपयोगी पडेल.

(८) शहरामधून लोकसंख्या हल्लीं फार झपाट्यानें वाढत आहे ही देशाला मोठी आपत्ति आहे. शहरांतील शिकलेल्या लोकांना बेकारीमुळें फार त्रास सोसावा लागत आहे, आणि शहरांतील तरुण लोकांचा शारीरिक ऱ्हास होत आहे तो थांबविण्याकरितां अशा नमुनेदार वसाहतींत जाऊन राहण्याची त्यांना इच्छा झाली पाहिजे.

(९) ह्या नमुनेदार वसाहतींत कोणाही भिक्षेकऱ्याला भिक्षा घालावयाची नाहीं किंवा मुसलमान धर्माच्या फकीरानांही भिक्षा घालण्याचे बंद केलें पाहिजे.

आणि अशा भीक मागणाऱ्या लोकांना एका कुटुंबाच्या निर्वाहा पुरती प्रत्येकाला जमीन देऊन त्याची स्थिति सुधारून दाखविली पाहिजे.

(१०) इरिगेशनमुळें जिराईत जमिनी बागाईत होतील त्यापैकीं मागासलेल्या जातींना आणि अस्पृश्य जातींना प्रत्येक कुटुंबाना चार एकर जमीन इरिगेशनखालीं भिजणारी मिळाली, म्हणजे त्यांची स्थिति सुधारेल असें दाखविले पाहिजे.

(११) शेतकीच्या जोडीला दुसरा जोड धंदा असला म्हणजे शेतकरी दुष्काळांत देखील आपले कुटुंब पोषण करूं शकतो. यासाठीं सुधारलेल्या पद्धतीवर कोंबड्याची पैदास करणें, असल्या प्रकारचें शिक्षण देण्याकरितां ह्या नमुनेदार वसाहतींत व्यवस्था करणें.

(१२) ब्राह्मण जातीचा शारीरिक ऱ्हास फार होत चालला आहे तो बंद करण्याकरितां ब्राह्मणांनीं अशा नमुनेदार वस्तींत कायमचे जाऊन राहून शेतकी व हायस्कूल शिक्षण हीं दोन्ही संपादन करितां येतील, आणि दूधदुभत्याची थोड्या खर्चांत चांगली किफायत करून कमी खर्चांत कुटुंब पोषण करितां येईल, अशा प्रयोग शाळा ह्या नमुनेदार वसाहतींत करून दाखवाव्या.

(१३) ब्राह्मणांचा शारीरिक ऱ्हास थांबविण्याकरितां वरील कलमांत जे उपाय सांगितलें आहेत त्यांची प्रस्तावना पंचेचाळीस वर्षांपूर्वीं कैलासवासी प्रिन्सिपाल महादेव शिवराम गोळे यांनीं जे दोन उत्तम ग्रंथ लिहिले आहेत, म्हणजे "ब्राह्मण आणि त्यांची विद्या व हिंदुधर्म आणि सुधारणा" या ग्रंथांत सांगितलेले उपाय अमलांत आणण्याची व्यवस्था करावी.

(१४) अशा नमुनेदार वसाहतींत अस्पृश्य जातींनीं नवीन घरे बांधून राहावें आणि मालकीची शेती जमीन घ्यावी, ही व्यवस्था करण्याकरितां इंग्रज सरकारच्या सहकार्यानें आणि देशी संस्थानिकांच्या सहकार्यानें राखीव जंगलांतील इमारती लाकडें अशा लोकांना फुकट देण्याकरितां व्यवस्था करवावी.

(१५) जमिनींत वांटण्या फार होतात यामुळें शेतकरी लोकांच्या आपत्ति वाढत असतात. याकरितां नमुनेदार वसाहतींत वांटण्या मुळींच होऊं नयेत अशा शर्तीवर जमिनी देण्यांत याव्या. आणि इंग्लंडप्रमाणें स्थावर मिळकत फक्त ज्येष्ठ पुत्राला मिळावी अशी शर्त घातली असतां कोणाच्याही धर्मामध्यें हात घातला अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. देशी संस्थानिकांनीं असा कायदा करणें त्यांच्या अधिकारांतील आहे.

(१६) नमुनेदार वसाहतींतील स्थावर मिळकत कोणालाही गहाण, बक्षिस किंवा खरेदी देतां येणार नाहीं अशा शर्तीवर सुरुवातीपासून दिली, म्हणजे शेतकऱ्यांची स्थिति पुष्कळ सुधारेल.

(१७) युरोप, अमेरिकेप्रमाणें हल्लींच्या जमिनींत सुधारलेल्या शास्त्रांचा उपयोग करून जमिनीचे उत्पन्न तिप्पट चौपट वाढवितां येईल असे शेतकऱ्यांना शिकविण्याकरितां शेतकीखात्यांतील एका तज्ञाची नेमणुक त्या त्या सरकाराकडून अशा प्रकारच्या वसाहतीमध्यें करवून घेण्याची तजवीज करावी.

(१८) शेतीला जोड धंदे म्हणजे हातमाग, मधमाशांची वाढ करवून मध मिळविणें, बांबूच्या टोपल्या, शिंदीच्या झाडांपासून गूळ आणि साखर तयार करणें, तुतीचीं झाडें लाववून रेशमाचे किड्यापासून रेशीम उत्पन्न करविणें, वायाळाच्या झाडापासुन कृत्रिम रेशमाचे कारखाने, पिंपळापासून लाखेची पैदास हे जोड धंदे खेड्यांतून देखील सुरू करितां येतील.